म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ललित निबंध
सं. क्र. 3319



'जीए'
...वाचे स्वप्न

REFBK-0026163

- अप्पा परचुरे

शब्दरूप : पुरुषोत्तम धाक्रस

परचुरे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.


ना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे,
न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे
ा वर्गणी भरावी लागले.

AUG 81
OCT 1990
6 OCT 1990
27 OCT 1990
31 OCT 1990
14 NOV 1990
21 NOV 1990
23 JAN 1991
6 FEB 1991

31 JUL 1991
10 JUL 1991
9 OCT 1991
25 DEC 1991
JAN 1992
25 JAN 1992
11 MAR 1992

(क्र. मा. पहा)
१००००–११–८९

संदर्भ निबंध
३३८१
२६१६३
२३७।९०



'जीए'
नावाचे स्वप्न

जीए नावाचे स्वप्न

—अप्पा परचुरे

: शब्दरूप :

पुरुषोत्तम धाकस



REFBK-0026163

परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई चार

प्रकाशक
विष्णू गजानन परचुरे
परचुरे प्रकाशन मंदिर
२०३/४, मेहता भवन
३११, राजा राममोहन रॉय मार्ग
गिरगाव, मुंबई ४०० ००४

आवृत्ती पहिली
मार्च १९९०

मुखपृष्ठ
श्याम जोशी

मलपृष्ठ
मोहन वाघ

आचार्य अत्रे सभागृहाच्या
आवारातील छायाचित्रे
प्रकाश जाधव

मूल्य
४० रुपये

© सर्वाधिकार सुरक्षित

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
'शिव-पार्वती'
४६१/४ टिळक रोड
पुणे ४११ ०३०

ती० दादांस—
तुम्ही मला दिलेल्या साहित्यविश्वात
मिळालेले हे अमृतफळ.

प्रिय आदरणीय जीए,


तुमच्या स्मृतिपुष्पांवर आधारलेले माझे हे स्वप्न पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचे धारिष्ट्य मी करीत आहे. हे पुस्तक म्हणजे परचुरे प्रकाशन मंदिराचे वाचकांपुढे ठेवलेले आणखी एक प्रकाशन नाही. किंबहुना हे पुस्तक किती लोक घेऊन वाचतील हा एक प्रश्नच आहे. कारण हे पुस्तक कथा, कादंबरी, चरित्र व्यक्ति-चित्रे वगैरे कुठल्याही नित्याच्या प्रकारात मोडणारे नाही. ही आहेत तुमच्या बहुमोल संगतीत लाभलेल्या काही अलभ्य आठवणींवर आधारलेली स्मृतिपुष्पे. तुमच्या सहवासाचे भाग्य मला लाभले ते मी कुणी आगळा-वेगळा होतो म्हणून नव्हे. तुमच्याबद्दल जो 'लौकिक' होता तो खरा नव्हता म्हणूनच हे भाग्य मला लाभले. माझ्या लेखी तर जीए तुम्ही म्हणजे "देवाची करणी–नारळात पाणी". एवढेच झाले की ते पाणी आणि ते खोबरे चाखण्याइतका मी सुदैवी निघालो. तिथपर्यंत पोचण्याची संधी मला मिळाली. ती का मिळाली हे सर्व या पुस्तकात आहेच. "मनुष्य म्हणून जीए ही काय चीज होती" हे सांगण्याचा तुमच्या पश्चात केलेला हा उपद्व्याप आहे.

अर्थात माझ्याजवळ होत्या त्या फक्त तुमच्या दुर्मिळ सहवासातील आठवणी. प्रा. वसंत कानेटकर, जयवंत दळवी, शिरीष पै, शंकर सारडा, प्रा. माधव कृष्ण अशा कित्येक लेखकांच्या आग्रहातून मी या आठवणी लिहून काढल्या. पण त्यांचे पुस्तक म्हणजे एकाच प्रकारची फुले ओवून केलेली माळ झाली असती. म्हणूनच तुमचे एक चाहते पुरुषोत्तम धाक्रस यांना मी त्या दाखवल्या. पण ते केवळ माझ्या आठवणींवर थांबले नाहीत. त्यांनी स्वतंत्रपणे आणखी कितीएक आठवणींची अनेकविध फुले जमवली, आणि त्या सर्वांची अशी काही गुंफण साधली की त्यांचा एक सुंदर, भरगच्च हारच निर्माण झाला. असा हार की त्याचे निर्माल्य होणार नाही.

—हा हार तुमच्या 'तसविरी'ला वाहून त्याच्या दरवळावर दिवस काढणे एवढेच आता माझ्या हाती उरले आहे.

तुमचा

—अप्पा



—वाचायला घेण्यापूर्वी

जी. ए. कुलकर्णी हे मराठी भाषेतील एक महान कथाकार. कुणाला अनुकरणही करता येणार नाही अशी विलक्षण शैली लाभलेला एक अजोड कथालेखक. त्यांच्या कथेने सुजाण वाचकांचा एक खास वर्ग निर्माण केला. जीएंच्या जगावेगळ्या व्यक्तिमत्त्वाबद्दल कुतूहल वाटणारा असाही एक वर्ग तयार झाला !

असा हा चौकटीबाहेरचा लेखक. धारवाडसारख्या कन्नडभाषी प्रदेशात राहून त्यांनी आपल्या लेखन तपश्चर्येला अत्यावश्यक असा एकांत मिळवला. तेथे कॉलेजच्या मुलांना शिकवण्याचा व्यवसाय केला तीही भाषा इंग्रजी. आणि उपासना-जोपासना केली ती मायबोली मराठीतल्या कथा-वाङ्मयाची. इंग्रजी भाषेचे प्रगाढ वाचन-मनन करूनही त्यांची कथा शुद्ध-स्वच्छ मराठीच राहिली. पण असे असूनही ते मराठी साहित्यिकांच्या बैठकी-मेळाव्यात कधी येऊन बसले नाहीत, की कुठल्या साहित्यिक वर्तुळात मिसळले नाहीत. जीए हे माझे घनिष्ट होते, निकटवर्ती होते असे छातीठोकपणे कुणालाही म्हणता येणार नाही असे अंतर ठेवून ते सर्वांपासून दूर राहिले. अतिउंचीवरच्या पर्णसंभारात आपण कुणाला दिसणार नाही, पण

आपल्या नजरेतून तर कुणी सुटणार नाही अशा वेताने दडून राहणाऱ्या कोकिळेची आठवण व्हावी असे हे व्यक्तिमत्त्व होते. म्हणूनच त्यांच्या कथावाङ्मयाने निर्माण केले नसेल असे कुतूहल त्यांच्या एकांड्या व्यक्तिमत्त्वाने निर्माण केले.

पण आपल्याच धुंदीत हवेत उंच भराऱ्या घेणाऱ्या पक्ष्याला अकस्मात बाण लागावा तसे झाले. त्यांच्या प्रकृतीत असा काही बिघाड निर्माण झाला की, त्यांना धारवाडचा 'एकांत' सोडून पुण्याच्या भाऊगर्दीत उपचारासाठी यावे लागले. अशा या प्रसंगात, अखेरच्या दिवसांत कधी कुठे गुरफटून न जाणाऱ्या या लेखकाला असे एक गृहस्थ भेटले की जीएंना त्यांचा सहवास हवासा वाटू लागला. त्यांच्या संगतीत तीन-तीन तासांच्या बैठकी अपुऱ्या पडू लागल्या. कटाक्षाने कधी कुणात गुंतून न पडणारे जीए या गृहस्थांच्या बोलण्यात गुंतून पडू लागले. त्यांच्या तोंडून उद्‌गार आले, "हा मनुष्य वेगळा आहे!"

हा वेगळा मनुष्य, जीए शेवटी ज्याच्यात गुंतून पडले ते गृहस्थ म्हणजे विष्णू गजानन �ऊर्फ अप्पा परचुरे. परचुरे प्रकाशन मंदिराचे आजचे चालक. या दोघांचे संबंध इतके निकटचे बनले की, परचुऱ्यांच्या लेखी जीए हे केवळ लेखक उरले नाहीत, आणि परचुरे हे जीएंच्या लेखी केवळ पुस्तके काढणारे प्रकाशक उरले नाहीत. करार, व्यवहार हे शब्द मागे पडले, आणि अप्पा परचुरे हे जीएंचे मानसपुत्र बनले!

पण हे फार काळ टिकले नाही. एक दिवस अप्पा परचुऱ्यांच्या हाती आलेला तो अनोखा पक्षी उडून गेला. स्वप्न तुटावे तसा, जीएंची कथा संपावी तसा. अशा उंचीवर की जिथे नजरही पोचणार नाही. अप्पा परचुऱ्यांच्या हाती उरल्या त्या फक्त आठवणी. या आठवणींचे करायचे काय? आठवणी म्हणजे आयुष्याच्या उन्हात आटून जाणारे पाणी.

अप्पा ज्याला त्याला या आठवणी सांगत सुटले. ऐकणारे म्हणत होते, यांचे पुस्तक करा. पण नुसत्या आठवणी—त्याही जीए कुलकर्णी नावाच्या अगाध लेखकाच्या. अप्पांनी तर कधी काही लिहिलेले नाही. ते प्रकाशक. अशा स्थितीत एक दिवस त्यांची माझी गठ पडली. मीही त्यांना तेच म्हटले, "तोंडाने बोलताय ते लिहून काढा."

अप्पा म्हणाले, "लिहून काढतो. त्याला पुस्तकाचं स्वरूप आलं पाहिजे ना?"

मी म्हटले, "त्याची काळजी करू नका. लिहून तर काढा. जे जे काही आठवेल ते लिहून काढा."

अप्पा म्हणाले, "चालेल. मी लिहून काढीन आणि तुमच्या स्वाधीन करीन."

त्याप्रमाणे आठवणींचे अनेक तुकडे जमवून त्यांनी ते माझ्या स्वाधीन केले आणि म्हणाले, "आता तुम्ही त्याचं काय हवं ते करा. मी सुटलो!"

ते सुटले आणि मी गावलो, असेही म्हणण्याची सोय नव्हती. कारण "तू लिही लिही" असा लकडा मीही त्यांच्या मागे लावला होता. माझी कल्पना अशी होती, ते जे लिहून काढतील त्यावर फार तर हात फिरवण्याचे काम आपणाला करावे लागेल. पण तेवढ्याने भागणारे नव्हते. अप्पा सगळेच माझ्यावर सोपवून मोकळे झाले होते. त्यानंतर पुण्यात गेलो तर अप्पा परचुरे यांचे बंधू चंद्रकांत परचुरे यांनी जीएंच्या आठवणींचा आणखी एक गठ्ठा माझ्या हातात ठेवला.

आठवणींचे हे सर्व तुकडे पाहिल्यावर माझ्या डोळ्यांना जीएंचे एक निराळेच चित्र दिसू लागले. मी ते एकसंध कसे करता येईल यामागे लागलो. फुटकळ चिजांतून एखादी सलग आकृती बनवावी किंवा तुटक-फुटक कथा-धाग्यांतून एखादी सलग चित्रपटकथा उभी करावी तशातला हा मामला होता.

मात्र मला ते जीएंचे 'चरित्र' बनवायचे नव्हते. आठवणींतून पुसटसे का होईना, जीएंचे व्यक्तिचित्र दाखवायचे— तेही खुद्द अप्पा परचुरे यांच्या हातून– असा विचार करून मी थोडा परकायाप्रवेश करून अप्पांचे हे पुस्तक तयार केले, आणि ते त्यांच्या स्वाधीन करून म्हटले, "मीही सुटलो!"

तेव्हा अप्पा परचुरे यांच्या या 'जीए-दर्शना'त काही उणे-दुणे झाले असेल तर ते माझे. आठवणींचा अस्सल गाभा सापडेल तो मात्र अप्पा परचुरे यांचा. या प्रयत्नांतून जीएंचे हिंदकळणाऱ्या पाण्यात दिसणारे प्रतिबिंब तरी वाचकांना दिसावे एवढीच इच्छा आहे.

—पुरुषोत्तम धाक्रस

" भिंगातून " दिसले–पाहिलेले " जी. ए. "

जी. ए. कुलकर्णी या थोर मराठी कथाकाराला मी प्रत्यक्षात कधी भेटलो नाही की पाहिलेलेही नाही. ते मला दिसले, भी पाहिले आणि पुढे मला भावले ते अण्या परचुरे नावाच्या एका भिंगातून. तसे मी त्यांना अनेक माणसांच्या भिंगातून पाहिले होते. त्यांच्या कथारूपी कॅलिडोस्कोपमधूनही ते विविध रंगरूपांत मला दिसले होतेच. तरीही त्यांची ओळख करून घ्यावी वा त्यांना जाऊन भेटावे असे (त्यांचे अखेरचे पर्व सोडले तर) मला तीव्रतेने कधी वाटले नाही. त्यांच्या तुसडेपणाचे वा एकान्तप्रियतेचे किस्से तर मी खूप ऐकले होते. त्याबद्दल माझी काही ठाम मतेही झाली होती. अनेक लेखकांप्रमाणे (ज्यात माझाही कुठे तरी मागल्या रांगेत नंबर लागतो) जी. ए. ' दरबार भरवणारे ' आणि ' दरबारात रमणारे ' लेखक नाहीत हे मी ओळखले होते. अशा लेखकावर ' शिष्ट, तुसडा, माणूसघाणा, अहंमन्य... ' इ. विशेषणांची खैरात, त्याच्या घराच्या (आणि मनाच्याही) बंद दरवाज्यावर धडकून परतलेल्या, दुखावलेल्या मोठ्या माणसांनी करावी यात नवल काहीच नव्हते. एखाद्या लेखकाला आपले ' खाजगीपण ' काटेकोरपणे जपायचे असेल, ' मित्र ' निवडीबाबत त्याला फार साक्षेप करावासा वाटत असेल, आणि ' वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे ' वाटून ' येणे सुखे रुचे एकान्ताचा वास। आपुलाची वाद आपणासी ' अशा एकान्तवासावर ज्यांचे निहायत प्रेम असेल, त्यांना त्यांचा धर्म आचरण्याचे स्वातंत्र्य असलेच पाहिजे. असा लेखक ढोंगी वा मतलबी आहे आणि तो आपली एक ' चमत्कारिक इमेज ' लोकमानसात निर्माण करण्याची धडपड करतो आहे, असा आरोप आणि तोही त्याच्या मरणोत्तर करणे समंजसपणाचे लक्षण नाही. ' बेनिफिट ऑफ डाउट ' म्हणून तरी त्याच्या मनोभूमिकेला न्याय दिला पाहिजे. (आणि ' इमेज '-बद्दल वा ' मुखवट्या 'बद्दलच म्हणायचे तर हॅम्लेटच्या शब्दांत प्रत्येक लेखकालाच जाव विचारता येईल की " Use every man after his

desert, and who will escape whipping ?")

हे सगळे मला थोडेसे स्वानुभवाने कळत होते, म्हणूनच मी कित्येक वर्षांपूर्वी धारवाडच्या विद्यापीठात व्याख्यानासाठी गेलो असताना जी. एं. ना भेटण्याची उत्सुकता दर्शवली नाही की त्यांच्याबद्दल चौकशीही केली नाही. माझे आतिथ्य करणारे मराठीचे प्राध्यापक त्यावर चकले असावेत. त्यांनी ही छोटीशी वस्तुस्थिती एक गौरवाची बाब म्हणून समारोपाच्या भाषणात सांगितली. एखाद्या लेखकाने आपली 'इमेज' लोकांना हव्या असलेल्या 'चौकटीत' बसवण्याचे नाकारले तर त्याला कोणकोणते शिव्याशाप मिळतात, तेही त्या दोन दिवसांच्या वास्तव्यात मला ऐकायला मिळाले. वस्तुस्थिती एवढीच होती की त्या काळात मी जी. ए. फॅन नव्हतो. त्यांची थोरवी मान्य करूनही गंगाधर गाडगीळ हे अधिक खोली गाठणारे, विविधतेने नटलेले, वैचित्र्यपूर्ण जीवनानुभव समर्थपणे चित्रित करणारे सर्वश्रेष्ठ कथाकार आहेत असे माझे तेव्हा ठाम मत होते. आज चित्र थोडे बदलले असले तरी ही दोन शिखरांतली तुलना आहे.

मुद्दा एवढाच की जी. एं. ना भेटण्यासाठी त्या वेळी मी थोडीही धडपड केली नाही यामागे दुसरे कोणतेही कारण नव्हते. गेल्या काही वर्षांत जी. ए. पुण्यात येऊन राहिले. अप्पा परचुऱ्यांच्या-त्यांच्या गाठीभेटी होऊ लागल्या. त्यांचा स्नेह जुळला, जिव्हाळ्याचा झाला, या सगळ्या घटना मी त्रयस्थपणे पाहत होतो. 'अप्पा' हा माणूस इतर कित्येक प्रकाशकांसारखा मतलबापुरती जवळीक साधणारा धंदेवाईक नाही. जे त्यांच्या आदराला पात्र झाले, ते सहजतेने जवळ येतात व त्यांचे घनिष्ट मित्र होतात हा अनुभव तर मी जी. एं. च्या आधीच घेतला होता. अप्पासाहेबांच्या वागण्या-बोलण्यात प्रांजळपणा आणि जिव्हाळा ओतप्रोत भरला आहे. त्यामुळेच जी. एं. च्या आणि त्यांच्या भेटीगाठी आणि बैठकी यांचे तपशीलवार वृत्तान्त ते प्रत्येक वेळी आवर्जून सांगत, त्या भेटीगाठींचा प्रत्येक वृत्तान्त मी अतिउत्सुकतेने ऐकू लागलो. कळत न कळत माझा अलिप्तपणा आणि थंडपणा मावळू लागला आणि माझ्या मनःफलकावर अप्पांच्या अनुभवात डुबलेल्या शब्दशैलीने जी. एं. चे एक अनोखे रंगतदार चित्र तयार होऊ लागले. जी. ए. मला अधिक 'समजू उमजू' लागले. आणि माणूस म्हणून अधिक 'आवडूही' लागले. तरीही अप्पांच्या साहाय्याने जी. एं.ना भेटावे असे मात्र या काळातही मला वाटले नाही. जी. ए. आणिक काही

वर्षे जगते तर ही गाठभेट अटळच होती. त्याची पूर्वतयारीही होत होती. अप्पासाहेब मजबद्दल त्यांच्यापाशी बोलत असलेच पाहिजेत. पण ते सगळेच त्यांच्या अकाली मृत्यूमुळे संपले. तरी पण अप्पा आणि त्यांचे चुलतबंधू चंदू यांच्याकडून जी. एं. च्याबद्दल ऐकत राहणे हा एक फार सुंदर अनुभव होता. डॉ. जॉन्सनचे चित्र बॉसवेलच्या भिंगातून अधिक रंगतदार उमटले तसे जी. एं.चे चित्र अप्पांच्या अनुभव-निवेदनातून मोठे उद्‌बोधक आणि रमणीय उमटत होते.

जी. ए. वारल्यानंतर अप्पांना मी प्रथम गळ घातली की हे अनुभव-चित्र तुम्ही स्वतःच शब्दबद्ध केले पाहिजे. पुढे अनेकांच्या आग्रहामुळेच केवळ नाही तर जी. एं.चा मृत्यू जिव्हारी लागल्याने अप्पांच्या जिवाची जी तगमग झाली त्यातून मुक्त होण्यासाठी तरी त्यांना हाती लेखणी उचलावी लागली. म्हणून अप्पांचे हे सुंदर पुस्तक दोन वेळा माझ्या चिंतनाचा विषय झाले. पहिल्यांदा मी ते त्यांच्या तोंडून ऐकले तेव्हा आणि आता दुसऱ्यांदा छापील स्वरूपात मी वाचले तेव्हा. अगदी साध्या साध्या प्रसंगात जी. एं.चा स्वभाव विविध रंगछटांनी आपल्या डोळ्यांसमोर भरला जातो. आपण अप्पांच्या डोळ्यांनी जी. ए. पाहू लागतो कधी तेच कळत नाही. जी. एं. चा प्रांजलपणा, जिव्हाळा, आतिथ्यशीलता, औदार्य, मनस्वीपणा संकोची वृत्ती, अभिमानाचा डंख, निरलसता, सौंदर्यदृष्टी, चोखंदळपणा, आणि वागण्याचे सक्त विधिनिषेध हे सारेच पैलू झरझर आणि वेगाने आपल्यापुढे उलगडत जातात. असाहित्यिक माणसांबद्दल त्यांना वाटणारा उमाळा आणि विश्वास हा एक स्वतंत्र मनोविश्लेषणाचा विषय आहे. पण त्यात गहनगूढ काही नाही.

जी. ए. उत्तम प्राध्यापक होते म्हणजेच उत्तम वक्ते होते. पण त्यांनी कधी सभासंमेलने गाजवली नाहीत. त्यांना त्याची रुची नव्हती. 'वक्तृत्व गाजवणे म्हणजे वेळाचा अपव्यय आहे' असली दुबळी समर्थनेही आपल्या उणीवा लपवण्यासाठी त्यांनी कधी केली नाहीत.

जी. एं. च्या वर्तनात विक्षिप्तपणापेक्षाही 'अविश्वासा'चा भाग जास्त असावा. या अविश्वासामुळेच उमद्या मनाचा माणूसही आत आक्रसतो आणि त्याच्या वृत्तींचे कंगोरे निकटवर्तीयांना बोचू लागतात. साहित्य अकादमीचे पारितोषिक इतक्या तडफेने परत करण्याची गरज नव्हती. आक्षेपकांचा रोख प्रकाशकावर होता; जी. एं. च्यावर नव्हता. तरी पण जी. ए. 'टोकापर्यंत' गेले. आपली

निःस्पृहता वादातीत, संशयातीत राहावी, यासाठी. 'कोणाचेही मिंधेपण नको,' हा सभ्याचारच आहे. पण त्यावद्दलचा टोकाचा हट्ट हा काही सुदृढ मनोवृत्तीचा आविष्कार नव्हे. कै. वेहेरे जी. एं. च्या निकट आले तेव्हा शेवटी वेहेऱ्यांच्या प्रेमळ औदार्याची साक्ष त्यांना पटली आणि त्यांच्यापुरता हा 'अविश्वासगंड' दूर झाला. पण किती उशिरा? आयुष्यात भेटणारा प्रत्येक माणूस इतका चोखंदळपणे पारखून घ्यायचा म्हटले तर इवलेसे आयुष्य कसे पुरावे? जी. ए. काळा चष्मा का वापरीत आणि फक्त पत्रांतूनच 'मोकळे' का होत असत, याचाही उलगडा या सूत्रात होऊ शकतो. पण हा 'अविश्वास' तरी या मनस्वी प्रेमळ मनाला का घेरून टाकणारा व्हावा? जी. एं. नी लग्न का नाही केले? त्यांचा प्रेमभंग झाला होता का? आणि तरी ते इतके प्रपंचदक्ष कसे राहिले? निकटवर्तीयांना या प्रश्नांच्या उत्तरातच जी. एं. चे अवघे जीवनरहस्य गवसेल. अनेक ठिकाणी प्रणयावद्दल, स्त्रीसौंदर्यावद्दल जी. ए. नको इतके कडवट उपरोधी चित्र काढून जातात... "लग्नानंतर तिच्या प्रत्येक अवयवाला स्वायत्तता मिळत गेली, ती मांसमोकाट सुटली, दुकानाच्या पायऱ्यांवरून ती मांसाच्या हप्त्याहप्त्याने खाली उतरे..." हे वाक्य म्हणजे केवळ कल्पनाविलास वाटत नाही.

मुद्द्याची गोष्ट एवढीच की जी. एं. चे आकाश झाकोळलेले होते. ते ढग कोठून कसे आले याचाही (पंचनामा वा चिरफाड करून नव्हे तर) हलक्या हाताने शोध घेतला पाहिजे. थॉमस हार्डी या तीव्र निराशावादी कवी-कादंबरीकारावद्दल बर्नार्ड शॉ की जी. के. चेस्टर्टन गमतीने म्हणाला होता : "प्रथमपासून या कवीला कोणी तरी व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्सचा नियमाने औषधोपचार केला असता तर जीवनावद्दल तो इतका कडवट झाला नसता." – जी. एं. च्या वद्दल असेच काही म्हणता येईल का?

श्री. पुरुषोत्तम धाक्रस यांच्या शब्दांकनावद्दल लिहिल्याशिवाचून ही प्रस्तावना पुरी होऊच शकणार नाही. अप्पासाहेब हे एक चोखंदळ रसिक असले तरी ते काही सर्जनशील लेखक नव्हेत. आचार्य अत्रे आणि स्वा. सावरकर यांचा सहवास त्यांना लाभला असल्यामुळे त्यांची रसिकता आणि निकोप वृत्ती समाजहितैषी झाली आहे. तरीही प्रत्यक्ष कलात्मक लेखनासाठी लागणारी सर्जनशीलता त्यांच्या ठायी नाही. आणि इथेच श्री. धाक्रस यांनी त्यांना बहुमोल मदत केली आहे.

शब्दांकन करणे ही स्वतंत्र लेखन करण्यापेक्षाही एक अवघड कला आहे.

शब्दांकन म्हणजे डिक्टेशन घेणे नव्हे; वर्तमानपत्री खाक्यात मजकुरापुढे मजकूर टाकून जुळवून घेणे नव्हे; किंवा थोडे दुसऱ्याचे नि पुष्कळसे पदरचे घुसडून तयार केलेली चटकदार संहिता नव्हे. बहुधा चुकीची माणसे एकत्र येतात आणि त्यामुळे शब्दांकन फसते. श्री. धाक्रस यांनी 'मोले घातले लिहाया' म्हणून हे काम उचलले नव्हते. त्यांचाही अप्पांच्या कथनाशी जीव जडला होता. शब्दांकनकार असा 'जीव जडला' तरच परचित्तप्रवेश करू शकतो आणि त्याच्या शब्दकळेला नेमकेपणा येतो. एक प्रकारे असल्या शब्दांकनाची जात कादंबरी-लेखनाला जवळची असते. व्यक्तिचित्र-रेखाटन करताना वा प्रसंग रंगवताना कादंबरीकाराची 'समरसता' आणि 'अलिप्तता' शब्दांकनकाराजवळ असावी लागते. शिवाय दुसऱ्याचे मूल ओटीत घेऊनही ते स्वतःच्या लेकरासारखेच ममतेने व चातुर्याने वाढवायचे असते. ही कहाणी मी प्रथम अप्पांच्या तोंडून ऐकली होती आणि मग वाचली. मला दोन्ही रूपे नुसती आवडली असे नाही तर ती 'एकरूप' वाटली. हे यश अगदी शंभर टक्के शब्दांकनकाराचे आहे. शब्दांकनकाराची सगळी वैशिष्ट्ये या कथनात खुलून उठली आहेत. त्यामुळेच हे पुस्तक चटकदार, वाचनीय तर झालेच आहे; पण प्रसंगी विचार करायला लावण्याइतके अस्वस्थकारीही उतरले आहे.


जी. एंच्या लेखनाचा खास विशेष म्हणजे 'साध्याही विषयात आशय मोठा' दाखवणारा 'परतत्त्वस्पर्श'— तो या पुस्तकात अगदी सहजतेने उमटला आहे.

हे पुस्तक जी. एं.नी वाचले असते तर अप्पांची त्यांनी पाठ थोपटली असती. पुस्तकाची एकूण निर्मिती अप्पांच्या लौकिकाला साजेशीच झालीय. त्यात जी. एं.ची छायाचित्रे, मुखपृष्ठावरील चित्र, मलपृष्ठावरील जी. एं.ची आवडती खुर्ची, त्यावर रंगवलेला लाडका पक्षी आणि हॅम्लेट चित्रपटाची आठवण करून देणारे खुर्चीवरील गुलाबपुष्प, यामुळे या पुस्तकाने रसिकांच्या काळजालाच हात घातला तर नवल नाही.


हे पुस्तक मुद्रित रूपात जयवंत दळवींनी वाचले आणि अप्पांना विनोदाने लिहिले : "आमच्या हयातीनंतर असे पुस्तक आमच्यावरही लिहा— 'दळवी —एक भंगलेले स्वप्न.' तेवढ्यासाठी लवकर जायची आमची तयारी आहे." दळवींच्या या उद्‌गारांवर "आमचेही नाव लक्षात असू द्या" असे मी अप्पासाहेबांना म्हणतो.


वसंत कानेटकर

जीए नावाचे स्वप्न




बी.ए.च्या वर्गातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांसमवेत – १९५३-५४
– पहिल्या रांगेतील पहिले जीए






धारवाड कॉलेजमधील सेवक वर्ग – १९५९
पहिल्या रांगेतील दुसरे जीए



कॉलेजमध्ये रेक्टर असताना



अमेरिकन सेमिनारच्या वेळी, मुंबई – १९५४-५५



कॉलेजमधील मित्रांसमवेत (१९४३) – मधले 'जीए'



बेळगावच्या घरातील पायरीवर



धारवाडच्या घरात मित्रासमवेत उजवीकडचे जीए



कॉलेजच्या टेकडीवर





कॉलेजच्या टेकडीवर दोन मित्रांसमवेत – पहिले 'जीए'



कॉलेजच्या आवारात उजवीकडचे जीए



इचलकरंजीत : 'फाय फाउंडेशन' पुरस्कार-स्वीकार



भगिनी सौ. नंदा पैठणकर यांच्याकडून लक्ष्मीपूजनाचा प्रसाद घेताना



भगिनी प्रभाताई व जीए
आचार्य अत्रे सभागृहाच्या आवारात – १९८७



मुग्धा



मनीषा



लाडका शेजारी : अताउल्ला पठाण




दिल्लीच्या साहित्य अॅकॅडेमी पारितोषिक वितरण समारंभात :
डाव्या बाजूला श्री. रा.ना. दांडेकर, उजव्या बाजूला डॉ. स.गं. मालशे



दिल्लीच्या महाराष्ट्र भवनात : महाराष्ट्र सरकारतर्फे झालेल्या सत्कारात
श्री. के.ए. अय्यंगार यांचे भाषण – डावीकडून चौथे जीए



आचार्य अत्रे सभागृहाच्या आवारात :
चंद्रकांत परचुरे व माधवराव खरे यांच्यासमवेत १९८७



१ भेट

जीए ही माझ्या आयुष्यात घडलेली एक विलक्षण कथा म्हणा किंवा न पडणारे स्वप्न आहे. फक्त चारच वर्षांपुरता हा अलौकिक पुरुष माझ्या आयुष्यात आला आणि माझे आयुष्य उजळून गेला. आपल्या आयुष्यातले काही कण त्याने मला दिले आणि आला त्याच वेगाने तो निघून गेला. माझ्या हातात शेवटी स्वप्नच उरले—कधी न पडणारे.

खरे म्हटले तर माझा आणि जी एं चा संबंध काय, असा प्रश्न मला ओळखणाऱ्या काही लेखकांना पडला होता. अर्थात मलाही तो प्रश्न होताच. माझ्या लेखी जी. ए. कुलकर्णी हे आणखी एक कुलकर्णी होते—आणि जीएंच्या लेखी अप्पा परचुरे हे कोणीच नव्हते.

कारण मुळात मी प्रकाशक सुद्धा नव्हतो. प्रकाशक ग. पां. परचुऱ्यांचा मुलगा यापलिकडे मला कुणी ओळखत नव्हते. माझे वडील प्रकाशन व्यवसाय करीत असले तरी मी त्यात नव्हतो. माझा वेगळा धंदा होता. प्रकाशन काय, मराठी साहित्याच्या वाचनाशी सुद्धा माझा संबंध यथातथाच. म्हणजे वेळ मिळाला तर काही तरी वाचायचे आणि सोडून द्यायचे अशातला मामला होता. पण एक दिवस कशी कोण जाणे, 'स्वामी' नावाची एक कथा माझ्या वाचनात आली, आणि त्या कथेने मला विचारात पाडले. मी अंतर्मुख झालो.

तशी ती कथा माझ्या डोक्यावरूनच जाणारी होती. पण तरीही मी तिच्या मागून फरफटत गेलो. एकदा वाचून आकलन झाली नाही, म्हणून दुसऱ्यांदा आणि तिसऱ्यांदा वाचली. त्यातले काय समजले आणि काय नाही हा भाग वेगळा. पण एक मोलाची गोष्ट त्या कथेने मला दिली. ती म्हणजे माणसाकडे पाहण्याची दृष्टी. माणूस हा वरवर दिसतो तेवढाच नसतो. त्याला नीट पाहायचे तर फार खोल जावे लागते. आणि असे खोल गेल्यावर माणसाच्या जीवनाकडे

पाहण्याची एक चोकस दृष्टी आपणाला लाभते. पाण्यावर दिसणारा खडकाचा काही भाग तेवढाच आपणाला माहीत असतो. खाली पाण्यात तो किती आणि कसा पसरला आहे आपणाला कुठे माहीत असते ?

तीच गोष्ट वर वर दिसणाऱ्या माणसाची असते. खोलात जाऊन त्याचे अंतरंग शोधण्याचे काम लेखक करीत असतो. जीएंनी मला त्या कथेतून असे खोल खोल नेले आणि माणसापर्यंत पोचण्याची एक वेगळी वाट दाखवली. म्हणूनच कधी नाही ते नजर वर करून मी त्या कथेच्या लेखकाचे नाव वाचले, आणि माझ्या मनात प्रश्न उठला—" कोण हे जी. ए. कुलकर्णी ? "

हे नाव आठवण्याचा खूप प्रयत्न केल्यावर एक दिवस माझ्या लक्षात आले, अरे—हे नाव खरे तर आपणाला चांगलेच ठाऊक असायला पाहिजे. या लेखकाचा नावापुरता का होईना, आपल्याशी जुना संबंध आहे. म्हणजे असे की, आमच्या वडलांच्या प्रकाशन मंदिरातर्फे १९६०–६५ यादरम्यान अमेरिकेतील अनेक वैशिष्ट्यपूर्ण पुस्तकांची भाषांतरे प्रकाशित करण्यात आली होती. अमेरिकन दूतावासाच्या पुरस्काराने ही प्रकाशने परचुरे प्रकाशन मंदिर प्रसिद्ध करीत असे. परचुरे प्रकाशन मंदिर आणि अमेरिकन दूतावास यांच्यामध्ये प्रत्येक नव्या प्रकाशनाचा एक करार होत असे. असा एक करार माझ्या वडिलांनी माझ्या नावाने केला होता, आणि त्या करारात अंतर्भूत असलेली पाच पुस्तके जी. ए. कुलकर्णी या लेखकाने भाषांतरित केली होती.

प्रत्यक्षात जी. ए. कुलकर्णी या लेखकाशी मात्र आमचा काहीच संबंध आला नव्हता. अमेरिकन दूतावासवाल्यांनी ती पुस्तके त्यांच्याकडून भाषांतर करून घेतली, आणि आमच्या प्रकाशन संस्थेकडे प्रसिद्धीसाठी दिली. त्यामुळे कागदोपत्री जीएंच्या त्या पाच पुस्तकांचा प्रकाशक मी असलो तरी " लेखक आहे कसा आननी "—काळा की गोरा—हे मला अजिबात माहीत नव्हते.

पुढे असे लक्षात आले की, जी. ए. कुलकर्ण्यांनी भाषांतरित केलेली ती पाच पुस्तके कॉन्राड रिक्टर या लेखकाची होती. विशेष म्हणजे भाषांतरित असूनही जी. ए. कुलकर्ण्यांच्या त्या पुस्तकांना चांगली मागणी होती. त्यांचे नाव लक्षात राहण्याचे हेही कारण असावे. ज्याला खप नाही तो लेखक लक्षात राहत नाही ! 'स्वामी' कथेच्या लेखकाबद्दलचा हा एक धागा मला मिळाला. त्यामुळे जी. ए. कुलकर्णी या लेखकाबद्दलचे कुतूहल आणखीन वाढले. त्यांच्याबद्दल चौकशी

सुरू केल्यावर एक-दोघांनी मला मूर्खातच काढले. म्हणजे एवढा मोठा लेखक तुला माहीत नाही?— अशा थाटात. समाधान एवढेच होते की, 'स्वामी' या कथेने तिच्या लेखकाविषयी जे विलक्षण कुतूहल निर्माण केले तेवढ्या तोलामोलाचा तो लेखक आहे हे कळले.

मग एक दिवस उठलो, आणि बॉंबे बुक डेपोत गेलो. त्याचे मालक-चालक पांडुरंगशेठ कुमठा यांच्याकडे जी. एं. च्या कथासंग्रहांची मागणी केली. बोलता बोलता कुमठा शेठ चेष्टेने म्हणाले, "कथासंग्रहच काय, तुला तो आख्खा लेखकच आणून दिला असता. पण तो फार लांब जाऊन राहिलाय."

"लांब म्हणजे कुठे? महाराष्ट्रातच ना?" मी विचारले.

"नाही हो." कुमठाशेठ हसून म्हणाले, "महाराष्ट्राच्या बाहेर, धारवाड, कर्नाटकात. तिथं इंग्रजीचा प्रोफेसर आहे तो."

माझे कुतूहल वाढतच गेले. महाराष्ट्राबाहेर—कन्नड मुलखात—म्हणजे मराठीशी संबंध नाही. आणि तिथे शिकवतात ते सुद्धा इंग्रजी. म्हणजे या लेखकाचा आजघडीला मराठीशी संबंधच नाही. आणि तरी हा इतके चांगले मराठी वाङ्मय लिहितो!

कुमठाशेठ म्हणत होते, "माझा वर्गमित्र तो. शाळेपासून कॉलेजपर्यंत. पण आता कित्येक वर्षांत गाठ-भेट पण नाही होत. मी इकडे पुस्तकं विकतो, आणि तो तिकडे पुस्तकं लिहितो—एवढाच संबंध."

कुमठाशेठनी मला जीएंचे दोन कथासंग्रह दिले. 'निळासावळा' आणि 'हिरवे रावे.' ते वाचायला लागल्यानंतर हा लेखक अगाध आहे याबद्दल शंका उरली नाही. अर्थात वाचून दाणकन संपवावा असा हा साधा-सोपा लेखक नाही; पावला-पावलाला तो थांबवणार, आणि इथे हे बघ, तिथे विचार कर असे करीत नेणार. त्यामुळे तो वाचून संपता संपत नव्हता. प्रत्येक कथा एका वेगळ्याच विश्वात नेऊन आणी. त्यातली माणसे वेगळी होती, अफाट होती. त्यांचे जीवन, विश्व सगळेच न्यारे होते. उपमालंकारांनी भरलेली असली भाषा उभ्या जन्मात मी कुठे वाचली नव्हती. या लेखकाला एकदा भेटावे अशी ओढ वाटू लागली.

प्रकाशनासाठी पुस्तक मागण्यासाठी त्यांच्याकडे जाता येत नव्हते. कारण जीएंच्या सर्व पुस्तकांचे प्रकाशक होते पॉप्युलर प्रकाशनाचे भटकळ. त्या संबंधात ढवळाढवळ करून लेखकाला आपल्याकडे ओढणे हे माझ्या मनाला पटणारे

नव्हते.

यादरम्यान वडिलांच्या पश्चात परचुरे प्रकाशन मंदिरासाठी मी कुसुमाग्रज, विंदा करंदीकर व वसंत बापट यांची बालवाचनाची पुस्तके काढायला घेतली होती. त्याच्या चित्रांचे काम पुण्याचे एक चित्रकार सुभाष अवचट यांच्याकडे दिले होते. हे चित्रकार मला एकदा म्हणाले, "तुम्ही लहान मुलांसाठी पुस्तकं काढता, जी. ए. कुलकर्णी यांच्या अशा दोन कथांची एक कॅसेट माझ्याकडे त्यांनी दिली आहे. त्यातली 'मुग्धाची रंगीत गोष्ट' ही मी आमच्या दिवाळी अंकासाठी घेतली आहे. जीएंना तिचं पुस्तक काढायचंय. तुम्ही त्यांना पत्र पाठवून विचारा."

पण विचारणार कसे? कारण यादरम्यान जीएंबद्दल जी माहिती मिळाली होती ती उत्साहजनक नव्हती. ते कुणाला भेटत नाहीत, अलबत्या-गलबत्याला जवळ करीत नाहीत; ते एकलकोंडे आहेत, ते माणूसघाणे आहेत, अशी त्यांच्याविषयी दहशत बसेल अशीच माहिती माझ्या कानांवर आली होती.

पण हिंमत करून मी जीएंना पत्र पाठवले. मनात विचार होता, या निमित्ताने आपणाला त्यांना भेटता तर येईल. अर्थात या पत्रात मी धारवाडला केव्हा येऊ, आपली भेट व्हावी अशी फार इच्छा आहे, वगैरे लिहायला विसरलो नाही.

हे सर्व करताना मी 'मुग्धाची रंगीत गोष्ट' वाचून काढली. एवढा मोठा घनगंभीर लेखक मुलांच्या गोष्टी लिहितो हेच मला अजब वाटत होते. परंतु मुग्धाची कथा वाचली, आणि मला असे दिसून आले की जीएंचे वेगळेपण, त्यांचे लेखन-सामर्थ्य बालवाङ्मयातही तेवढेच प्रभावी होते. बालवाङ्मय किती उत्कृष्ट असू शकते त्याचा तो नमुना होता.

तेवढ्यात जीएंचे उत्तर आले; पण त्यात जीएंनी माझी हवाच काढून घेतली होती. "तुम्ही अगत्याने पाठवलेले पत्र मिळाले. पण हे पत्र त्याविषयी नाही. सध्या माझ्या हालचाली अत्यंत अनिश्चित झाल्या आहेत, व अमुक दिवशी मी धारवाडला असेनच असे नाही. तेव्हा सध्या इकडे धारवाडला येण्याचा बेत नको. एकंदरीने काही निश्चित ठरल्यानंतर मी पुन्हा लिहीत आहे."

नोकरीच्या कामासाठी मोठ्या आशेने जावे, आणि नोकरी देणाऱ्याने "आत्ता चला तुम्ही, मागाहून कळवतो" म्हणून हात हलवीत परत पाठवावे त्यातला प्रकार होता. जीएंची भेट झाल्यावर त्यांच्याशी काय बोलायचे, कसे इंप्रेशन

मारायचे वगैरे मी आखलेले सगळे मनसुबे त्या पत्राने कोसळले.

पण मी धंद्यातला माणूस. अशी चिकाटी सोडून कसे चालेल? काही दिवस गेल्यानंतर मी जीएंना पुन्हा पत्र पाठवले, पण त्या पत्रात मी इतर कसलाही उल्लेख न करता फक्त त्यांच्या प्रकृतीविषयी विचारणा केली होती. या पत्राला मात्र त्यांनी लगोलग उत्तर पाठवले. ते असे :

"यापूर्वी मी लिहू शकलो नाही याबद्दल क्षमा करा. त्या विलंबाचे कारण माझा उद्धटपणा असा गैरसमज नको. पुढील औषधोपचारासाठी काय करायचे याबद्दल सल्ला घेत इकडेतिकडे जात मी सतत फरफटतच गेलो. त्यामुळे 'मुग्धाची कथा' हा विषय तसाच सोडावा लागला. तिच्याबाबत तुमच्याशी बोलायला मला वेळ (किंवा स्वास्थ्य) मिळाला नाही. ट्रीटमेंटला जाण्यासाठी मणिपाल (दक्षिण कॅनरा), बंगळूर व पुणे यांमधून निवड करावी लागणार होती. स्वास्थ्याच्या दृष्टीने इतर दोन ठिकाणे मला आवडली असती. पण अनेक व्यवहारी अडचणींमुळे पुण्याखेरीज गत्यंतर नाही असे दिसते. काही नक्की ठरल्यावर मी तुम्हांला पुन्हा लिहीनच."

या पत्रातील "औषधोपचारासाठी काय करायचे याबद्दल सल्ला घेत मी फरफटतच गेलो," या शब्दांनी मी अस्वस्थ झालो. म्हणजे यांच्या प्रकृतीत तसाच काही मोठा बिघाड झाला होता. ट्रीटमेंटसाठी धारवाड सोडून जावे लागणार ही तर काळजीची बाब होती. जीएंना पुण्यात येण्याची इच्छा का नाही, असाही एक प्रश्न मला पडला. पण अनिच्छेने का होईना, त्यांना पुण्यात यावे लागणार असे दिसते, हे वाचून त्याही परिस्थितीत मला बरे वाटले.

एक गोष्ट निर्विवाद होती की, पुस्तक प्रकाशनाच्या व्यवहाराबद्दल बोलणे करण्याची ही वेळ नव्हती. तेव्हा त्या विषयाचा उच्चार न करता त्यांना अशा स्थितीत पत्र पाठवून दिलेल्या तसदीबद्दल क्षमायाचनेचे पत्र मी त्यांना पाठवले. आश्चर्य म्हणजे त्याचे उत्तर जीएंनी उलट टपाली पाठवले. त्यात त्यांनी लिहिले होते : "तुम्ही फार तत्परतेने माझ्या पत्राला उत्तर पाठवले याबद्दल फार आभारी आहे. 'मुग्धाची रंगीत गोष्ट' ही एका कॅसेटवरून घेतल्याने बरीच डिफेक्टिव्ह आहे व मी ज्या मूळ स्वरूपात लिहिली ती छापील तर्जुम्यापेक्षा थोडी दीर्घ आहे. जर ती पुस्तकरूपात प्रसिद्ध व्हायची असेल तर ती मला मूळ स्वरूपातच हवी."

पुढे दृष्टिदोषाच्या उपचारासाठी पुणे किंवा बंगलोर हे अजून ठरायचे आहे, या

गोष्टीचा पुनरुच्चार करून त्यांनी असेही लिहिले होते की, उपचार-काळात मला कुणालाही भेटता येणार नाही, अशी डॉक्टरांची सक्त सूचना आहे. पण याच पत्रात त्यांनी 'मुग्धाच्या रंगीत गोष्टी'च्या प्रसिद्धीबद्दल विनयाने जी विचारणा केली होती त्याने मी चकित झालो. खरे म्हणजे हा असा एक लेखक होता की, त्याने आज्ञा करावी, स्वतःच्या अटी सांगाव्या, आणि प्रकाशकाने त्या आनंदाने पाळाव्या, एवढा त्याचा अधिकार होता. पण तरीही पत्रात ते लिहीत होते : "आता मी 'मुग्धाच्या रंगीत गोष्टी'बद्दल काही विचारले तर आपणास अडचणीत टाकल्यासारखे होणार नाही, अशी मला खात्री आहे. आपणाकडून जर हे छोटे पुस्तक प्रसिद्ध झाले तर मला आनंदच आहे. तेव्हा या व्यवहाराच्या आर्थिक बाजूबद्दल तुम्ही मला काही कल्पना देऊ शकाल का ? सध्याच्या स्थितीत आउट-राइट सेल मला जास्त सोयीचा वाटेल. मी हे स्वातंत्र्य घेऊन खाजगी रीत्या विचारीत आहे, ते केवळ सर्वसाधारण कल्पना यावी म्हणूनच. तेव्हा निःसंकोचपणे आपण लिहावे. तुमचे उत्तर म्हणजे काही लीगल डॉक्युमेंट नव्हे; त्यातील काहीही तुम्हांला बंधनकारक राहणार नाही. त्या गोष्टी नंतर (कंटाळवाण्या चोख रीतीने !) ठरवता येतील."

मला हे कळेना की, "स्वातंत्र्य घेऊन खाजगी रीत्या विचारीत आहे," हे उद्‌गार जीएंनी का काढावे ? एवढ्या मोठ्या लेखकाने प्रकाशकाशी अशा भाषेत बोलावे हे अघटितच होते. वडलांच्या प्रकाशन धंद्यात मला अनेक मराठी लेखकांना जवळून पाहण्याची संधी लाभली होती. पण अशा विनम्र भाषेत लहानसहान लेखकसुद्धा बोलताना मी ऐकले नव्हते. त्यामुळे जीएंच्या या संकोची भाषेने जीएंविषयीचा माझा आदर वाढला. "सध्याच्या स्थितीत आउटराइट सेल मला जास्त सोयीचा वाटेल," हे वाक्य तर कमालीचे बोलके होते. एक तर त्यांची प्रकृती फार नाजुक बनली होती, आणि त्यामुळे मिळेल तिथून पैसा हवा होता असे असेल का ? छेः ! जीएंसारख्या लेखकावर अशी पाळी कशी येईल ? का प्रकृतीच्या नाजुकपणामुळे ते असे लिहीत असतील ? मी लगोलग उत्तर पाठवले, "आपण सांगाल त्याप्रमाणे मी व्यवहार पुरा करीन. आपली अपेक्षा कळवावी. कुठल्याही प्रकारचा करारनामा करण्याची आवश्यकता नाही. (आपणास हवा असेल तर मी तो अवश्य करीन.) कारण कागदावरील करारापेक्षा परस्परांच्या विश्वासातून निर्माण झालेल्या भावनिक कराराला मी अधिक महत्त्व देतो."

परंतु या पत्राला खूप दिवस लोटले तरी त्यांच्याकडून काही उत्तर आले नाही. औषधोपचारासाठी ते कुठे जाणार किंवा गेले—काहीच कळत नव्हते. दरम्यान प्रकाशित करण्याच्या दृष्टीने 'मुग्धाची रंगीत गोष्ट' मी पुन्हा वाचून काढली. ही मुग्धा आणि तिच्या जीवनातील ते विलक्षण प्राणी-विश्व लहान मुलांइतकेच मोठ्या माणसांनाही मुग्ध करून सोडील असे आहे. एवढेच होते की त्यातल्या काही जागा थोड्या अवघड वाटत होत्या. शेवटही थोडा सुलभ करून तो मोठ्यांच्या मदतीशिवाय मुलांच्या थेट डोक्यात उतरावा असे काही करता येईल का, हेही मला त्यांना विचारायचे होते. पण त्यांच्या उत्तराचा पत्ता नव्हता. करारनामा करण्याचीसुद्धा गरज नाही असे मी लिहिले त्याने तर काम बिनसले नाही ना? पण "आपणास हवा असला तर मी तो अवश्य करीन. आणि कागदावरील करारापेक्षा परस्परांच्या विश्वासातून झालेल्या कराराला मी अधिक महत्त्व देतो," असेही मी लिहिले होते. त्या शब्दामागची भावना जीएंना कळणार नाही असे कसे होईल? अर्थात मला पुस्तक हातचे जाईल हा पेच नव्हता. मला हवा होता जी. ए. कुलकर्णी या महान लेखकाशी परिचय. त्यांचे जवळून दर्शन. पुस्तक गेले म्हणजे तेही गेले असा हा पेच होता.

अखेर सहा महिन्यांनी जीएंचे पत्र आले. या पत्रावरून ते मधल्या काळात पुण्यात येऊन राहिले आहेत, हे कळून आले. माझ्या लेखी ही सर्वांत महत्त्वाची बाब होती. या पत्रात त्यांनी आपल्या पुण्यातील निवासाचा पत्ता आणि टेलिफोन नंबरही दिला होता. तो पत्ता होता पुण्यातील त्यांच्या बहिणीचा—सौ. नंदा पैठणकर यांचा. म्हणजे यांचे पुण्यातील वास्तव्य तेथे होते. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे या पत्रात त्यांनी प्रत्यक्ष भेटीची इच्छा व्यक्त केली होती. याच भेटीसाठी तर मी आसुसलेला होतो. त्यामुळे मला अतिशय आनंद झाला.

मधल्या काळात मी त्यांचे कथासंग्रह मिळवून त्यांच्या अनेक कथा वाचल्या होत्या, आणि जीए हे मराठीतील अजोड लेखक आहेत याबद्दल मला शंका उरली नव्हती. त्यामुळे त्याच्या भेटीचा योग असा जवळ आल्यावर माझी अवस्था भांबावून गेल्यासारखी झाली.

आपण लेखक नाही, अभ्यासक नाही. आपण नुसते वाचक. आपण त्यांच्याशी बोलणार काय? उद्या त्यांनी विचारले, "तुला 'स्वामी' एवढी आवडली म्हणतोस, तर सांग बघू काय समजलं तुला त्यात?" तर काय उत्तर देणार?

त्यांच्या असल्या दोन प्रश्नांत आपण आडवे होऊ.

पण पत्रातील पुढचा भाग वाचून माझी भीती कमी झाली. पुढे त्यांनी लिहिले होते : " आपल्याकडे जी दोन हस्तलिखिते आहेत त्याबद्दल सध्या काय परिस्थिती आहे, हे विचारण्यासाठी मी हे पत्र लिहीत आहे. त्या हस्तलिखितांबद्दल जर विचार बदलला असेल तर अगदी निःसंकोचपणे, मनमोकळेपणाने ती परत पाठविण्यास देखील तुम्ही कोणत्याही तऱ्हेने मनात किंतू बाळगू नये. "

गंमत अशी की मला हस्तलिखित निःसंकोचपणे परत पाठवा असे सांगताना स्वतः जीएंच संकोची बनले होते. म्हणे " हस्तलिखितावद्दल जर विचार बदलला असेल तर परत पाठवा ! " मनात म्हटले, एवढ्या मोठ्या लेखकाच्या मनात असा विचार आलाच कसा ? अरे, हे तर अस्सल सोने आहे. ते कोण परत करील ? तुम्हांला असे वाटलेच कसे ?

एक गोष्ट नक्की झाली. पत्रावरून जीए संकोची किंवा भिडस्त वगैरे असावे असे वाटले. अशा गृहस्थांबद्दल भीती कसली वाटायची ? आपण काही त्यांच्या कथेवर शहाणपणा करणार नाही आहोत.

त्यांनी आपली दोन हस्तलिखिते माझ्याकडे पाठवून दिली होती हे खरे, पण त्याबाबत प्रकाशक लेखक म्हणून काही बोलणे लिहिणे झालेच नव्हते. सहा महिने त्यांच्याकडूनच काही कळले नाही म्हणून मी त्यांच्या पत्राचीच वाट बघत होतो.

पण मधल्या काळात त्यांना प्रकृतीबाबत त्रास झाला असेल, औषधोपचारांच्या चिंतेत इकडे लक्ष द्यायला जमले नसेल, हे लक्षात घेऊन मी लगेच फोन उचलला. म्हटले, " जीएसाहेब, तुमची दोन्ही पुस्तकं मी काढणार आहे. ती काळजीच नको. पण पुस्तकं काढण्यापूर्वी एकदा आपली भेट झाली पाहिजे ना ? व्यवहार, चित्रं, छपाई वगैरेसंबंधी बोलणं करूया, आणि मग काढूया. "

त्यावर जीए म्हणाले, " आता मी पुण्यातच आहे, उपचारासाठी. तेव्हा केव्हा कसं भेटायचं सांगा. "

" मी पुण्यात येतो आणि तुम्हांला भेटतो, " असे बोलून मी भेटीचा दिवस आणि वेळ ठरवून घेतली.

फोन खाली ठेवता ठेवता जीएंनी विचारले, " नक्की ना ? "

म्हटले, " नक्की नक्की. "

तेव्हा म्हणाले, " मी वाट पाहतो. "

"वाट पाहावीच लागणार नाही. ठरल्या वेळी हजर आहे." असे उत्तर देऊन मी फोन ठेवला खरा. पण बराच वेळपर्यंत ते शब्द माझ्या डोक्यात रेंगाळत होते. आपण "वाट पाहतो" म्हणतो त्यामागे एक घरगुतीपणा, थोडी आपुलकी, उत्सुकता वगैरे भाव असतात. कधी न पाहिलेल्या माणसाबद्दल हे भाव दाखवणे हे उच्च घरंदाजकीचे लक्षण मला वाटले. जीएंबद्दलच्या आदरात भर पडली.

महाराष्ट्रातील बहुतेक लेखक कुठे ना कुठे पाहण्याचा योग आलेला होता. पण जीएंचा फोटो सुद्धा कुठे कधी पाहायला मिळालेला नव्हता. त्यामुळे न पाहिलेल्या थोर व्यक्तींबद्दल त्यांच्या ऐकीव लौकिकावरून जे एक काल्पनिक चित्र डोळ्यांसमोर सारखे येत राहते तसे चित्र समोर उभे राही. का कोण जाणे, पण जीए हे उंच, शिडशिडीत, चलाख आणि काही प्रमाणात हसतमुख असतील असे मला वाटत होते. पण प्रत्यक्षातले जीए आडव्या अंगाचे, वजनदार, डोळ्यांवर गॉगल चढवलेले आणि काहीसे सावध असे वाटले.

ठरल्या वेळी मी जीएंच्या निवासस्थानी पोचलो. हे बंगलेवजा घर त्यांचे मेहुणे श्री. पैठणकर यांचे. त्यातली पहिल्या मजल्यावरची खोली जीएंच्या स्वतंत्र वास्तव्यासाठी दिली होती. तिथे फोन होता. हे घर निवांत जागी होते. माणसांची वर्दळ नव्हती. घर झाडीत लपल्यासारखे होते, आणि भोवतीचे आवाज माणसांपेक्षा पक्ष्यांचे जास्त होते.

आश्चर्य म्हणजे आमच्या स्वागतासाठी ते खाली रस्त्यावर येऊन उभे राहिले होते. हे म्हणजे फार झाले. शहरी जीवनात असे स्वागत-बिगत कोण करीत बसतो? आपण एखाद्या व्यक्तीला आपल्याकडे बोलावतो तेव्हा पत्ता आणि (खरोखरच तो यायला हवा असेल तर) खाणाखुणा सांगून सोडून देतो. अगदी नव्या भेटी-गाठीत सुद्धा आपण रस्त्यावर येऊन स्वागत करीत नाही. आणि इथे तर जीएंसारखे थोर लेखक माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या स्वागताला हसतमुखाने हजर झाले होते.

अनेक माणसांना चुकवणारे म्हणून प्रसिद्धी पावलेले जीए जन्मात ज्याची कधी गाठही नाही त्याचे आगत-स्वागत करण्यासाठी जातीने घर सोडून रस्त्यावर येतात, हे पाहून मी थोडा संकोचून गेलो. वास्तविक मी एक नवा प्रकाशक. त्यांना खरे तर नव्या प्रकाशकाची गरजच काय? त्यांच्या पाठी पॉप्युलर

प्रकाशनासारखी मोठी प्रकाशन संस्था उभी होती. त्यांचे काय नडले होते माझ्यासाठी? पण जीए या बाबतीतही चार-चौघांतले दिसत नव्हते. त्यांनी "या–या" म्हणून उच्चारलेल्या शब्दांतही घरंदाज, स्वागतशील संस्कृतीतून आलेली रीतभात होती.

मला काय बोलावे कळेना. मी म्हटले, "तुम्ही कशाला खाली आलात?"

"खाली नाही आलो." जीए पटकन म्हणाले, "बाहेर आलो. चला आत. अहो, पहिल्यांदा येताय तुम्ही माझ्याकडे."

घरात येता येता त्यांनी मला विचारले, "हे बरोबर कोण?"

"हा माझा भाऊ चंद्रकांत. त्या दिवशी फोनवर तुम्हांला बोललो होतो ना? हा इथे पुण्यात असतो म्हणून? तो हा."

"अच्छा अच्छा, हे काय करतात?"

"मी नोकरी करतो. आयुर्विमा महामंडळात." चंदूनेच परस्पर उत्तर दिले.

"ठीक आहे." ते म्हणाले, "म्हणजे आमच्या क्षेत्रातले नाहीत?"

"नाही–नाही." मी हसून म्हटले.

जीएंनी आम्हांला वरच्या मजल्यावर नेले. जीएंच्या खोलीबाहेर मोकळी गच्ची होती. झाडांची सावलीही होती. तिथे चार खुर्च्या टेवल्या होत्या. मधोमध एक टेवल होते आणि त्यावर भरतकाम केलेला स्वच्छ टेबलक्लॉथ पसरला होता. चार खुर्च्यांपैकी एक कोचवजा ऐसपैस खुर्ची होती. मला ती वेगळी वाटली. स्वतः जीए आम्हांला "बसा-बसा" म्हणत होते. पण ते बसल्याशिवाय आपण बसणे हे शिष्टाचाराला सोडून होते. म्हणून जीएंना मी त्या मोठ्या खुर्चीकडे निर्देश करून बसण्याची विनंती केली. का कोण जाणे, पण मला ती खास त्यांची खुर्ची असावी असे वाटले.

"मी बसतो हो–पण तुम्ही तर बसा ना–" असे करीत शेवटी ते त्या खुर्चीत आणि त्यासमोर मांडलेल्या दोन खुर्च्यांत आम्ही बसलो.

तेवढ्यात त्यांच्या भगिनी प्रभाताई तिथे आल्या. जीएंनी त्यांच्याशी आमची ओळख करून दिली. पत्ता शोधण्यात त्रास तर झाला नाही ना, वगैरे प्राथमिक विचारपूस झाली. मी बरोबर त्यांच्यासाठी कँपातून खास प्रकारची बिस्किटे आणली होती. एक सुंदर आवरण घालून बिस्किटांचा तो पुडा मी जरा सजवला होता. तो मी त्यांना देण्याकरता पुढे केला, पण त्यांनी हात पुढे केलाच नाही.

गॉगलमुळे त्यांच्या चेहऱ्यावरचा भावही दिसत नव्हता. मी गोंधळात पडलो. म्हटले, "घ्या ना."

तेव्हा जीए म्हणाले, "नाही. मी असं काही कुणाकडून घेत नाही."

"का?"

का म्हणजे—घेतलं की सर्वोकडून घ्यावं लागतं. घेतलं की त्याची परतफेड करावी लागते. दर वेळी आपणाला ते जमत नाही."

मी म्हटले, "दर वेळी नाही. ही आपली पहिलीच भेट आहे."

"मग त्यात ही भेट कशाला मध्ये?"

या उत्तरावर काय बोलावे मला सुचले नाही. मी चंद्रकांतकडे पाहिले, त्याने माझ्याकडे पाहिले, आणि तो विषय तिथेच सोडून दिला. विषय बदलून मग मी विचारले, "अखेर तुम्हांला पुण्यात यावं लागलं."

"हो—" जीए म्हणाले. "इथे सर्व सोयी आहेत ना?"

मी म्हटले, "त्या कमी पडल्या तर मुंबई सुद्धा इथून जवळ आहे."

"हो, तेही आहेच." प्रभाताई म्हणाल्या. "त्या सगळ्याचा विचार करूनच आम्ही इकडे आलो."

मी म्हटले, "चांगलं केलंत."

जीए म्हणाले, "तेवढंच नाही. मुख्य म्हणजे राहण्याची व्यवस्था, आपली माणसं हेही आलं ना? हे घर आहे माझ्या बहिणीचं. नंदा पैठणकर. आत्ता बाहेर गेलीय. त्यांच्यातलीच एक खोली त्यांनी मला दिली आहे. प्रभावतीलाही हे सोयिस्कर आहे. असा सगळा विचार करून तुमच्या पुण्याला आलो."

मी हसून म्हटले, "पुणं माझंही नव्हे. आमची मुंबई. पण जाऊन-येऊन राहायला पुणं मला आवडतं."

"कायमच्या वास्तव्याला नाही!" असे म्हणून ते किंचित हसल्यासारखे वाटले. पण त्यांच्या डोळ्यांवर गॉगल होता. त्याच्या मागचे काही कळत नव्हते.

नंतर त्यांच्या आजारपणाची चौकशी केली. तो मुख्यतः दृष्टीचा होता. डोळ्यांनी एकाएकी खूप कमी दिसू लागले होते. धारवाड-हुबळीच्या डॉक्टरांना डोळे दाखवले. दृष्टीला रक्तपुरवठा करणारी एक नस कुठे दुखावली गेली आहे किंवा अधू बनली आहे असे निदान झाले होते.

नियतीने केलेला हा जबर आघात होता. दृष्टीच अधू झाली आहे म्हटल्यावर

जीएंसारख्या लेखकाची स्थिती काय झाली असेल कल्पनाच करवेना. उभे आयुष्य वाचन–लेखनात घालवल्यावर उत्तरायुष्यात काय हा प्रसंग ? दृष्टीला रक्तपुरवठा करणारी नस दुखावली गेली किंवा अन्यतः ती नीट चालत नाही, असे असूनही जीएंच्या बोलण्यात कमतरता नव्हती. तिसऱ्या कुणाच्या डोळ्यांना काही झाले असावे अशा थाटात जीए आपल्या डोळ्यांबद्दल बोलत होते.

काही तरी बोलायचे म्हणून मी म्हटले, "आता तुम्ही पुण्यात प्रत्यक्ष राहायलाच आलाय. इथे राहून पुण्याचा काय अनुभव येईल ते खरं."

"प्रत्येक गोष्टीचा अनुभव घ्यावा लागत नाही, अप्पासाहेब."

मध्येच मला ते असे 'अप्पासाहेब' म्हणायचे. मला लाजल्यासारखे व्हायचे. मी म्हटले, "मी साहेब कसला ? साहेब खरे तर तुम्ही—"

यावर ते म्हणाले, "आपली अजून एवढी दोस्ती झालेली नाही. दोस्ती झाली की साहेब आपोआप गळून पडेल !"

नंतर प्रभाताईंच्या बोलण्यातून असे कळले की जीएंचे धारवाडवर फार प्रेम होते. ते सोडून जायचे त्यांच्या फार जिवावर आले होते. पुण्याला येताना आणखी दोन गोष्टी त्यांना मनाविरुद्ध कराव्या लागल्या. एक म्हणजे आपली आवडती स्कूटर त्यांना विकावी लागली होती. दुखणेच डोळ्यांचे म्हटल्यावर वाहन चालवणे बंद. त्यातून पुण्याची रहदारी. आपल्या स्कूटरवर जीएंचे फार प्रेम. तो त्यांच्या जीवनाचा एक भाग बनला होता. वा. भ. बोरकरांकडे गोव्याला गेले तेसुद्धा स्कूटरवरून. होता होईतो स्कूटरची पाठ ते सोडीत नसत. तिची देखभाल, किरकोळ दुरुस्ती ते स्वतः करीत. त्यासाठी स्कूटर-दुरुस्तीचे एक पुस्तकही त्यांनी घेतले होते. त्यांना सर्वच व्यवहार लेखी हवे असत. साधा निरोप द्यायचा असला तरी तो लेखी आणि आवश्यक त्या अचूक तपशीलासकट असा त्यांचा खाक्या होता. पण आता या साऱ्यावर गदा आली होती.

जीएंचा पुस्तकांचा संग्रह मोठा होता. त्यांतली त्यांची खास पुस्तके सोडून बाकी त्यांनी कर्नाटक विद्यापीठाला देऊन टाकली. अशा तऱ्हेने ती 'काढून' टाकावी लागली याचे दुःख सोवतीची माणसे दुरावल्यासारखे होते. प्रभाताईंच्या बोलण्यावरून असे दिसले की, जीएंना धारवाड सोडून कुठेही जाण्याची इच्छा नव्हती. त्या गावाच्या अणुरेणूबद्दल त्यांना आत्मीयता होती. ते राहत होते तो परिसर, घराचे आवार, घराच्या भिंती, भोवतीचे झाड-झुडप यांच्याशी त्यांचे

एक नाते जुळले होते. त्यातून आपले जीवन बाहेर काढायला ते तयार नव्हते. पण प्रकृतीपुढे त्यांना ते सगळे विसरावे लागले!

ते ज्या खुर्चीत बसले होते ती खुर्ची त्यांची अतिशय लाडकी होती. धारवाडहून त्यांनी ज्या काही मोजक्या चिजा आणल्या होत्या त्यात ही खुर्ची महत्त्वाची. सुरुवातीला मला ते बसा म्हणाले तेव्हा ती खुर्चीच पुढ्यात होती. पण मी तो शहाणपणा केला नाही. तिची टेवण, तिची जागा, तिच्या पाठीवरचे खास वस्त्र, सर्व काही ही खुर्ची जीएंचीच आहे हे उघड करीत होते. हा त्यांचा दरबार होता आणि ती खुर्ची हे त्यांचे सिंहासन होते.

या आमच्या पहिल्या भेटीत 'मुग्धाची रंगीत गोष्ट' आणि 'बखर बिम्मची' ही त्यांची बाल-वाङ्मयाची दोन पुस्तके त्यांनी प्रकाशनार्थ माझ्याकडे दिली. त्यापूर्वी प्रकाशित केलेली कुमार वाङ्मयाची आमची पुस्तके मी बरोबर घेतली होती. ती मी त्यांना दिली. त्यात आचार्य अत्र्यांचीही दोन होती. ती पुढे करीत मी म्हटले, "ही आम्ही छोट्या मुलांसाठी काढलेली पुस्तकं आहेत. ही तुम्ही ठेवा."

"वाः! वाः!" असे म्हणून त्यांनी तत्काल हात पुढे केला.

प्रारंभी माझ्याकडून त्यांनी बिस्किटांचा पुडा घ्यायचे नाकारले होते, त्याची इथे मला आठवण झाली. मी काही बोललो नाही. मला फक्त हसू आले. ते पाहून जीए म्हणाले, "का? ही भेट मी कशी घेतली याचं तुम्हांला आश्चर्य वाटलं असेल ना? ही मी घेतो, कारण पुस्तकांची परतफेड मला केव्हाही करता येते."

यावर चंदूसकट आम्ही तिघेही हसलो. मला बोलायला त्यांनी काही वावच ठेवला नव्हता.

त्यांना दिलेल्या पुस्तकांत आचार्य अत्र्यांचे 'फुले आणि मुले' हे पुस्तक होते. ते पाहून ते म्हणाले, "अरे हो! अत्रे तुमचे लेखक नाही का?" त्यांना अत्र्यांविषयी बरेच कुतूहल दिसले. त्या 'अवाढव्य मनुष्या'बद्दल ते बराच वेळ बोलत होते. याचे कारण आचार्य अत्रे हे राम गणेश गडकऱ्यांना गुरू मानीत. गडकरी हे जीएंचेही श्रद्धास्थान. आचार्य अत्र्यांची 'झेंडूची फुले' जीएंना फार आवडत. ही त्यांची आवड त्यांच्या 'माणसे : अरभाट आणि चिल्लर' या पुस्तकात उमटली आहे.

आश्चर्य म्हणजे इतका वेळ गेला तरी पुस्तकाच्या व्यवहाराबद्दल ते काहीच

बोलत नव्हते. अखेर मी त्यांना विचारले, "पुस्तक कसं काढायचं? तुमच्या काही खास सूचना—"

"खास काही नाही."

"चित्राचं?"

"कुणाचं चित्र घेणार? तुमचा चित्रकार कोण आहे?"

"आमचे बरेच चित्रकार आहेत. पण 'मुग्धाची गोष्ट' मी श्याम जोशींकडे चित्र काढायला देणार आहे. चालेल का?"

"चालेल. चित्र दाखवाल ना एकदा?"

"ओ येस. चित्र दाखवणारच. जीएसाहेब, मी प्रकाशनाचा प्रत्येक व्यवहार दाखवून आणि चोख बोलून करतो." आणि मुद्द्याला हात घालून विचारले, "मानधनाचं कसं?"

त्यांच्या बोलण्यावरून असे दिसले की, या पुस्तकाच्या अपेक्षित मानधनाचे पैसे आगाऊ एकरकमी घेऊन त्यांना सर्व हक्क माझ्या स्वाधीन करायचे होते. मला आश्चर्य वाटले. मी म्हटले, "असं का करता? एक म्हणजे याच्या किती आवृत्त्या होतील सांगता येत नाही. एक रक्कम ठरवणार कशी? आणि उद्या मानधनाची आगाऊ रक्कम एकदा तुम्ही घेऊन बसलात, आणि आवृत्त्या जास्त निघाल्या म्हणजे? मागून हळहळ वाटत राहील. पैसे म्हणाल तर पहिल्या आवृत्तीचं संपूर्ण मानधन १५ टक्केप्रमाणे—मी तुम्हांला आगाऊ देतो. सर्व हक्क कशाला सोडता?"

"आजपर्यंतची सर्व पुस्तकं मी पॉप्युलर प्रकाशनाला अशीच दिली आहेत. सर्व हक्क विकून."

"आजवर तुम्ही तसं केलं असेल. पण मला ते बरोबर वाटत नाही."

"पण मी देतोय ना?"

"कशाला? जीएसाहेब, तुम्ही एवढे मोठे लेखक. तुम्हांला असं करण्याची आवश्यकताच काय? माझं ऐका, तुम्ही सगळे हक्क सोडू नका. पैशाची काही अडचण आहे का?"

"छे छे. तसं काही नाही." जीए म्हणाले, "त्याचा हेतू एकच आहे, मला माझ्या पश्चात माझी वहीण प्रभावती हिच्या मागं या कटकटी नकोयत. तिला त्रास होऊ नये. नंतर यावरून भांडणं, कटकटी वगैरे काही नको."

तरीही मी त्यांना म्हटले, " कटकटी नको म्हणून तुम्ही झाडच मुळापासून तोडायचं असं करू नका. सर्व हक्क स्वाधीन करू नका. "

यावर ते " बरं " म्हणाले. माझी सूचना त्यांनी मान्य केली.

यादरम्यान प्रभाताईंनी चहा आणि बिस्किटे आणून समोर ठेवली. माझे लक्ष मी आणलेल्या बिस्किटांच्या पुड्याकडे गेले. तो तसाच पडून होता. जीएंचा तो नकार मला पटला नव्हता. " वस्तूंची परतफेड करावी लागते ती आपल्या हातून होत नाही, म्हणून आपण कुणाकडून वस्तू घेत नाही— " हे त्यांचे उत्तर मला मुळीच पटले नव्हते. ते संकोचामुळे माझी भेट नाकारताहेत असे मला वाटत होते. मी काही न बोलता फक्त चहाचा कप उचलला. चंद्रकांतनेही तेच केले.

" अहो, बिस्किटं घ्या ना. " पण आम्ही तिकडे लक्ष न देता चहा पीतच राहिलो. तेव्हा जीए हसत म्हणाले, " हे बरोबर नाही, परचुरे. एकानं गाय मारली म्हणून दुसऱ्यानं वासरू मारायचं हे चांगलं नाही. "

" पण मला एक सांगा साहेब, तुम्ही आम्हांला तसं सांगितलंत, आम्ही गप्प बसलो. एवढ्या प्रेमानं आम्ही वस्तू आणली हे तुम्ही लक्षात घेतलं नाही— "

यावर जीएंनी सरळ तो पुडा उचलला आणि म्हणाले, " मान्य. घेतला. आता सुरू करा. "

अशा तऱ्हेने चहा-पाणी झाले. ते संपून थोडे इकडचे तिकडचे बोलणे होते तोपर्यंत प्रभाताईंनी वर खोबरे पेरलेले पोहे आणून समोर ठेवले. शिवाय वाटीभर वेगळे खोबरे होतेच. म्हटले, " हे काय ? "

" पोहे. "

" अहो, पण थोड्याच वेळापूर्वी चहा-बिस्किटं झाली. "

" ती कसली ? बिस्किटं फुस्की. " जीए पोह्यांची बशी पुढे करीत म्हणाले, " काही तरी दमदार खाणं नको का ? गप्पा मारायच्या म्हणजे अंगात दम पाहिजे. चला, सुरू करा. "

खोबऱ्याच्या वाटीकडे पाहून मी विचारले, " तुम्ही मूळ कारवारकडचे. म्हणजे दिवसाला एक नारळ पुरत नसेल ? "

" आम्ही असा हिशेब ठेवून नारळ फोडत नाही. " जीए म्हणाले, " पण आता ते सगळं विसरायला हवं. "

" का का ? "

"तुमच्या पुण्यात आल्यावर आम्हांला एक भलताच शोध लागलाय."

"कसला?" हा प्रश्न चंद्रकांताचा. मी नसलो तरी तो पुणेकर बनला होता ना? तो कसा ऐकून घेईल?

"नारळ फक्त सणासुदीला वापरायचा असतो."

त्यानंतर जीए पुण्यातील रीतीरिवाज आणि धारवाडकडील रीतीरिवाज यांतील तफावतीवर बरेच गमतीदार बोलले. पुण्यात सतत चालू असणाऱ्या सार्वजनिक वा सांस्कृतिक कार्यक्रमांविषयी त्यांना भलते कुतूहल होते. दररोज या इतक्या कार्यक्रमांना वक्ते व श्रोते कुठून मिळतात, असा त्यांना प्रश्न पडला होता. शेवटी ते म्हणाले, "उद्या मला जर शिंक आली तर पूर्वेकडे तोंड करून शिंकावे की पश्चिमेकडे, असा परिसंवाद ठेवला तर त्यालाही वक्ते आणि श्रोते कमी पडणार नाहीत!"

जीएंचे कथा-वाङ्मय दुःखाने आणि गांभीर्याने भरलेले असले तरी ह्यांना विनोदाचेही खास अंग आहे हेही हळूहळू लक्षात येऊ लागले. हेही कळून आले की, त्यांच्याजवळ मराठी साहित्यिकांच्या विविध वर्तुळांतील घडामोडींचा अमाप साठा आहे. मला याचे आश्चर्य वाटले. साहित्यिक वर्तुळात न वावरता, तिकडे धारवाडला कन्नड मुलखात वसून मराठी साहित्यिकांच्या आत-आतल्या वातम्या नि किस्से या गृहस्थाजवळ येतात कुठून? मला सुद्धा माहीत नसलेल्या मुंबई-कडल्या काही लज्जतदार गोष्टी जेव्हा त्यांच्या तोंडून ऐकल्या तेव्हा तर मी चकितच झालो. म्हटले, "हे एवढं ताजं आणि खमंग मटीरियल तुम्हांला कोण पुरवतं?"

"ते सोडा—" असे म्हणून त्यांनी तो विषय तिथेच संपवला.

नंतर धाडस करून मी त्यांच्या कथांवद्दलही काही शंका विचारल्या. ज्या कथा डोक्यावरून जातात त्यांचे काय करायचे असा प्रश्न विचारला. तेव्हा म्हणाले, "पुन्हा पुन्हा वाचायच्या. तरीही नाही कळल्या तर सोडून द्यायच्या. सर्व गोष्टी सर्वांसाठी नसतात."

'स्वामी' कथा तुम्हांला कशी सुचली, असे मी विचारले. त्यावर जीएंनी सांगितलेली हकीगत अशी: एकदा सिगारेटी आणण्यासाठी म्हणून ते घराबाहेर पडले. तिथून परतताना समोरून त्यांच्या परिचित डॉक्टरांची गाडी आली. डॉक्टरांनी जीएंना विचारले, "आज तरी वेळ आहे का थोडा?"

" थोडा—आहे. कशाला ? "

" युनिव्हर्सिटीमागच्या तळघरात एक मठ आहे, तो तुम्हांला दाखवायचाय."

बरेच दिवस हे डॉक्टर जीएंना तो मठ पाहण्याचा आग्रह करीत होते. आज जीए तयार झाले. म्हणाले, " चला—जाऊ. "

पण सिगारेटी आणण्यासाठी म्हणून बाहेर पडलेले हे गृहस्थ घरी परतेपर्यंत दुपार टळून गेली. जीए अविवाहित होते, परंतु घरी काळजी करणाऱ्या दोन बहिणी होत्या. एरवी जीएंचे एकूण राहणे-वागणे घड्याळासारखे. अमुक वाजता घरी येणार म्हणजे येणार. अमुक वेळी बाहेर पडणार म्हणजे बाहेर पडणार. दुसऱ्याला दिलेली वेळ ते स्वतः तंतोतंत पाळत असत. साहजिकच दुसऱ्याने दिलेली वेळ त्यानेही पाळावी यावर त्यांचा कटाक्ष होता. असे असता त्यांनीच एवढा उशीर करावा हे आश्चर्य होते. पण तरीही बहिणींनी जीएंना त्याबद्दल खोदून काही विचारले नाही. स्वतः जीएही दिवसभर आपल्याच तंद्रीत वावरत होते. दुसऱ्या दिवशी सकाळी चहा पिताना त्यांनी बहिणींना आपण काल कुठे गेलो होतो हे सांगितले. त्यानंतरच्या काही दिवसांतच जीएंनी त्या मठाचा उपयोग करून ' स्वामी ' ही कथा लिहिली.

जीए हे अत्यंत सूक्ष्म दृष्टीचे लेखक. आपली कथा कागदावर मनासारखी उतरण्यासाठी ते ती तीन-तीनदा लिहून काढायलाही कसूर करीत नसत. एकेका प्रसंगासाठी, एकेका शब्दासाठी ते अडून बसत. काही तरी घुसडून वेळ भागवण्याची त्यांची वृत्ती नव्हती. हवे ते हवे तसेच उमटल्याशिवाय त्यांची कथा पुरी होत नसे. हे सर्व त्यांच्या तोंडून ऐकल्यानंतर माझा या थोर लेखकाबद्दलचा आदर वाढला.

जीए आपल्याशी इतक्या मोकळेपणाने कधी बोलतील असे स्वप्नातही वाटले नव्हते. ते मनमोकळेपणाने बोलत होते, आणि माझा अवघडलेपणा कमी होत होता. प्रत्येक प्रश्नाला ते निःसंकोचपणे उत्तर देत होते. कसलाही आडपडदा नव्हता. समोरच्या माणसाला कटवण्याची घाई नव्हती. ताठा नव्हता, आढ्यता नव्हती. थोड्याच वेळात बोलणे इतके मोकळे बनले की जणू त्यांची-आपली खूप जुनी ओळख आहे.

बोलता बोलता मी त्यांना विचारले, " जीएसाहेब, एक विचारू का ? "

" विचारा ना. एक लक्षात ठेवा, जीएसाहेब नाही—जीए ! "

मी धीर करून विचारले, "तुमच्या बऱ्याच कथांमध्ये साप आढळतो याचं कारण काय?"

यावर जीए म्हणाले, "याला कारण कसलं आलंय?" आणि एकदम मला त्यांनी उलट प्रश्न विचारला, "जयवंत दळवींच्या नाटकांमध्ये आणि कथांमध्ये एखादा वेडा का असतो असं त्यांना तुम्ही कधी विचारता का?"

मला या प्रश्नाचा नेमका सूर कळला नाही. ते गंभीरपणे विचारीत होते की थट्टेने विचारीत होते हे कळत नव्हते. मी अर्थात त्यावर काही बोललो नाही. हसून सोडून दिले. तेवढ्यात ते म्हणाले, "बऱ्याच गोष्टींत म्हणजे किती? काही थोड्या गोष्टींत असेल, त्याला काही कार्यकारणभाव असणार."

आपण फार बोललो का? आपल्या हातून जीएंचा अधिक्षेप झाला का?— असे वाटून मी म्हटले, "सॉरी—"

"सॉरी काय? कशाबद्दल? तुम्ही काही घोडं नाही मारलंत." आणि मग एकाएकी माझ्यावरोबर आलेल्या चंद्रकांताकडे वळून जीएंनी विचारले, "हे तुमचे बंधू गप्प गप्प का?"

खरे तर हा प्रश्न मलाही पडला होता. कारण आमचे हे बंधुराज एवढा वेळ गप्प बसून राहणारे नव्हेत. पण मी काही बोलण्याआधी चंदूच बोलला, "छे--- गप्प असं नाही. मी माझं काम करतोय."

"तुमचं काम?"

"ऐकण्याचं."

यावर जीए मनापासून हसले. म्हणाले, "ऐकण्याचं तरी खरं ना? मला वाटलं, तुम्ही बोअर झाला असाल—"

"छे छे!" चंदू हसून म्हणाला, "काय तरीच काय?"

मग जीएंनी त्याची विचारपूस केली. काय करतोस, कुठे राहतोस, सर्व काही विचारून घेतले. या सर्व प्रश्नांची उत्तरे दिल्यावर चंदू पटकन म्हणाला, "मी तुमच्या प्रांतातला नव्हे."

"मग कुठल्या प्रांतातले?" जीएंनी हसून विचारले.

"आमचा प्रांत कारकुनी. आम्हांला तुमच्या साहित्यातलं काहीच कळत नाही."

जीए हसून म्हणाले, "एवढं तरी कळतं ना? चांगलं आहे."

पण त्याही पुढे जाऊन चंदू म्हणाला, "खरं सांगू जीएसाहेब? मला जेव्हा अप्पानं तुमच्याकडे जायचंय असं सांगितलं तेव्हा मी म्हटलं, कोण जी. ए. कुलकर्णी? मी कुठे नाव पण ऐकलेलं नाही." पुढे तर म्हणाला, "खरं सांगतो, मी तुमची एक सुद्धा कथा वाचलेली नाही. अप्पा चल म्हणाला म्हणून मी इथं आलो."

चंदूचे हे बोलणे ऐकून मी एकदम गप्पच झालो. म्हटले, हे ऐकून जीएंना काय वाटेल? ते काय म्हणतील? पण आश्चर्य म्हणजे जीएंना काही वाटले नाही. ते म्हणाले, "काही बिघडलं नाही. तुम्ही कोरे, आम्ही कोरे, तुमचं–आमचं चांगलं जमेल."

तेवढ्या अवधीत चंदूने त्यांच्याशी असे काही सूत जमवले की मी बाजूला राहिलो. त्याने त्यांना आपला ठावठिकाणा, फोन नंबर—सर्व काही दिले. घरचा पत्ताही दिला. "पुण्यात तुम्हांला काही लागलं-सवरलं तर हा नंबर फिरवा. मी येत जाईन..." वगैरे सांगून मोकळा झाला. बोलता-बोलता चंदूने त्यांच्याशी एवढी दोस्ती जमवली की मला काय बोलावे कळेना. तो काहीही विचारीत होता आणि तेही आडपडदा न ठेवता मोकळेपणाने उत्तरे देत होते, काही काही समजावून सांगत होते. मला तर सिंहाच्या आयाळीतून बिनधास्त फिरणाऱ्या उंदराची आठवण झाली.

चंदूला बरोबर आणण्यातला माझा हेतू अपेक्षेपेक्षा जास्त सफल झाला. प्रथम भेटीत चंदू हा त्यांच्या-माझ्यामधला दुवा बनला. एक तर जीएंची दृष्टी बिघडल्यामुळे त्यांच्या हालचालींवर बंधने आली होती. उपचारांसाठीच तर ते पुण्याला आले होते, आणि आले होते तेही मोठ्या नाखुषीने. पुण्याबद्दल त्यांना खात्री वाटत नव्हती. घरात त्यांचे पाहणाऱ्या फक्त दोन बहिणी प्रभाताई, नंदा पैठणकर, आणि त्यांचे यजमान श्री. पैठणकर. या दृष्टीने चंदू असा काही धडपड्या-लटपट्या आहे की तो कुठेही, केव्हाही उपयोगी ठरतो. त्याच्या ओळखी-देखी पुण्यात खूप होत्या. काही ठिकाणी तर त्याला ओळखही लागत नाही. म्हणूनच जीएंना मी म्हटले, "तुम्हांला कसली अडचण आली, कसलाही प्रॉब्लेम आला तर तुम्ही फोन करून चंदूला कळवा. मीही आहेच."

पुन्हा केव्हा भेटायचे वगैरे ठरवून आम्ही बाहेर पडलो तेव्हा तीन तास संपले होते. पंधरा-वीस मिनिटांत ही भेट संपेल असे वाटले होते. पण प्रत्यक्षात जीए

भलतेच बोलके, मोकळे आणि प्रेमळ निघाले. कोणालाच कोणाचा कंटाळा आला नाही. उलट झालेली ओळख दाट करायचा मनोमन निश्चय आम्हा तिघांच्याही बोलण्यातून प्रगट होत होता. मनात आले, जीए एवढे दिलखुलास आणि गप्पिष्ट आहेत असे कोणाला सांगितले तर आपल्यावर कोणी विश्वास तरी ठेवील का ? अशा व्यक्तीला माणूसघाणी कोण म्हणेल ?

निघताना मी त्यांच्या पायांना हात लावून नमस्कार करण्यासाठी वाकलो. पण जीएंनी झटकन पाय मागे घेतले. म्हणाले, " छे छे ! माणसानं माणसाच्या पाया पडायचं हे मला मुळीच आवडत नाही. "

मी गोंधळून म्हटले, " माणसाच्या नाही— "

" मग कोणाच्या ? " जीएंनी हसून विचारले.

" आदरणीय व्यक्तीच्या. तुम्ही मला गुरूसमान आहात. "

" छे छे ! " आणि त्यांनी मला नमस्कार करू दिला नाही. म्हणाले, " आदरणीय-विदरणीय ते देवळात. इकडे तसलं काही नाही. "

तरीही मी आणि चंदू दोघांनी वरच्यावर पण लवून नमस्कार केला आणि लवकरच पुन्हा भेटण्याची बोली करून बाहेर पडलो.

२

विनम्रता

पहिल्या भेटीत जीएंच्या घरी खाल्लेल्या पोह्यांची आठवण बरेच दिवस मनातून जात नव्हती. मुंबईत परत आल्यावर मी बायकोपुढे, आईपुढे त्या पोह्यांचे रसभरित वर्णन केले. यावर आमच्या घरात तसे पोहे झाले, त्यावर आम्ही भरपूर खोबरे घातले. पण त्यांना प्रभाताईंनी केलेल्या पोह्यांची लज्जत आली नाही. एकेकाची हातोटी असते किंवा बनावटीत काही वेगळे असते. एवढेच झाले, त्या दिवसापासून आमच्या घरी खोबऱ्याचा वापर वाढला!

जीएंची प्रकृती हा एक काळजीचा विषय होता. बरे, आपल्यापासून दुसऱ्याला कसलीही तोशीस पडणार नाही याबद्दल गृहस्थ कमालीचे जागरूक. संकोचही त्याच तोडीचा. फोन करून मधून मधून मी चौकशी करीत होतो. पण बरं आहे, ठीक आहे यापलीकडे काही कळत नसे. मी मुंबईत, ते पुण्यात. तिकडे 'मुग्धाची रंगीत गोष्ट' छपाईला दिली होती, पण ती चित्रांसाठी अडकून पडली होती. जीएंची प्रत्यक्ष भेट व्हायला निमित्त मिळत नव्हते. अशात एक दिवस आमच्या कोकणातल्या घरून दर वर्षीप्रमाणे नारळाचे पोते आले. ते पाहिल्यावर मला जीएंची आठवण झाली. त्यातले दहा-पंधरा नारळ घेऊन पुण्यात गेलो, आणि रिक्षात घालून ते जीएंच्या घरी आणून टाकले. घरचे ताजे नारळ पाहून जीएंना काय बोलावे तेच कळेना. ते एवढे संकोची की भारावल्यासारखे झाले. म्हणाले, "बसा आधी."

पण मी बसण्याच्या तयारीने गेलो नव्हतो. मीही तसा संकोची, भिडस्तच. मी आगाऊ फोन करून गेलो नव्हतो, त्यामुळे नारळ द्यायचे आणि परत फिरायचे या हिशेबाने मी रिक्शावाल्याला खाली थांबवून ठेवले होते. हे सांगितल्याबरोबर जीए माझ्याकडे पाहतच राहिले. म्हणाले, "असं कुठे झालंय का? तुम्ही माझ्याकडे यायचं आणि तसंच निघून जायचं?"

"पण मी फक्त नारळ पोचवण्यासाठी आलोय— "

"पोचवण्यासाठी ?" जीएंनी विचारले. "कुणी दिलेयत हे ?"

"कुणी नाही. आमच्या घरचे आहेत हे— "

"मग पोचवण्यासाठी काय म्हणताय ? बसा बसा." असे म्हणून ते रिक्शाचे बिल द्यायला निघाले होते, पण तिथपर्यंत मी त्यांना जाऊ दिले नाही.

परत आल्यावर पहिल्यासारखीच ही बैठकही रंगली. अर्थात जास्त करून तेच बोलत होते. मी आपला शिकवणीला आलेल्या मुलासारखा बसून ऐकत होतो. धारवाडपासून मुंबई-पुण्यापर्यंत मनमोकळ्या गप्पा झाल्या. त्यांचे धारवाडप्रेम मधून मधून वर येत होते. धारवाड सोडून ते पुण्याला यायला तयार नव्हते, हे मला कळले होते. पण पुण्यावर ते एवढे नाखूष का हे कळत नव्हते. परिचय चांगला वाढल्यावर त्यांच्याकडून हे एकदा आपण काढून घेऊ, असे म्हणून मी तो विषय त्या वेळी सोडून दिला. तेवढ्यात प्रभाताईंच्या हातचे ते रसरशीत पोहे आले. वर गुहागरहून आलेल्या ताज्या ओल्या नारळाची सढळ पेरणी होतीच.

आपल्या कथाविश्वातील शब्दवापराप्रमाणे खाद्यविश्वातही जीए अतिशय चोखंदळ होते, हेही दिसून आले. ते म्हणाले, "नारळा-नारळांत फरक असतात. खोबऱ्याची नारळागणिक चव वेगळी असते. पण ठोकळ मानाने खोबऱ्याचे तीन प्रकार असतात."

हे ज्ञान नवीन होते. मी म्हटले, "आम्हांला खोबऱ्याचे फक्त दोन प्रकार माहीत आहेत."

"कोणते ?"

"ओलं आणि सुकं."

यावर जीए हसले. म्हणाले, "ते प्रकार नव्हेत. कोवळं, लुसलुशीत आणि खरखरीत असे खोबऱ्याचे तीन प्रकार असतात. कोवळं खोबरं फक्त फणसपोळी-बरोबर खायचं असतं, लुसलुशीत खोबरं पोह्यांवर किंवा उपम्यावर पेरायचं असतं, आणि खरखरीत खोबरं भाजी-आमटीत टाकायचं असतं."

खाण्यातील हे बारकावे ऐकून मी थक्क झालो. जीएंची रसिकता केवळ त्यांच्या कथासाहित्यापुरती मर्यादित नव्हती, याचा हा पहिला प्रत्यय होता.

"ही वस्तू इथे म्हणजे इथेच हवी आणि ती वस्तू तशी म्हणजे तशीच हवी, अध्ये-मध्ये चालत नाही— " हा जीएंच्या बोलण्यातला आशय होता. खाजगी

बोलण्यातही वायफळ शब्द नव्हते. एखादी गंमत सांगून झाली की— " हे ऑफ द रेकॉर्ड वरं का ! " हे शब्द त्यांच्या तोंडून नकळत बाहेर पडत. म्हणजे प्रत्येक गोष्ट फार खाजगीच असे असे नाही. पण ती एक त्यांच्या बोलण्याला सवय झाली असावी. खुषीत असले की " बघा बुवा ! " किंवा " हे आपलं तुमचं फारच बुवा ! " अशीही एक लकब त्यांच्या बोलण्यात वारंवार येई, पण हातचे राखून बोलण्याचा प्रयत्न या दोन्ही बैठकींत दिसला नाही. मला तर ते मोकळे वाटले, मनाचे उमदे वाटले. आढ्यता, आढेवेढे वगैरेंचा मागमूसही दिसला नाही.

या भेटीत ' बखर बिम्मची ' या छोट्या मित्र-मैत्रिणींसाठी त्यांनी लिहिलेल्या गोष्टींबद्दल मी त्यांच्याशी बोललो. माझ्या प्राथमिक स्वरूपाच्या शंकांचेही त्यांनी चोख शब्दांत निराकरण केले. बालवाङ्मयासंबंधी बोलताना मला आठवले की, जीए लेखन मराठीत करीत असले तरी ते प्राध्यापक इंग्रजी भाषेचे होते. हे लक्षात आल्यावर मी त्यांना विचारले, " तुम्ही इंग्रजीत लिहिता की नाही ? "

" लिहू शकतो, पण लिहीत नाही. आणि मातृभाषा ती मातृभाषा. ती आपोआप बाहेर पडते. तसं दुसऱ्या भाषेत होत नाही. आता बसलो तर इंग्रजी लिहिणार नाही असं नाही. पण पत्रांखेरीज तसं लिहावं असं कधी मनात आलेलं नाही. "

माझ्या डोक्यात एक विचारणा होती. याच सुमाराला लंडनचे शशिकांत देव मुंबईत आले होते. ते लंडनमध्ये इंग्रजी कथा-कथन करीत असतात. शाळा किंवा अशाच काही संस्थांतून ते लहान मुलांचे ' स्टोरीटेलर ' बनले आहेत. या गोष्टी सांगून झाल्या की तिथली पालक मंडळी या गोष्टींची पुस्तके कुठे मिळतील याची चौकशी करीत. शशिकांत देव या गोष्टी मुलांना आपल्या भाषेत सांगत. ते पुस्तक कुठून आणणार ?

आचार्य अत्रे यांच्या ' फुले आणि मुले ' या पुस्तकातील गोष्टी लंडनमध्ये श्रोत्यांना खूप आवडल्या होत्या, आणि त्यांना त्यांचे इंग्रजी पुस्तक हवे होते. देवांनी मला हे पुस्तक कोणी इंग्रजी करून देईल का, असे विचारले होते. यासाठी जीए हे नाव मला एकदम आठवले. कारण जीए हे इंग्रजीचे केवळ प्राध्यापक नव्हते, तर निवडक इंग्रजी पुस्तकांच्या वाचनाने आणि व्यासंगाने ते त्या भाषेचे एक अधिकारी विद्वान बनले होते. शिवाय ते स्वतः श्रेष्ठ दर्जाचे कथालेखक होते. पण एवढ्या मोठ्या लेखकाला हे काम सांगायचे कसे ? तरी पण मला राहवले नाही. मी भीत भीत विचारले, " आचार्य अत्र्यांचं ' फुले आणि मुले ' पुस्तक

तुम्ही वाचलंय का ?"

जीए म्हणाले, "हो. तुम्हीच ना पहिल्या खेपेला आणून दिलंत ?"

"अरे हो !" मी म्हटले. "कशा वाटल्या गोष्टी ?"

"चांगल्या आहेत."

तेव्हा मग मी माझ्या मनातला प्रश्न बाहेर काढला, "तुम्ही त्या इंग्रजीत भाषांतर करून द्याल का ?"

"तुम्ही प्रकाशित करणार का ?"

"बघू. असा विचार आहे." आणि मग शशिकांत देव यांनी केलेली विचारणा मी जीएंच्या कानांवर घातली.

जीएंनी ते लगेच मान्य केले. पण ज्या विनम्रपणे त्यांनी हे काम करतो म्हणून सांगितले तो मला त्यांचा मोठेपणा वाटला. ते म्हणाले,

"आधी 'दिनूचे बिल' ही त्यातली पहिली कथा भाषांतर करण्याचा मी प्रयत्न करतो. ती बरी वाटली तर मग पुढचं पाहू."

मी मनात म्हटले, 'कुणाला बरं वाटलं तर ? मला ? एवढं मला कळलं असतं तर मी इथे थांबलो नसतो. इंग्लिश पुस्तकं प्रकाशित केली असती.'

जीएंनी दिल्या शब्दाप्रमाणे 'दिनूचे बिल' ही कथा भाषांतरित करून आठ-दहा दिवसांनंतरच्या माझ्या पुढच्या खेपेत माझ्या ताब्यात दिली. देवांच्या म्हणण्याप्रमाणे भरपूर चित्रे घालून प्रत्येक गोष्टीचे एक स्वतंत्र रंगीत पुस्तक काढायचे होते. जीए मला म्हणाले, "तुम्ही आधी हे एक पुस्तक प्रकाशित करा. त्याला कसा काय प्रतिसाद मिळतो ते बघा आणि मग उरलेल्या गोष्टींची भाषांतरं करण्याचं पाहू." या भाषांतरित कथेसोबत त्यांनी मला एक चिठी दिली होती, ती सुद्धा किती बोलकी आहे पाहा :

"सोबत मी 'Dinu's Bill' चा एक प्रयत्न पाठवत आहे. तो मला सर्वांत जास्त समाधानकारक वाटतो म्हणून नव्हे, तर सर्वांत कमी असमाधान-कारक वाटतो म्हणून. येथे वेळेचाही प्रश्न असल्याने घाई करावी लागली. याबाबत आपण चर्चा केलीच आहे. हे 'व्हर्शन' इतरांना जरूर दाखवावे व पूर्ण निःसंकोचपणे निर्णय द्यावा."

जीएंकडून असल्या विनम्रतेची मी कधी अपेक्षाच केली नव्हती. मी तर मनाशी असे योजले होते की, जीएंनी 'फुले आणि मुले' तील सर्व गोष्टी सलग-

पणे भाषांतर करून द्याव्या. भाषांतराच्या गुणवत्तेबद्दल मला कसलीही शंका नव्हती.

त्यांनी केलेले भाषांतर मला अतिशय आवडले. आचार्य अत्र्यांच्या भाषेतील साधेपणा त्यांनी त्यात अलगद उतरवला होता. तो पाहून मला असे वाटले की, एका कुपीतले उत्तर दुसऱ्या कुपीत ओतले गेले आहे. सुगंधात कुठेही उणेपणा आलेला मला जाणवला नाही. मात्र जीएंनी त्यात आपले काही खास गंध मिसळले आहेत.

मूळ 'दिनूचे बिल' या छोट्या कथेत दिनूचे वडील डॉक्टर आहेत. एक दिवस ते रोग्यांच्या औषधांचे बिल करताना तो पाहतो, आणि तेवढ्यावर त्याच्या डोक्यात एक कल्पना उमटते. तो मग आपण आईसाठी केलेल्या कामांचे बिल तयार करतो, आणि ते आईला सादर करतो. आई रात्री त्याच्या उशाशी त्याने दिलेल्या बिलाचे पैसे आणि ते बिल दोन्ही ठेवते. पण त्याच्याच सोबत आणखी एक बिल ठेवलेले असते. हे बिल आईने आपल्या दिनूसाठी आजवर काय काय केले त्या गोष्टींचे असते. पण प्रत्येक गोष्टीचे पैसे जिथे मांडायचे तिथे ती "काही नाही," "काही नाही" असे लिहून ठेवते. खाली सगळ्या कामांची एकूण रक्कम अर्थातच "काही नाही" अशीच येते!

इथे दिनूच्या डोक्यात कुठे तरी प्रकाश पडतो. आई-वडील आपल्यासाठी इतके सर्व करतात, आणि त्याबद्दल ते काहीही घेत नाहीत, हे त्याच्या डोक्यात येते. मग आईने दिलेल्या आपल्या बिलाचे पैसे घेऊन तो आईकडे जातो. ते तिच्या स्वाधीन करतो आणि तिच्या मांडीवर डोके ठेवून स्फुंदू लागतो. आई दिनूला कुरवाळून त्याचा मुका घेते आणि सांगते, "तुझ्या बिलाचे पैसे मिळाले बरं का दिनू!"

पण जीएंनी भाषांतर करताना तिचा मूळ गाभा कायम ठेवला असला तरी त्यात आपली भर घातली आहे. त्यात त्यांनी वडलांच्या दवाखान्यातल्या कंपौंडरचे एक नवीन पात्र भरले आहे. हा कंपौंडर नेहमी खिडकीच्या आत दडलेला असतो. यां कंपौंडरच्या जाडजूड मिश्या, त्याच्या डोळ्यांवरचा तो एवढा मोठा चष्मा एवढेच दिनूला नेहमी दिसते. त्याची बोटे दिसतात, त्यातून नेहमी रोग्याच्या औषधाची बाटली आणि औषधी गोळ्यांच्या पुड्या बाहेर येताना दिसतात. पण पुरा कंपौंडर त्याला कधीच दिसत नाही. ती खिडकी छोटी

असते, त्यामुळे एवढ्याशा दिनूच्या डोळ्यांना आत बसून तो काय करतोय हे पाहायला कधी मिळत नाही.

प्रत्येक जण त्याला कंपौंडर म्हणतो. त्याचे नाव काय याबद्दल दिनूला फार कुतूहल असते. कंपौंडर हे काही माणसाचे खरे नाव असणार नाही, एवढे दिनूला कळते. तो ते बाबांना विचारतो. पण बाबा सांगतात ते नाव एवढे कठीण असते की दिनू ते लगेच विसरून जातो. आईला तर ते आठवतच नाही. "करायचंय काय? कंपौंडर म्हणजे काय ते प्रत्येकाला ठाऊक असते—" अशा अर्थाचे काही तरी सांगून दिनूला ती गप्प बसवते.

पण त्या कंपौंडरविषयीचे गूढ दिनूच्या मनातून जात नाही. अखेर एकदा तो हळूच मान तिथपर्यंत पोचवून त्या खिडकीतून आत डोकावतो. तेव्हा दिनूला फक्त त्याची पाठ दिसते. दिनूकडे पाठ करून तो मापाच्या काचभांड्यात कसले तरी लाल लाल पाणी ओतीत असतो. आणि त्याच्या भोवती कितीतरी प्रकारच्या आणि आकारांच्या औषधांनी भरलेल्या बाटल्या असतात. दिनूची नजर त्यात अडकलेली असतानाच एक घोगरा आवाज त्याला विचारतो, "अहो छोटे डॉक्टर, इथे काय आहे तुमचं?"

त्याबरोबर दिनू पटकन मागे येतो, आणि अंग एवढेसे करून खुर्चीत बसून जातो. तिथे सारखे रोगी येत असतात. दिनूचे बाबा त्यांना तपासतात, औषधे देतात आणि काही जणांना पथ्य म्हणून भरपूर दूध, सफरचंदे, द्राक्षे असे काही मस्त मस्त खायला सांगतात. ते ऐकून दिनूला वाटते, आपणाला सुद्धा कुठे काही दुखणार-खुपणार नाही असा एखादा आजार असावा आणि त्यातून बरे होण्यासाठी चॉकलेटे, आइस्क्रीम, गोड गोड केक आणि भरपूर जाम वगैरे पदार्थ पोटात गेले पाहिजेत, असे आपल्या डॉक्टर बडलांनी सांगावे. हे त्याचे म्हणणे ऐकून त्याचे डॉक्टर बडील एवढ्या मोठ्याने हसतात की कंपौंडरच्या खिडकीतून एक चकचकीत ग्लास खिडकीत येतो आणि एक मिनिटभर तिथेच रेंगाळतो.

पुढे दिनूच्या डोक्यात ती बिलाची कल्पना उभी राहण्यापूर्वी इथे जीएंनी अशी कल्पना त्याच्या डोक्यात उमटवून त्यासाठी लागणारी 'पूर्वतयारी' करून घेतली आहे. हे सर्व वातावरण उभे करून दिनूला 'उभा' केला आहे, त्याला वास्तव बनवला आहे, आणि मगच त्याच्या डोक्यात बिलाची कल्पना भरवली आहे. थोडक्यात सांगायचे तर अख्यांची ही कथा जीएंनी कशी लिहिली असती

त्याचे हे प्रात्यक्षिक वाटते.

पुढेसुद्धा वडलांना तो "बिल म्हणजे काय?" असे विचारतो, आणि वडील त्याला "आपण केलेल्या कामाचे पैसे" असे समजावून सांगतात, असा अन्यांच्या मूळ कथेत नसलेला तपशील भरून वाचणाराला किंवा ऐकणाराला "या एवढ्याशा मुलाच्या मनात अशी कल्पना एकदम येईल तरी का?" असे विचारायला वाव ठेवीत नाहीत.

पुढे दिनू बिल करायला घेतो, तेव्हासुद्धा जीए त्याला बिल करून मोकळा सोडीत नाहीत. एके ठिकाणी दिनू पाचाचा आकडा खोडून तिथे सात करतो. "बेकरीतून केक आणण्याबद्दल" (आणि त्यातला छोटासाही तुकडा आपण न घेतल्याबद्दल) असेही एक 'आयटेम' त्या बिलात घुसडतो.

एकदा त्याला असेही आठवते की, आपण तीन कपसुद्धा विसळून ठेवले होते. पण मग त्याच्या असे लक्षात येते की, त्यातल्या एका कपाचा कान आपल्या हातून तुटला आहे. मग आपण केलेल्या बिलात बरीच खोडाखोड झाली आहे, हे लक्षात आल्यावर तो ते टरकावून टाकतो आणि नवे स्वच्छ बिल बनवतो.

शेवटी तर जीएंनी अन्यांच्या या कथेला कंपौंडरच्या दुःखाची वेगळीच झालर जोडली आहे. या कंपौंडरचा मुलगा अकाली गेलेला असतो. आज तो असता आणि त्याने जर दिनूसारखे केल्या कामांचे बिल आपल्यापुढे ठेवले असते तर आपणाला अतिशय आनंद झाला असता; आपणालाही मग दिनूच्या आईप्रमाणे आपले बिल करून त्याला देण्याचा आनंद मिळाला असता; पण तसे घडायचे नव्हते, हे त्याचे दुःख जीएंनी दाखवले आहे.

दिनूच्या आईला त्याचे हे दुःख जाणवते. ती त्याला चहा देऊ करते. पण कंपौंडर थांबत नाही. त्याने दिनूसाठी एक अत्यंत लाल, गुळगुळीत आणि चकचकीत असा चेंडू आणलेला असतो. दिनूला हा चेंडू तो देतो आणि म्हणतो, "चहा नको. मला लवकर जायचंय. अशाच आणखी दोन छोट्या मित्रांना जाऊन भेटायचंय."

पुढे जीए लिहितात : "आपणाला घाई आहे असे तो म्हणाला खरा, पण त्याच्या निघून जाण्यात घाई नव्हती. धुळीने माखलेल्या जुनाट चपलांत त्याने कसेबसे आपले पाय अडकवले आणि तो दरवाज्याकडे गेला. दरवाजा ओढून घेताना त्याने बोटांनी आपले डोळे पुसून घेतले.

" आईने दिनूला जवळ ओढले, आणि छातीशी घट्ट कवटाळून धरले. दिनूच्या मनात अनेक प्रश्नांनी गर्दी केली. त्याच्या मुलाने त्याला बिल का दिले नाही ? तसं का घडायचं नव्हतं ? त्याच्या मुलाचं नाव काय असेल ?...

" पण आईच्या चेहऱ्याकडे त्याची नजर गेली आणि त्याच्या लक्षात आले की कसलेही प्रश्न विचारण्याची ही वेळ नव्हे. मग ते सारे प्रश्न निमूटपणे त्याच्या मनाच्या तळाशी जाऊन बसले. तो अजिबात काही बोलला नाही. आई एवढेच म्हणाली, ' बिचारा कंपौंडर. ' आणि तिचे डोळे पाणावले. " इथे जीएंनी ती कथा संपवली आहे.

जीएंच्या इंग्रजीचा नमुना म्हणून जीएंनी केलेला त्या कथेचा शेवट इथे मुद्दाम दिला आहे :

" Dinu, my bill is now fully paid and this is my receipt for it." She said and put a loving kiss on his wet cheek. इथे अन्यांची कथा संपते. दिनूचे हृदय आईने आपल्यासाठी केलेल्या कामांनी भरून येते, एवढे दाखवून अत्रे ती कथा संपवतात. आणि इथे जीए ती कथा आपल्या कक्षेत घेऊन तिला एक नवी दिशा देतात. आई दिनूला म्हणते, " And now look, who has come to meet you ! "

पुढे जीए लिहितात :

It was only then that he saw compounder sitting in the wicker chair. He was sitting straight on the edge of the chair, but very respectfully. He looked a bit frightened.

" So the young doctor has already started sending his bills. " he said.

His voice now was not the gruff, dispensary voice at all. As a matter of fact, he was not the dispensary compounder. He was wearing a long coat, and an old fashioned black round cap. Except his grandfather Dinu had not seen anybody wearing such a cap. His face was kindly, and his moustache and glasses did not look terrifying at all. He looked very friendly and Dinu liked him very much. He thought that compounder perhaps carried in his bulging coat pocket coloured pencils and peanuts, lollypops and

marbles. Perhaps he even knew stories about talking elephants, frogs becoming brave princes, and journeys to the moon and the Mars.

Compounder put his hand in his coat pocket and took out a transparent paper bag. He opened it carefully and took out a red plastic ball. It was the reddest, the smoothest and the brightest ball Dinu had ever seen, and he longed for it. "No hurry, young doctor. It is for you all right." Compounder said.

"He had seen it somewhere, and was pestering me about it for one full week. So I had decided to go out this evening, and get it for him; but you shouldn't have spent on it." Mother said.

"It is such a small, inexpensive thing." Compounder said, giving the ball to Dinu.

Compounder was quiet for a moment. Then he said in a low voice, almost to himself, "I would have liked my son also to have sent his bill to me. I would have loved to send my bill to him. But it was not destined to happen."

Mother said hurriedly, "Won't you have a cup of tea?"

"No, thank you. I must hurry. I have to meet two more young friends." Compounder said, getting up from the chair.

He said he was in a hurry, but he moved rather slowly. He pushed his feet clumsily in the old dusty chappals, and walked towards the gate. When closing the gate behind him, he wiped his eyes with his fingers.

Mother pulled Dinu to her, and held him very tightly. Dinu was filled with many eager questions, and he was impatient to ask all of them. Why did not his son give him his bill? Why did it not happen? What was the son's name?

One look at his mother's face told him that it was not the right time to ask her any questions, and all his questions sat down obediently in his mind. He did not say anything at

all. Mother simply said "Poor compounder!" and her eyes became moist.

जीएंनी केलेला हा शेवट म्हणजे 'जीए टच' आहे. इथे ती कथा अत्र्यांची आहे की जीएंची आहे असा प्रश्न पडतो. किंवा असे म्हणता येईल की, अशा कल्पनेवर जर जीएंनी कथा लिहिली असती तर ती कशी झाली असती याचा हा मासला आहे. त्यांनी ती कथा त्यांना हवी तशी शोकान्त केली आहे.

मी त्यांना विचारले, "तुम्ही केलेला शेवट मुलांना कळेल का?"

जीए म्हणाले, "न कळण्यासारखं त्यात काही नाही. आपल्याकडे मुलांच्या अशा कथा लिहिल्या जात नाहीत, त्यामुळे त्या कळतील की नाही असा प्रश्न पडतो. पण इंग्लिश मुलांना हा प्रश्न पडेल असं मला वाटत नाही."

मी जीएंनी केलेले हे भाषांतर बॅगेत घातले. या कथा शशिकांत देव यांनी इंग्लंडमध्ये मुलांत इतक्या लोकप्रिय केल्या होत्या की, त्या केवळ इंग्रजीतच नव्हे तर जर्मन भाषेतही प्रकाशित करण्याचा जबर महत्त्वाकांक्षी असा बेत मी आखला होता. नाही तरी मराठी पुस्तक प्रकाशनाच्या व्यवसायात फारसा अर्थ नसतो. हजार-दोन हजार पुस्तकांची आवृत्ती पाच-पाच वर्षांत सुद्धा संपत नाही. त्यापेक्षा इंग्रजी, जर्मन वगैरे भाषांत काही निवडक प्रकाशने करून मोठी उडी घ्यावी, असे एक मोठे स्वप्न माझ्या डोळ्यांसमोर येत होते. परंतु आंतरराष्ट्रीय प्रकाशक बनण्याची माझी ही कल्पना पत्र्यांच्या बंगल्यासारखी एका फुंकरीत कोसळली.

त्याचे काय झाले, खुद्द शशिकांत देव यांनीच नंतर मला असे कळवले की, इंग्लंडमधील एका बाईने आचार्य अत्र्यांच्या या बालकथांची प्रेरणा इंग्रजी बाल कथांतून घेतली असल्याची शंका बोलून दाखवली. आता अशी शंका काढल्यावर तुम्ही काय करणार? खुद्द आचार्य अत्रे असते तरच या शंकेचे निरसन झाले असते. पण ते ह्यात नाहीत म्हटल्यावर हा धोका कसा पत्करणार?

तेव्हा या कथा मुळात इंग्रज साहेबाच्या आहेत की मराठी साहेबाच्या आहेत हा वाद मी टाळला, आणि आंतरराष्ट्रीय प्रकाशक बनण्याच्या माझ्या महत्त्वाकांक्षेला तिथेच आवर घातला.

३

अर्पणपात्रिका

जीए पुण्यात येऊन राहिल्यानंतर माझा पुण्यात जाण्याचा आनंद वाढला. धंद्याच्या निमित्ताने माझी महिन्याभरात एखाद-दुसरी तरी खेप पुण्यात होतीच. त्यात जीएंची भेट हे एक आकर्षण होऊन बसले. याचे कारण जीए हे केवळ महान लेखक नव्हते. माणूस म्हणूनही ते तितकेच मोठे होते. माझ्याकडे ते केवळ एक प्रकाशक म्हणून पाहत नाहीत, तर संगतीतला, बैठकीतला एक निकटवर्ती म्हणून पाहतात याचा प्रत्यय पहिल्या एक-दोन भेटींतच मला आला होता. मी येणार असे कळले की त्या दिवशी ते माझी वाट पाहू लागले. मी तर त्यांच्या प्रत्येक भेटीसाठी उत्सुक होतोच.

केवळ महान लेखकाच्या सहवासात वावरण्याचाच प्रसंग आला असता तर जीएंच्या सहवासात मी तासभरसुद्धा टिकलो नसतो. पापणी न मिटता सूर्याकडे पाहत राहण्यासारखा हा प्रकार मला जमलाच नसता. ललित लेखक हा एक कलावंत असतो. आयुष्यात त्याने घेतलेली ती एक भूमिका असते. ती बाजूला केली की तो एक सुख-दुःखांनी भरलेला माणूसच असतो. जीएंच्या प्रत्येक भेटीत मला याचा सतत प्रत्यय येत गेला, तसतसे माझे मन जीएमय झाले.

त्यांच्याशी होणाऱ्या या गाठीभेटीत त्यांच्या मावसबहिणी प्रभावती सोलापूरकर व सौ. नंदा पैठणकर यांचाही चांगला परिचय झाला. सौ. पैठणकर या लग्न होऊन स्वतःचा संसार मांडून बसल्या होत्या. प्रभाताई अविवाहित होत्या. जीएंच्या तीन सख्ख्या बहिणी अकाली गेल्या होत्या. त्यामुळे जीएंचे या दोन भगिनींवर अलोट प्रेम. त्या दोघीही जीएंना प्राणापलीकडे जपत. जीए अविवाहित असून त्यांना सख्खे भावंड नव्हते. त्यामुळे त्यांची सगळी भिस्त या दोन भगिनींवर होती. प्रभाताईंच्या बोलण्यात-वागण्यात बंधुराजांविषयी नुसतेच प्रेम नव्हते, तर कमालीचा आदरही दिसून येत होता.

हळूहळू जीएंविषयी त्यांच्याकडून मला बऱ्याच गोष्टी कळत गेल्या. जीएंचा जन्म १० जुलै १९२३ या दिवशी बेळगावमधील कोनवाळ गल्लीत झाला. जीएंचे वडील बेळगावच्या कोर्टात कारकून होते. जीएंना कळायला लागण्याच्या आतच ते वारले. जीएंची आईही जीए शाळेत जाऊ लागल्यावर वारली. अशा तऱ्हेने आई-वडिलांच्या प्रेमाला ते अकाली मुकले. ते प्रेम काही अंशी भरून काढण्याचा प्रयत्न या दोन बहिणींनी केला. अर्थात खुद्द जीए या दोघींवर सख्ख्या भावाच्या प्रेमाची पाखर घालत होतेच.

एवढा मोठा कलावंत मुळात अविवाहित का राहिला असावा याचे मला कुतूहल होते. जीएंचे अकाली निधन झाले नसते आणि त्यांच्या-माझ्या परिचयाला दाट मित्रत्वाचे दालन लाभले असते तर जीएंनी माझे हे कुतूहल भागविण्याइतपत मन उघडे केले असते का? मला त्यांच्या अंतर्यामी एवढ्या जवळिकीची जागा लाभली असती का? असे प्रश्न कधी कधी माझ्या मनात उभे राहतात. पण माझ्या हिशोबी हे प्रश्न तेवढे महत्त्वाचे नाहीत. मला महत्त्व वाटते ते वेगळ्याच गोष्टीचे. एवढा मोठा कलावंत असून अविवाहित राहिला; असे असूनही आयुष्यात, रोजच्या जीवनात या माणसाच्या नावावर साधी चिडचिडही नाही, चमत्कारिकपणा नाही की विचित्रपणा नाही. विवाहित असूनही अनेक महान व्यक्तींच्या नावांवर नाही नाही त्या गोष्टींच्या नोंदी असलेल्या आपण सर्रास ऐकतो. पण जीएंचे आयुष्य तर एखाद्या व्रतस्थ योग्याचे वाटावे इतके स्वच्छ होते.

या महापुरुषाच्या तारुण्यात मोहाचे ते क्षण आलेही असतील, पण पुढील आयुष्यात त्याचे कुठे प्रतिबिंबही उमटलेले नाही. त्यांच्या रसिकतेत, तन्मयतेत, एकाग्रतेत कुठे खंड पडलेला नाही. उभ्या आयुष्यात त्यांनी जवळीक केली ती फक्त सिगारेटशी. ही जवळीक अशा तोडीची की सिगारेटचा आस्वाद घेत असताना त्यांना कुणी काही विचारलेलेही आवडत नसे. लेखन-वाचन हे तर त्यांचे सर्वस्वच होते. लेखन-वाचन चालू असताना दारावर कुणी साधी टकटक केलेली सुद्धा त्यांना नको असे.

आई-वडील अकाली कालवश झाल्यानंतरचे त्यांचे लहानपण बेळगावात मामांच्या घरी गेले. वाचनाचे वेड त्यांना लहानपणापासूनच होते. आश्चर्य म्हणजे त्यांना खेळण्यात फारसा रस नव्हता. मॅट्रिक झाल्यावर त्यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण हॉस्टेलवर राहून पूर्ण केले. आई-वडिलांचे अकाली निधन

आणि हॉस्टेलमधील कुटुंबहीन एकाकी जीवन यामुळे ते इतर आप्तेष्टांपासून किंवहुना समाजापासून सुद्धा विरक्त झाले असावेत, असे सकृद्दर्शनी वाटते. पण लहानपणी सुद्धा ते खेळात फारसे रमत नसत, यावरून विरक्ती, अलिप्तता ही त्यांच्या पिंडातच असावी असे मला वाटू लागले.

ते माणसांपासून दूर राहिले, माणसांत मोकळेपणाने मिसळले नाहीत, ते एकलकोंडे होते, अनेकांना ते वाऱ्याला सुद्धा उभे करीत नसत, वगैरे त्यांच्याविषयी अनेक प्रवाद मी ऐकत आलो होतो. पण मला स्वतःला तसा अनुभव एकदाही आलेला नाही. अर्थात मी त्यांच्याकडे एक आदरणीय व्यक्ती म्हणून पाहत होतो. एका काळी स्वातंत्र्यवीर सावरकर आणि आचार्य अत्रे या माझ्या आदरणीय व्यक्ती वा श्रद्धास्थाने होती. तेच स्थान जीएंनी घेतले होते. त्यांनी मला थोडे दूर ठेवले असते, अंतर ठेवून जर ते वागले असते तर मला त्यांच्या एवढे जवळ जाता आलेच नसते. मी गेलोच नसतो.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अखेरच्या दिवसांतली आपली शारीरिक दुर्बलता, आपली विकलांग अवस्था कोणाला दाखवण्याची इच्छा नसे. तसा काहीसा प्रकार जीएंच्याही बाबतीत मला अनुभवाला आला. प्रकृती जास्त बिघडली की त्यांना जवळ माणूस नको असे. आपल्यामुळे इतर कुणाला कसलाही त्रास पडू नये, आपल्यासाठी कुणाला खस्ता खाव्या लागू नयेत हा एक हेतूही त्यात होताच. एकदा पुण्याच्या माझ्या मुक्कामात मी त्यांच्या घरी फोन केला. फोनवर त्यांची प्रकृती ठीक नाही, तेव्हा तुम्ही आज येऊ नका, असे त्यांच्या बहिणींनी मला सांगितले. पोटदुखीचा जुना आजार बळावला होता.

पण प्रकृती बरी नाही, अशा वेळी तर आपण आपल्या माणसाकडे जातो, भेटतो, त्याला धीर देतो. काही लागले सवरले तर मदतीचा, सेवेचा हात पुढे करतो. तेव्हा मी त्यांच्या फोनवरच्या सांगीकडे दुर्लक्ष करून त्यांना भेटायला गेलो. मी बरोबर एक औषध नेले होते. जीए नेहमीसारखे मोकळेपणाने हसले नाहीत. पण ते पोटदुखीमुळे की नको म्हणतानाही मी आलो म्हणून ते कळले नाही. मी म्हटले, "मी एक औषध आणलंय."

"कसलं?" त्यांनी नाखुषीनेच विचारले.

"पोटात घ्यायचं नाही. पोटाला लावायचं आहे."

तरीही ते पण–पण करीत राहिले. मी मग तिकडे जास्त लक्ष दिले नाही.

औषध बोटांवर घेतले, आणि त्यांच्या पोटाला बळेबळेच चोळून लावले. त्यांना बोलायला अवधी दिलाच नाही. थोड्या वेळाने ते उठून बसले. त्यांचा चेहरा उपकाराच्या ओझ्याखाली सापडल्यासारखा दिसत होता. हळूहळू ते अधिकाधिक मोकळेपणाने बोलू लागले. काही दिवसांनी प्रभाताई मला म्हणाल्या, "तुम्ही अण्णाची थोडी पंचाईतच करून ठेवलीत."

म्हटले, "कशी काय?"

त्या म्हणाल्या, "त्या दिवशी तुम्ही थोडं बळजोरीनंच पोटाला औषध लावलंत. काही का असे ना, बरं वाटलं. नंतर माझ्याजवळ म्हणाला, हा मनुष्य इतरांपेक्षा वेगळा आहे. मी अण्णाला म्हटलं, तुला तर नवी गुंतवणूक नको झालीय. आणि परचुरे तर तुला गुरफटवतच चाललेयत!"

मी विचारले, "मग काय म्हणाले?"

"म्हणतोय कसला? हसला." मग प्रभाताई म्हणाल्या, "त्याला माणसं नकोत असं नाही. त्याला हवी तसलीच हवी असतात. एकदा माणूस आपल झालं की मग ते दिसलं नाही तरी अस्वस्थ."

आणि मग धारवाडची एक जुनी आठवण त्यांनी सांगितली. जीए तिथे राहत असत त्याच्या मागल्या बाजूला पठाण नावाचे गृहस्थ राहत असत. पठाणांना दोन मुली होत्या. त्या जीएंच्या दोन बहिणींच्याच वयाच्या. परंतु जीएंच्या अलिप्त राहणीमुळे या दोन घरांत शेजार-संबंधही नव्हते. या चौघींचे एकमेकींकडे पाहण्यापलीकडे बोलणे नव्हते. पुढे पठाणांच्या थोरल्या मुलीचे लग्न ठरले, तेव्हा ते मुलीच्या लग्नाचे आमंत्रण घेऊन जीएंकडे प्रथम आले. त्यानंतर या दोन घरांत संवाद सुरू झाला. परिचय वाढू लागला. पठाणांचा जावई नोकरीला आरमारात होता. तो तिकडे गेला की पठाणांची मुलगी धारवाडला वडिलांकडे येऊन राहायची. पुढे तिला मुलगा झाला. पठाणांना नातू झाला. हा नातू मोठा गोड होता. नंदा आणि प्रभाताई त्याला मधून मधून घरी आणून त्याचे कौतुक करू लागल्या. पुढे त्यांच्या घराचा त्या मुलाला एवढा लळा लागला की जीएही त्याच्या प्रेमात पडले. ते त्याच्याशी त्याच्या भाषेत बोलू लागले, त्याच्यासाठी खाऊ आणू लागले. त्याला आपल्याजवळ जेवायला बसवू लागले.

पुढे हा मुलगा जीएंच्यावर एवढा खूष की, जीए दुपारी एक वाजता कॉलेज-

मधून येईपर्यंत तो जेवायचा थांबून राही. ते घरी आल्याशिवाय घरातल्या दुसऱ्या कुणी काही दिले तरी तो ते घेत नसे. "अण्णा आले की मला देतील–" म्हणून नाकारायचा. पुढे अण्णांवर त्याने आपला अधिकार एवढा वाढवला की, इतर लहान मुलांना तो अण्णांच्या घरी येऊ द्यायचा नाही. जीए बागकामाला निघाले की हा निघाला त्यांच्या मागून बागेत. अण्णा करतील ते करायचे, तसे वागायचे एवढा तो जीएमय होऊन गेला, आणि जीए त्याच्यात गुंतून गेले. ही गोष्ट जीएंच्याबद्दल बरेच काही सांगून जाते.

प्रिय व्यक्तींबद्दल जीएंना विलक्षण जिव्हाळा होता. अशा माणसांबद्दल ते किती भावनाशील होते याची साक्ष त्यांच्या पुस्तकातील अर्पण-पत्रिका देतात. या सर्व अर्पण-पत्रिका एकत्र आणल्या तर काय दिसते पाहा. जीएंचे वडील जीएंच्या बालवयातच गेले. 'पिंगळावेळ' हा कथासंग्रह त्यांनी वडिलांना अर्पण केला आहे. त्या अर्पण-पत्रिकेत जीए वडिलांविषयी लिहितात :

> तीर्थरूप आबांस—
> डोळे उघडून उठून बसत मी तुम्हांला नीट पाहण्यापूर्वीच
> तुमची पावले उंबऱ्याबाहेर पडली होती.

पितृसुखाचे सोडाच, पण पितृमुखही पाहण्याचे भाग्य जीएंना लाभले नाही हे आपले दुःख त्यांनी इथे कोरून ठेवले आहे. 'हिरवे रावे' या कथासंग्रहातील अर्पण-पत्रिकेत अकाली कालवश झालेल्या आपल्या आईबद्दल (आईला ते ताई म्हणत) ते लिहितात :

> ताईस—
> रात्री उशिरा घरकाम करताना तुला सोबत व्हावी म्हणून
> लहानपणी मला समोर बसवून तू पुष्कळ कथा सांगितल्यास.
> आता तू गेल्यावर मला त्या कथांची सोबत आहे.

इथे जीए आईबद्दलचे आपले अंतर्याम उघड करतात, आणि आपल्यासमोर उभे आयुष्य घरकामाला वाहिलेली आई उभी राहते.

'काजळमाया' हा कथासंग्रह त्यांनी आपल्या मावशीला अर्पण केला आहे. या अर्पण-पत्रिकेत ते लिहितात :

सोनूमावशीस—
तू आम्हांला आणखी एक आई होतीस.

चार सूचक शब्दांत खूप काही सांगून जाणाऱ्या जीएंच्या ह्या अर्पण-पत्रिका हा सुद्धा त्यांनी मागे ठेवलेला एक अमोल ठेवा आहे. ते चार सूचक शब्द किती काय सांगून जातात याचा उत्कृष्ट नमुना त्यांनी आपल्या धाकट्या मामांना उद्देशून लिहिलेल्या अर्पण-पत्रिकेत पाहायला मिळतो. हे मामा त्यांच्या वयाजवळचे असावे. त्यांना ते राजा म्हणत. 'सांजशकुन' हा कथासंग्रह या मामांना अर्पण करताना त्यांनी लिहिले आहे :

राजास—
नवी माणसे घरात येण्यापूर्वीचे
केवळ जुनेच दिवस आपण आठवू.

'पारवा' या कथासंग्रहाच्या अर्पण-पत्रिकेत प्रभाताई व नंदाताई या दोन बहिणींना उद्देशून जीएंचे म्हणणे आहे :

—तरी देखील तुमची माया मला मिळते.

या 'तरी देखील'च्या मागे नेमके काय असेल हे आपणाला कळत नाही. त्या सख्ख्या नाहीत, तरी देखील ?— अशी एक शंका येते. पण खात्री नाहीच. आपण उगीच तिथे रेंगाळतो रेंगाळतो, आणि सोडून देतो. जीएंच्या कथा-विश्वातही अनेकांना अनेक जागा अशा सोडाव्या लागत असतात, तिथे याचे काय मोठेसे अशी आपण आपली समजूत घालतो. पण एखादी हरवलेली वस्तू मिळता मिळत नाही आणि मग जी बेचैन अवस्था होते तसे आपले होते.

'निळासावळा' हा कथासंग्रह जीएंनी इंदू, सुशी आणि जाई या तीन बहिणींना अर्पण केला आहे. जीएंच्या या सख्ख्या बहिणी अकाली कालवश झालेल्या होत्या. या बहिणींना पुस्तक अर्पण करताना जीएंनी फक्त तीन शब्दांत त्यांचे स्मरण केले आहे :

इंदू, सुशी व जाई—
या तीन आठवणींना.

त्या फारच अकाली गेल्या असतील का? आठवणींत राहण्यापलीकडे त्यांचा फारसा सहवास त्यांना मिळाला नसावा असे या तीन आठवणींवरून दिसते.

मुग्धा आणि मनीषा या जीएंच्या दोन भाच्या. 'मुग्धाची रंगीत गोष्ट' हे लहान मुलांचे पुस्तक ही तर मुग्धाला सांगितलेलीच विलक्षण गोष्ट आहे. याच भाचीला त्यांनी 'अमृतफळे' हे आपले लहान मुलांसाठी लिहिलेले पुस्तक अर्पण केले आहे. या अर्पण-पत्रिकेत त्यांनी तिला उद्देशून लिहिले आहे :

प्रिय मुग्धा—
ही खेळणी तुझ्यासाठी.

'अमृतफळे'तील कथा म्हणजे जीएंच्या लेखी खेळणी आहेत. स्वतः जीएंना खेळात फारसे स्वारस्य नव्हते. ते स्थान ते पुस्तकांना देत होते का? त्यानंतर आपली दुसरी भाची मनीषा हिला 'ओंजळधारा' हे पुस्तक अर्पण करताना जीए लिहितात :

प्रिय मनीषा—
नंतर कधी तरी एका मंतरलेल्या क्षणी
कृष्णशास्त्री चिपळूणकरांचे अरेबियन नाइट्सचे भव्य भाषांतर
तुझ्या हाती पडावे ही माझी त्यांच्याविषयीची कृतज्ञता
आणि तुझ्याविषयीची सदिच्छा.

ह्या अर्पण-पत्रिकेचा आशय जिला हे पुस्तक अर्पण केले आहे तिला अर्पण-काळाच्या चिमुकल्या वयातच काय, पण नंतर कधी तरी 'एका मंतरलेल्या क्षणी' सुद्धा सहजासहजी आकलन होईल का, असा एक प्रश्न मनात येतो. हा 'मंतरलेला क्षण' म्हणजे 'अरेबियन नाइट्स' सारख्या पुस्तकांनी मुले झपाटली जातात ते वय. त्या वेळी सुद्धा 'अरेबियन नाइट्स' वाचून होईल, पण तो मंतरलेला क्षण होता हे लक्षात यायला मात्र मनीषाला आणखीन काही वर्षे लोटावी लागतील. त्याच सुमाराला या संबंध अर्पण-पत्रिकेचा व्यापक आशय मनीषाच्या ध्यानात येईल. आणि तिथून पुढे ही मनीषा हळूहळू आपल्या मामाच्या कथाविश्वात उतरेल. तोही त्या वयाचा मंतरलेला क्षणच असेल.

असे काही विचार ही अर्पण-पत्रिका वाचून आपल्या मनात येतात. एक

विचार असाही येऊन जातो की, 'ओंजळधारा'चा काही भाग जीएंनी चिपळूण-करांनाही वाहिलेला आहे की काय? नाही तर त्यांच्याविषयीची कृतज्ञता इथे कशाला डोकावेल?

'एक अरबी कहाणी' या पुस्तकातील अर्पण-पत्रिका मात्र एकूणच गहन आहे. त्या शब्दांतून कितीही फिरले तरी हाती नेमके काही लागत नाही. पाहा :

> शहाजादीस —
> ती अती बोलते असे जिच्याविषयी कधीच वाटत नाही
> अशी तू एक अद्वितीय स्त्री होतीस.

ही अर्पण-पत्रिका वाचल्यावर पहिला प्रश्न पडतो— कोण ही शहाजादी? जी अती बोलत नाही ती स्त्री अद्वितीय असणार यावद्दल शंका नाही. पण ही कुठल्या राजाची शहाजादी? आणि जीएंच्या राज्यात ती कुठून आली? होतीस म्हणजे आता निघून गेलीस की त्या अज्ञात इतिहासात होऊन गेलीस? जीएंच्या अनेक गूढ कथांपलीकडची गूढ-गहन अशी ही एवढीशी अर्पण-पत्रिका आहे. 'माणसे : अरभाट आणि चिल्लर' या पुस्तकाच्या अखेरीस जीएंचा 'मी म्हणतो, "काही समजत नाही, काही समजत नाही." ही अर्पण-पत्रिका वाचून आपली तीच अवस्था होते— काही समजत नाही!

ज्यांच्याशी नाते जुळले ते रक्ताच्या नात्याचेच असले पाहिजेत असे नाही. आपल्या कथेतील पात्रे, पशू, पक्षी यांनीसुद्धा जीएंच्या मनात कायमचे घर करून ठेवले होते याची साक्ष देणारी 'रक्तचंदन' कथासंग्रहातील अर्पण-पत्रिका हा तर त्या साऱ्यांसाठी लिहून ठेवलेला ताम्रपट वाटतो. ही केवळ आठवण काढणारी अर्पण-पत्रिका नाही. त्यातली मनाच्या तळातून आलेली कृतज्ञता वाचकाच्य मनाचा ठाव घेते :

> स्पर्धेच्या धुंदीत आपल्या हातांनी आभाळात सोडलेली, पण जिचा मृत्यू असहायपणे खालून पाहावा लागला, ती गुलाब-पाकळ्यांच्या चोचीची चंद्रावळ; मधापर्यंत उत्साहाने पाऊल स्थिर न ठेवणारा, पण आकस्मिक वेदनेने तडफडत ओंजळीत निपचित झालेला, माणके बसवलेल्या कवडशाप्रमाणे दिसणारा लाल डोळ्यांचा पिवळा पक्षी; अजाण संतापाने पाठीवर सपासप वेत मारल्यावरही ते वळ

अंगावर घेऊन, आपुलकीने अंगाला अंग घासू लागणारी क्षमाशील कृष्णी गाय; आपल्या वासाने पहाट ओली करणारा, पण घरबांधणीच्या वेळी तो काढून टाकायचे ठरताच त्याआधीच दोन-चार दिवस आपण होऊन मूकपणे आडवा झालेला पारिजातक; जत्रेमधील फिरते चक्र मला पाहायला मिळावे म्हणून मला खांद्यावरून सात मैल घेऊन जाणारा लंगडा, हाडकातडी म्हातारा बसलिंग; 'कसा पोट जाळतो बघा!' असे आईने म्हणताच ताडकन पानावरून उठून तीन-मजली वारा-खणी घरातून नेसत्या वस्त्रानिशी बाहेर पडून शेवटपर्यंत एकवस्त्री राहणारा, लाकडे फोडून पोट भरत असता अर्ध्या गावाला जातिवंत मोत्यांची पारख सांगणारा, आणि शेवटी एका धर्मशाळेत शेजारी कुन्हाड ठेवून संपून जाण्यापूर्वी मला सावणाचे फुगे कसे करायचे हे शिकवून जाणारा दत्तू इनामदार; आतड्यांच्या चोवीस माणसांचे मृत्यू डोळ्यांनी पाहिलेली, आता उरलेल्या दोनचार जिव्हाळ्याच्या माणसांना तरी आपल्या प्रेमापासून मुक्त ठेवण्यासाठी त्यांच्याचप्रमाणे मलाही हिडीसफिडीस करण्याची केविलवाणी धडपड करणारी काकाची आई; अरेबियन नाइट्स मला प्रथम वाचायला देणारा, फूटबॉल खेळण्यासाठी जीव टाकणारा, पण एका अपघातात नेमके दोन्ही पाय गमावून घेतलेला भगीरथ देशपांडे; माझ्या आयुष्यातील पहिली पूर्ण लांबीची शिसपेन मला देणारा रुद्राप्पा बेलीफ; स्वतः निरक्षर असून देखील मी खूप शिकावे असे दत्ताजवळ सतत मागणे करणारी, मी पहिलीची परीक्षा पास होताच पै पै जमा केलेले पुष्कळसे पैसे खर्च करून पेढे वाटणारी, ठिकठिकाणी वार लावून जेवणारी, आणि एक दिवस अचानक नाहीशी झालेली, कापऱ्या अंगाची, तोतरी, अनाथ, वेडसर रखमाकाकू यांस—

तुम्ही सगळेच जण पुढे निघून गेलात. मी तुमच्याकडे येईन, पण आता तुम्ही मात्र माझ्याकडे कधी येणार नाही. आपण पुढे पुन्हा कधी तरी भेटू.

आयुष्यात आलेल्या या सर्वांचे ऋण मानणारे जीए माणूसघाणे कसे असतील?

स्वतःच्या कथेतल्या पशु-पक्ष्यांनी सुद्धा आपणाला काही दिले आहे या भावनेने त्यांच्याकडे पाहणारा हा लेखक केवढा भावनाशील असला पाहिजे ? बेळगाव ही त्यांची मायभूमी. इथेच ते लहानाचे मोठे झाले. 'रमलखुणा' हे आपले पुस्तक त्यांनी या बेळगाव शहराला अर्पण केले आहे :

बेळगाव नावाच्या गावास—
पाउले जरी दूर भटकत गेली
तरी तुझ्या आठवणींची वृत्ती सतत जवळ राहिली आहे.

धारवाड ही जीएंची कर्मभूमी. या शहरावर त्यांचे एवढे प्रेम होते की, निवृत्तीनंतर त्यांचा पाय तिथून निघत नव्हता. तेथील कर्नाटक विश्वविद्यालयाचे मुक्त वाचनालय हे तर त्यांचे जीव की प्राण. धारवाड शहराविषयीची त्यांची आत्मीयता मला त्यांच्या बोलण्यातून नेहमीच ऐकू येत होती. त्यांचे सर्वस्व हिरावून घेणारा तो दृष्टिदोष निर्माण झाला नसता तर त्यांनी धारवाड कधीही सोडले नसते, हेही त्यांनी बोलून दाखवले होते. 'पैलपाखरे' या भाषांतरित कथासंग्रहाच्या अर्पणपत्रिकेत त्यांनी धारवाडबद्दलच्या भावना कशा बोलून दाखवल्या आहेत पाहा :

आकाशमोगऱ्याच्या झाडांचे, लाल गाभ्याच्या मोठ्या पेरूंचे,
विंदगीएवढ्या कलिंगडांचे, कस्तुर मातीच्या कृष्णगंधाचे गाव
धारवाड, आणि कर्नाटक विश्वविद्यालयाचे मुक्त वाचनालय
यांस—
हा एक कृतज्ञ सूतफेरा.

जीएंनी एका इंग्रजी नाटकाचे मराठीत भाषांतर केले होते. हे भाषांतर जीएंनी केवळ आपल्या वैयक्तिक समाधानासाठी केले असले पाहिजे. ते जे काही लिहीत असत ते सर्वच प्रकाशनार्थ नसे. या बाबतीत त्यांचा एवढा कटाक्ष होता की, आपण पाठवलेली खाजगी पत्रे सुद्धा त्यांनी छापील स्वरूपात प्रसिद्ध केलेली त्यांना चालत नसत. (आता म. द. हातकणंगलेकर हे तर जीएंच्या निकटवर्तीयांपैकी एक. पण त्यांनी जीएंची काही पत्रे जेव्हा 'ललित' मासिकात प्रसिद्ध केली तेव्हा ते केवढे अस्वस्थ झाले होते !) तर सांगायचा मुद्दा असा की, त्यांनी

भाषांतर केलेल्या या नाटकाच्या हस्तलिखितावर "हे प्रकाशनार्थ नाही" असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. या भाषांतरित नाटकाचे नाव आहे : 'दिवस तुडवत अंधाराकडे.' त्यातील मूळ नाटककाराच्या अर्पण-पत्रिकेचेही भाषांतर जीएंनी करून ठेवले आहे. तीही जीएंच्या अर्पण-पत्रिकांशी किती जवळची वाटते :

कार्लोटास—
आपल्या विवाहाच्या बाराव्या वाढदिवशी—
प्रियतमे,

रक्त आणि अश्रू यांनी लिहिलेला एका जुन्या वेदनेचा हा मूळ शब्दालेख आज मी तुला देत आहे. अशा आनंदप्रसंगी असली भेट देणे हे प्रथम तुला विलक्षण वाटेल, पण नंतर तुला सारे समजून येईल. तू दाखवलेले प्रेम व हळुवारपणा यांचे एक कृतज्ञता-चिन्ह म्हणून मी ही भेट तुझ्यापुढे ठेवीत आहे. त्यांच्या आधारेच तर मी जगून नाहीशा झालेल्या या माझ्या माणसांना डोळस आत्मीयतेने सामोरे जाऊ शकलो, त्यांच्याविषयी हे नाटक लिहू शकलो—एवढेच नाही तर बाधा होऊन झपाटलेल्या या टायरोन कुटुंबातील चारही माणसांविषयी समंजसपणा आणि क्षमाशील वृत्ती या भावनांनी लिहू शकलो.

आपली ही एकत्र घालवलेली बारा वर्षे म्हणजे, प्रिये, प्रकाशातला प्रकाशातून प्रीतीकडे झालेला प्रवास आहे.
मला त्याबद्दल वाटणारी माझी कृतज्ञता तुला समजावी.
माझी कृतज्ञता आणि माझे प्रेमही.

—जीन

अशा एकापेक्षा एक अर्थपूर्ण आणि कारुण्याने ओथंबलेल्या अर्पण-पत्रिका लिहिणाऱ्या जीएंचे 'माणसे : अरभाट आणि चिल्लर' हे पुस्तक मी प्रकाशित केले तेव्हा मात्र अर्पण-पत्रिकेची त्यांची ती चौकट मला रिकामी ठेवावी लागली !

खरे तर जीएंना या पुस्तकावर अखेरचा हात फिरवायचा होता. रुग्णालयात असताना हे काम त्यांना पूर्ण करायचे होते. त्याचबरोबर त्यांची अर्पण-

पत्रिकाही ते देणार होते. परंतु रुग्णालयातून ते परत आलेच नाहीत. तो चौकट रिकामीच राहिली. मी तिच्याखाली फक्त 'जीए' ही अक्षरे लिहिली. काही वाचकांना ही चौकट अत्यंत सूचक व मार्मिक वाटली; पण काहींना हा छपाईतील निष्काळजीपणा वाटला !

४

नापसंती

'माणसे : अरभाट आणि चिल्लर' हे पुस्तक प्रकाशित होण्यापूर्वी मी जीएंची एकूण तीन पुस्तके काढली होती. 'मुग्धाची रंगीत गोष्ट' व 'बखर बिम्मची' ही दोन छोट्या मुलांची, आणि तिसरा 'पैलपाखरे' हा परदेशी कथांचा भाषांतरित संग्रह – अर्थात मोठ्यांसाठी. त्यांतील 'मुग्धाची रंगीत गोष्ट' व 'बखर बिम्मची' या दोन छोट्या पुस्तकांच्या प्रकाशनकाळात जीएंना बराच मानसिक त्रास झाला. छपाईसाठी अनेक महिने ही दोन हस्तलिखिते माझ्याकडे निष्कारण पडून होती. त्यासाठी योजलेल्या चित्रकाराने या पुस्तकांची चित्रे वेळेवर दिली नाहीत. काही न सांगता, न कळवता हे चित्रकार परदेश दौऱ्यावर निघून गेले. त्यामुळे जीए अनेक दिवस अस्वस्थ होते. मलाही हात चोळीत बसण्याशिवाय मार्ग नव्हता. त्यामुळे जीएंचे पहिले पुस्तक प्रकाशित करण्याची माझी प्रबळ इच्छा अकारण लांबणीवर पडली होती.

हे चित्रकार म्हणजे पुण्याचे सुभाष अवचट. खरे तर जीएंची लहान मुलांसाठी लिहिलेली ही दोन पुस्तके मला प्रकाशनासाठी मिळवून देण्यात त्यांनीच हातभार लावला होता. या दोन छोट्या पुरतकांची चित्रेही त्यांनीच काढायची आणि ही पुस्तके सर्वांगसुंदर करायला हातभार लावायचा असे मुळात ठरले होते. पण मध्यंतरी त्यांचे काय बिनसले कोण जाणे, चित्रांबद्दल काहीही न कळवता ते परदेशाच्या दौऱ्यावर निघून गेले. तिकडे जीएंनाही त्यांनी काही कळवले नाही. शेवटी जीएंचे मला एक पत्र आले. हे पत्र जीए पुण्याला येण्यापूर्वीचे म्हणजे धारवाडहून लिहिलेले आहे. ते असे :

"श्री. अप्पा परचुरे यांस स. न. वि. वि.

त्या भेटीनंतर श्री. अवचट यांच्याकडून काही पत्र नाही. ते 'स्टेट्स'ला गेले ही माहिती देखील मला नंतर समजली. येथे ते चारपाच तास होते, पण

त्याबद्दल काही बोलले नाहीत. आता ते परत आले आहेत का ही देखील माहिती नाही..."

जीएंच्या पश्चात जीएंशी फार मोठी सलगी असल्याचा आभास निर्माण करणाऱ्या या चित्रकार महाशयांनी जीएंच्या त्या दोन पुस्तकांची चित्रे सहा महिने लोटले तरी दिली नाहीतच, त्याबद्दल जीएंना व मला काही कळवलेही नाही. एवढेच नव्हे, तर आपण परदेशी जात असल्याबद्दलही जीएंना बोटभर पत्राने कळवण्याची तसदी घेतलेली नाही, हे वरील पत्रावरून स्पष्ट होते. असे असतानाही अवचट महाशय जीएंवर त्यांच्या पश्चात एक पुस्तक लिहितात, आणि त्यात माझ्यावर कशा दुगाण्या झाडतात पाहा. काय तर म्हणे : "माझी चित्रे तशीच माझ्यापाशी राहिली. लहान मुलांसाठी आम्ही दोघांनीही ठरवलेला अशा सुंदर रंगीत पुस्तकांचा फुगा थोडा वेळ उडाला आणि परचुऱ्यांनी तो बोट लावून फोडला." फुगा फुटला तो मी बोट लावल्यामुळे नव्हे, तर अवचटांनी तो वाजवीपेक्षा जास्त ताणल्यामुळे, हे पत्रावरून स्पष्ट दिसून येते.

सुभाष अवचटांनी केलेल्या या दिरंगाईने जीएंना केवढा मानसिक त्रास झाला असेल याची कल्पना देणारे हे दुसरे पत्र काय सांगून जाते पाहा. २१ डिसेंबर १९८५ रोजी मला लिहिलेले हे पत्र अत्यंत बोलके आहे :

"श्री. अप्पा परचुरे यांस स. न. वि. वि.

श्री. सुभाष अवचट यांच्यातर्फे दिलेली दोन हस्तलिखिते आपल्यापाशी आहेत.

त्यानंतर तुम्ही दोनदा पुण्याला आला होता. येथे ट्रीटमेंटसाठी आल्यानंतर माझा सारा वेळ एक्स-रे फोटो, इंजेक्शन्स, वेगवेगळ्या टेस्ट्स (त्या देखील निरनिराळ्या डॉक्टरांकडे) यातच गेला. त्या बाबतीत मी सर्वस्वी त्या त्या डॉक्टरावरच अवलंबून असल्यामुळे मला माझा असा स्वतंत्र वेळच उरला नाही. नंतर एकदा त्यातल्या त्यात सारे सांभाळून मी एक संध्याकाळ भेटण्यासाठी ठेवली, व वाट पाहिली. दुसऱ्या दिवशी मीच फोन करून चौकशी केल्यावर 'तुम्हांला स्वतःच्या अडचणीमुळे मुंबईला परतावे लागले,' अशी माहिती श्री. अवचटांकडून मिळाली.

खरे म्हणजे अनावश्यक अशी वळणे टाळण्यासाठी सारा व्यवहार त्यांनीच संपवावा अशी विनंती मी श्री. अवचट यांना केली होती, व फार सौजन्याने

त्यांनी ती मान्य केली होती. पण एकंदरीने स्वतःच्याच कामांची इतकी गर्दी झाली, की त्यांना त्यातून फारशी सवड मिळेना. येथे फोनवर संपर्क अशक्य झाल्याने मी तुमच्या c/o त्यांना एक पत्र पाठवले होते. पण येथे आल्यावर ते फोन देखील करू शकले नाहीत. (एकंदरीने साऱ्या पुणेकरांविषयी फोनबाबत माझी एक तक्रार आहे. त्यांना फोन ही गोष्ट इतकी दैनंदिन झाली आहे की त्याबद्दल कुणाला सीरियसनेस वाटतच नाही. त्यामुळे मी आता सारे व्यवहार गावातल्या गावातच पत्रव्यवहाराने सुरू केले आहेत.)

माझ्या बाजूने सांगायचे झाल्यास इंजेक्शन, एक्स-रे, कन्सल्टेशन्स इत्यादी त्रासिक गोष्टी ऑपरेशन (दुसरे) होईपर्यंत चालूच राहतील असे वाटते. त्यामुळे स्वतःच्या कामांतून श्री. अवचट व तुम्ही यांना सवड मिळणे व त्याच वेळी मला मोकळीक असणे हे कठीण झाले आहे. म्हणजे आपण तिघेही एकत्र भेटणे हेच या अडचणीमुळे कठीण झाले आहे.

म्हणून एकंदरीने त्या हस्तलिखितांबाबत सध्या काय परिस्थिती आहे, हे विचारण्यासाठी मी हे पत्र लिहीत आहे. अगदी सुरुवातीलाच मी श्री. अवचट यांना जे सांगितले तेच मी पुन्हा एकदा लिहीत आहे. त्या हस्तलिखिताबद्दल जर विचार बदलला असेल तर अगदी निःसंकोचपणे, मनमोकळेपणाने ती परत पाठवण्यास देखील तुम्ही कोणत्याही तऱ्हेने मनात किंतू बाळगू नये.

माहितीसाठी मी या पत्राची एक प्रत श्री. सुभाष अवचट यांना पाठवत आहे. कळावे.

आपला

जी. ए. कुलकर्णी."

वरील पत्रावरून या दिरंगाईमुळे जीएंना केवढा मानसिक त्रास झाला असेल याची कल्पना येते. ज्याअर्थी इतके दिवस होऊनही पुस्तकांचे गाडे पुढे जात नाही त्याअर्थी प्रकाशक ही पुस्तके काढायला उत्सुक नसावा असा अर्थ जीएंनी काढला असल्यास नवल नाही. या पत्रावरून जीएंनी एक संध्याकाळ भेटीसाठी राखून ठेवली होती हे स्पष्ट होते. परंतु मला या आशयाचा निरोपच अवचटांकडून मिळालेला नाही, तर मी या भेटीसाठी जाणार कसा ? आपली चित्रे तयार नाहीत हं सांगण्याऐवजी परचुरे स्वतःच्या अडचणीमुळे मुंबईला निघून गेले, असे

जीएंना सांगून ते मोकळे झाले, हे जीएंनी नंतर सांगितले तेव्हा मला कळले! पत्र मिळाल्यावरोबर मी तावडतोब जीएंना पुण्यात जाऊन भेटलो, आणि पुस्तके कुठे कुचंवली आहेत याचा खुलासा केला. तेव्हा जीएंनी उद्‌गार काढले, "असं का करावं त्यांनी? तुमच्यावर रागावले तर नाही?"

"काही कळत नाही." मी म्हटले, "पण तसं असेल असं धरलं तरी तुमच्यावर रागावण्याचं कारण काय? तुम्हांला तर त्यांनी काही कळवायला हवं होतं की नाही?"

"एकंदरीत पुणेकर कठीणच दिसतात." जीएंचा पुण्यावरचा रोष बाहेर आला.

मी तो विषय तिथेच सोडून जीएंना विचारले, "आता ही चित्रं मी श्याम जोशींना करायला सांगतो. चालेल का?"

जीएंनी त्याला अनुमती दिली. याच भेटीत बोलण्याच्या ओघात त्यांनी मला विचारले, "त्याआधी माझं दुसरं एक पुस्तक काढणार का?"

"काढणार का म्हणून काय विचारता? काढा म्हणून सांगा, आणि काढतो की नाही बघा."

"अहो, पण कसलं पुस्तक आहे माहीत आहे का? भाषांतरित कथांचा संग्रह आहे."

"असू दे ना."

"अहो पण — मराठी प्रकाशक कथा-संग्रह छापायला उत्सुक नसतात. त्यात या कथा आहेत भाषांतरित. काही आहेत रूपांतरित."

"कसल्या का असेनात." मी म्हटले, "भाषांतर केलंय कुणी याला महत्त्व आहे. जीएसाहेब, तुम्ही असा विचारच करू नका. तुम्ही फक्त ऑर्डर सोडा."

त्याच बैठकीत मी या कथांचे हस्तलिखित त्यांच्याकडून मागून घेतले. त्यातील एक कथा ते नंतर देणार होते. म्हटले, "ठीक आहे."

"हे पुस्तक काढायला किती दिवस लागतील?"

या प्रश्नावर मी हसलो. तेही हसले. पण लगेच म्हणाले, "मला हे पुस्तक लवकर झालं तर हवं आहे."

मी विचारले, "लवकर म्हणजे केव्हापर्यंत?"

जीए म्हणाले, "१० जुलै १९८६."

मी हसून सांगितले, "नक्की. १९८७ पर्यंत लांबणार नाही."

मी तर्क केला, हा त्यांचा वाढदिवस तर नसेल? पण काही विचारले नाही त्या तारखेपर्यंत पुस्तक काढायचे आश्वासन दिले. या पुस्तकाचे नाव जीएंनी ठेवले होते 'पैलपाखरे'. जीएंचा प्रत्येक शब्द अर्थपूर्ण असतो, तेव्हा या शब्दालाही तसाच खास काही तरी अर्थ असणार, सिग्निफिकन्स असणार हे नक्कीच. तो जाणून घेण्याच्या उत्सुकतेने मी विचारले, "पैलपाखरे या नावामागे काय आहे?"

"नावामागे काही नाही. या सगळ्या परकी कथा आहेत. त्यांचे लेखक साता-समुद्रांपलीकडचे आहेत. म्हणून पैलपाखरे. या पाखरांनी काहीबाही आणून टाकलंय ते या संग्रहात एकत्र करायचं."

मी जीएंना विचारले, "ह्या पुस्तकाचं मुखपृष्ठ मी श्याम जोशींना काढायला सांगणार आहे. चालेल का?"

"म्हणजे तुमच्या मुंबईचे. चालेल."

जीएंची अशी अनुमती घेऊन मी बाहेर पडलो. या पुस्तकाच्या छपाईपासून मुखपृष्ठांपर्यंत प्रत्येक बाब मी त्यांना विचारून पूर्वकल्पना देऊन करीत होतो. पुस्तकाच्या प्रत्येक अंगाविषयी त्यांच्याशी चर्चा करीत होतो. त्यांची मते लक्षात घेऊन पुढे जात होतो. त्यांचे पुस्तक त्यांच्या मनासारखे व्हावे म्हणून धडपडत होतो. म्हणूनच श्याम जोशींचे मुखपृष्ठ हाती येताच मी जीएंच्या घरी जाऊन त्यांना ते दाखवले. त्यांची पसंती घेतली.

'पैलपाखरे' कथासंग्रहातील एक कथा जीएंकडून मिळायची होती तीही यथावकाश आली. तिच्यासोबत जीएंनी मला एक पत्र लिहिले होते. तेही या मुख-पृष्ठाच्या संदर्भात महत्त्वाचे आहे, म्हणून येथे उद्धृत केले आहे :

"श्री. अप्पा परचुरे यांस स. न. वि. वि.

मी सोबत 'पावशा भगत'चे हस्तलिखित पाठवत आहे.

तुम्ही आला होता ती संध्याकाळ आम्हांला फार आनंदाची गेली. आभार.

एक मात्र गंमत झाली व प्रभावतीच्या दृष्टीने तुमची लोकप्रियता वाढली. आतापर्यंत माझी बरीच पुस्तके प्रसिद्ध झाली. पण त्या साऱ्यांच्या बाबतीत मी आधी माहिती बिलकुल देत नसे. पुस्तकाची प्रत हाती आली की मगच त्याबद्दल इतरांना कळे

या खेपेला तुम्ही आपुलकीने पैलपाखरेचे मुखपृष्ठ तिला दाखवलेत, याबद्दल ती फार खूष आहे. त्याबद्दलही आभार.

कळावे.

आपला

जी. ए. कुलकर्णी"

'पैलपाखरे'च्या मुखपृष्ठाबद्दल एवढ्या विस्ताराने लिहिण्याचे कारण असे की, जीएंच्या दुर्दैवी निधनानंतर चित्रकार सुभाष अवचट यांनी जीएंशी आपली केवढी सलगी होती हे दाखवण्याच्या हव्यासापोटी लिहिलेल्या पुस्तकात "पैलपाखरेचे मुखपृष्ठ जीएंना पसंत नव्हते," असा एक शिंतोडा उडवला आहे.

स्वतःची नापसंती जीएंच्या नावावर---तीही जीएंच्या पश्चात खपवण्याने काय साध्य झाले? आपल्याच विचित्र वागण्याने आपली चित्रे पडून राहिली, आणि त्या जागी कुणा दुसऱ्याची चित्रे पाहण्याची पाळी आली! याच वृत्तीच्या धास्तीने जीए धारवाड सोडून पुण्यात यायला तयार नव्हते.

जीएंची नापसंती अशी लपून राहणारी नव्हती. त्याचाही अनुभव मला आला. पुढे 'बखर बिम्मची' हे पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर त्यातील चित्रांबद्दलची जीएंची नाराजी अगदी स्वच्छ शब्दांत त्यांनी लिहिलेल्या पत्रात उमटली आहे.

"श्री. आप्पा परचुरे यांस

स. न. वि. वि.

'बखर बिम्मची' या छोट्या पुस्तकाच्या पाच प्रती मिळाल्या. त्याबद्दल मी आभारी आहे. मुखपृष्ठावरील चित्र मी आधीच पाहिले होते, आणि मला ते आवडलेही होते. परंतु 'पैलपाखरे' या पुस्तकाचे जसे सर्व दृष्टींनी उत्साहाने स्वागत झाले, तसे निर्भेळ स्वागत या पुस्तकाच्या वाट्याला येईल असे वाटत नाही.

याचे एक कारण म्हणजे त्यात घातलेली (की टाकलेली) रेखाचित्रे नावाचा जो प्रकार आहे ते आहे. मागील थोडा इतिहास असा आहे. त्यांची स्केचीस तुम्ही मला दाखवलीत, त्या वेळी "अशा शैलीतील चित्रे चालू शकतील का?" याबद्दलच विचार झाला. तसा कुणाचाच कोणत्याही शैलीला विरोध असण्याचे काही कारण नसते, कारण शैलीपेक्षा त्या शैलीने काय निर्माण होते हे महत्त्वाचे असते. नंतर मी ती पाहिली तेव्हा तर त्यांचे ब्लॉक्स देखील तयार झाले होते!

अर्थात हे मला चालण्याजोगे होते असे समजणे चुकीचे ठरले असते. त्याबद्दल मी तुमच्याजवळ कडकडीत प्रोटेस्ट नोंदवला होता, व तशी चित्रे फारशी नसल्याने सारे दुरुस्त देखील करता येईल, असा तुमच्या बोलण्यावरून माझा समज झाला होता.

ज्या पुस्तकात एका हत्तीची गोष्ट आहे त्यात हत्तीचे चित्र नाही. एक छोटा मुलगा ढगाला काठी टोचत आहे असा प्रसंग आहे, त्याला चित्र आहे दोन कागदी होड्यांचे ! (कागदी होड्यांचे सामान्य चित्र इतर डझनभर कथांसाठी देखील शोभून जाईल.) 'सावल्या' नावाच्या कथेला योग्य चित्र मिळणे अवघड तर आहेच. कारण ती तशी व्हिज्युअल नाहीच. पण येथे ज्याची निवड झाली आहे ते चित्र काय आहे याचा पत्ताच लागत नाही व त्यातील घोड्याचे कान देखील घोड्यासारखे दिसत नाहीत. (हा घोडा त्याच्या दूरच्या नातलगासारखा वाटतो !) या साऱ्या कथांत वास्तव व फँटॅस्टिक अशी सरमिसळ आहे, व त्या दृष्टीने फँटसीला थोडा वाव होता. त्या दृष्टीने एका फँटॅस्टिक घराच्या कुलुपाला फँटॅस्टिक आकार देणे योग्य झाले असते. पण येथे जे कुलूप आहे ते अत्यंत व्यवहारी आहे. शिवाय ते चित्रातील वर्णनाचे सुद्धा वाटत नाही. ते तसे असायला हवे होते. कथेतील कुलुपाला दोन किल्ल्यांसाठी दोन भोके आहेत.

या साऱ्यामुळे मी अस्वस्थ झालो, व त्याबद्दल एक सविस्तर पत्र लिहिले. काही अत्यंत कामचलाऊ अशा सूचनांच्या काही रेघोट्या देखील काढल्या, व सारे साहित्य सी. के. परचुरे यांच्याकडे दिले. त्याची झेरॉक्स कॉपी तुमच्याकडे दिली आहे असे त्यांनी मला कळवले. चित्रकाराला प्रत्यक्ष भेटणे शक्य आहे का याची देखील मी त्यांच्यापाशी चौकशी केली होती. त्यानंतरच्या एका फोनमध्ये तुम्ही त्यात काही सुधारणा करता येतील का हे पाहतो असे म्हटले होते. तुम्ही, मी, सी. के. त्यानंतर एकत्र कधी भेटू शकलो नाही, हे या गोंधळाचे कारण असू शकेल का ? कारण मला प्रती मिळाल्या, त्या अत्यंत 'निर्विकारपणे.' त्यातील एका ठिकाणी देखील एका रेषेचा फरक न होता ! मग ते पत्र लिहिण्याचे, सूचना देण्याचे श्रम तरी कशाला ? की ते सारे प्रेसपर्यंत पोहोचलेच नाही ? त्याबद्दल नाही म्हटले तरी तीनदा चर्चा झाली नव्हती का ? निदान आता त्याबद्दल काही करता येत नाही एवढे तरी मला कुठून तरी समजायला हवे होते, असे मात्र वाटते. शक्य झाल्यास चित्रांनी शोभा वाढावी. येथे एक-दोन

चित्रे काढली नसती तर बरेच झाले असते. (हत्तीची ॲनॅटॉमी पाहून हत्ती चवताळून अब्रुनुकसानीची फिर्याद देखील करण्याची शक्यता आहे!) मुखपृष्ठावर असलेल्या चित्रातीलच प्रसंग आत पुन्हा निवडण्याची काहीच गरज नव्हती.

यामुळे आत्ताच माझ्या काही मित्रांनी नाराजी व्यक्त केली आहे. (त्यातील साहित्यावद्दलची मते नंतर येणार आहेत!) सजावट या दृष्टीने त्याच्याशी संबंध पोहोचतो, म्हणूनच नव्हे, तर याआधीचे पुस्तक तुम्ही (म्हणजे तुम्ही, लाटकर व जोशी) या साऱ्यांनी मिळून सुरेख काढले. आता एवढ्यामुळे तुम्हांला दोष प्राप्त होऊ नये, म्हणून मी हे तुम्हांला लिहून कळवत आहे.

कळावे.

आपला

जी. ए. कुलकर्णी"

इथे जीएंनी माझी चूक अगदी माझा कान पकडून दाखवली आहे. मी त्यांची क्षमा मागितली, तेव्हा ती चूक जीएंनी तितक्याच सहजपणे पोटातही घातली आहे. पण इथे चित्रकाराने मुळातच जे घालवले होते ते भरून येण्याची शक्यता नव्हती. "जो बूंद से गयी वो हौद से नहीं आती" असा काहीसा मामला होता. संपूर्ण चित्रे रद्द करून हे काम दुसरीकडून करून घेणे फार अवघड होते. ते मी केले नाही, ही माझी चूक होती. मात्र या पत्राच्या पहिल्या व शेवटच्या परिच्छेदांमध्ये जीएंनी 'पैलपाखरे'चे सर्व दृष्टींनी उत्साहाने स्वागत झाल्याची, त्याचप्रमाणे तुम्ही, लाटकर आणि जोशी (अर्थात श्याम) यांनी पुस्तक सुरेख काढल्याची भरल्या तोंडाने पावती दिली आहे.

'पैलपाखरे'चे आपले मुखपृष्ठ जीएंना आवडले हे समजल्यावर श्याम जोशींना अतिशय आनंद झाला. त्यांना जोएंना भेटण्याची इच्छा झाली. मी जीएंना तसे विचारल्यावर जीएंनी आनंदाने त्याला संमती दिली. जीए कुणालाही भेटायला सहजतया तयार नसत. अनेक जणांच्या भेटीगाठी त्यांनी नाकारल्याच्या किंवा टाळल्याच्या हकीगती प्रसिद्ध आहेत. श्याम जोशींची आणि त्यांची ही भेट पुण्याच्या आमच्या जागेत झाली. ती चांगली दीड दोन तास चालली, आणि चित्रकला या विषयावरच ती मुख्यतः केंद्रित झाली होती. या प्रसंगी डॉ. स. गं.

मालशे हे सुद्धा उपस्थित होते. जीए स्वतःच्या साहित्याबद्दल मात्र फारसे कुणाशी बोलत नसत, ही गोष्ट हळूहळू माझ्या ध्यानात येऊ लागली होती.

साहित्य क्षेत्रातील कित्येक व्यक्तींना टाळणारे म्हणून जीएंचा बराच लौकिक झालेला होता. या बाबतीत मला अनुभवाला आले ते असे की, जीएंच्या म्हणून काही खास आवडी-निवडी होत्या. त्यांना न पटणाऱ्या गोष्टींच्या किंवा माणसांच्या वाटेला ते जात नसत, तसे आपल्या वाटेतही येऊ देत नसत. एकदा या बाबतीत मी त्यांना हसत हसत चाळवले, तेव्हा ते म्हणाले, " सर्वांशी सर्व काळ संबंध ठेवता येत नाही. तसं केलं तर तुम्हांला दुसरं काम उरणार नाही. "

मी म्हटले, " आम्हांला हे जमत नाही. "

जीए म्हणाले, " तुम्ही धंदेवाले. तुम्हांला हे जमून चालणारही नाही. पण तुम्हांलाही काही वेळा माणसं चुकवावी लागत असणार. पाहा विचार करून. "

मी हसलो. जीएंचे हे म्हणणे अमान्य करता येण्यासारखे नव्हते. ते माणूसघाणे होते, हा त्यांच्यावरील आरोप मात्र अपुऱ्या माहितीवर तसा अपुऱ्या विचारावर करण्यात आलेला आहे. साध्या साध्या माणसांविषयी सुद्धा जीए किती अगत्यशील होते त्याचे एक उदाहरण देण्यासारखे आहे. हे अगत्यही त्यांनी दाखवले ते कुणी मित्र, तोलामोलाची वा परिचित व्यक्ती किंवा नातलग यांच्याबद्दल नव्हे. व्यवहारात त्यांचा काही संबंध नसलेल्या माणसाबद्दल.

पुस्तकाची मुद्रिते जीएंकडे पोचवण्याचे काम मी पुण्यातील माझ्या निवासस्थानाशी रिक्षा उभी करणाऱ्या एका रिक्षावाल्यावर सोपवले होते. त्याचे नाव बाळू. तो जीए राहत असत त्या कोथरूड भागात राहणारा होता. रात्री घरी परतताना त्याने ही मुद्रिते जीएंच्या घरी देऊन जायची कामगिरी अधूनमधून मी त्याला सांगत असे. त्याचा मोबदला त्याला मी देत असे. वस्तू जीएंच्या हातात द्यायची एवढेच त्याचे काम. एक दिवस घरी परतायला त्याला फार उशीर झाला, म्हणून जीएंकडे तो दुसऱ्या दिवशी सकाळी येताना गेला. पण जीएंनी त्याला तेवढ्यावर सोडले नाही. ते त्याला म्हणाले, " तुम्ही रात्री नेहमी उशिरा येता आणि दारातूनच परत फिरता. पण आज तुम्ही सकाळीच आमच्याकडे आला आहात. तर चहा घेऊन चला. "

बाळू संकोचून म्हणाला, " साहेब, ही सकाळची वेळ. धंद्याची सुरुवात. बसून कसं भागेल ? "

जीए म्हणाले, "धंद्याची सुरुवात आपण इथूनच करू. तुमचं जे काही नुकसान होईल ते मी भरून देईन. पण चहा न घेता जायचं नाही."

चहा, फराळ केल्यावरच बाळूची सुटका झाली. खरे तर जीएंचा त्याच्याशी संबंध किती ? तो प्रकाशकाचा मनुष्य. सांगितल्या कामाचा, दिल्या पैशाचा म्हणून जीएंनी त्याला लांब ठेवले नाही.

बाळू रिक्षावाला हा तर कधीमधी जाणारा. आमच्या अत्रे सभागृहातील एकनाथ धारगे हा तरुण म्हणजे माझा उजवा हात. आमच्या अत्रे सभागृहातील प्रकाशनाच्या पुस्तकांची व्यवस्था पाहण्यापासून स्वच्छता, देखभाल, आल्या-गेल्याची ऊठ-बस अशा सर्व कामांत तो आमचा आधारस्तंभ आहे. प्रुफांपासून पुस्तकांपर्यंत अनेक कामांसाठी त्याला जीएंकडे जावे लागले. या तीन-चार वर्षांत जीएंकडे त्याच्या किमान तीस-चाळीस तरी खेपा झाल्या असतील. पण एकदाही कधी तो रिकाम्या तोंडाने परतलेला नाही.

एकनाथ सांगतो, "जीएंच्या घरचा रिवाज असा : सकाळी गेलो तर चहा-बिस्किटं, दुपारची वेळ असल्यास थंडगार कोकम सरबत आणि संध्याकाळी कांदापोहे, उपमा असा एखादा पदार्थ आणि चहा. घरी गेल्यावर सांगितल्यावेळी प्रुफं तयार. परचुऱ्यांचा एक नोकर असं त्यांनी कधी आपणाला वागवलं नाही. घरी गेल्यावर बसवून घेणार. अत्रे सभागृहावर आले तर प्रेमानं मुलाबाळांची विचारपूस करणार."

जीए नव्या जागेत राहायला गेले तेव्हा देव्हाऱ्यात दिवा बसवण्याचे काम करायचे होते. त्यासाठी एकनाथ त्यांच्याकडे सायकलवरून गेला. तेव्हा एकनाथवर ते एकदम तापले. मध्यंतरी एकनाथ बऱ्याच मोठ्या दुखण्यातून बाहेर पडला होता. बरेच दिवस तो इस्पितळात होता. अशा स्थितीत त्याने चार-पाच मैलांची ही सायकल रपेट केली होती, हे त्यामागचे कारण होते. "अप्पा परचुऱ्यांनी किंवा दादा खऱ्यांनी तुला रिक्षाचे पैसे दिले नाहीत का ?" इथपर्यंत जीएंनी त्याला खडसावले.

स्वइताच्या बारीकसारीक गोष्टी तर त्यांनी त्याला इतक्या सांगितल्या होत्या की एकनाथ त्यांना वडलांसमान मानू लागला होता. म्हणूनच जीए गेल्याचे कळल्यावर तो वडील गेल्यासारखा रडला. एवढा मोठा "भारीतला" लेखक आपल्याशी अर्धा अर्धा तास बोलत बसे, हे सांगताना आजही त्याचा ऊर

भरून येतो.

त्यानंतर 'पैलपाखरे' पुस्तक तयार झाले त्या दिवशीची गोष्ट. १० जुलैला पुस्तक प्रकाशित व्हायचे, तर ९ जुलै रोजी मी पुण्यात गेलो. रात्री जीएंचा मला फोन : "उद्या सकाळी नऊ वाजता येतो."

मी म्हटले, "तुम्ही कशाला तसदी घेता? सकाळी मीच येतो तुमच्याकडे पुस्तकाच्या प्रती घेऊन."

"छे छे. तुम्ही कशाला?" जीएंनी विचारले. मग म्हणाले, "माझं त्या बाजूला काम आहे, मीच तुमच्याकडे येतो." फोन ठेवता ठेवता पुन्हा म्हणाले, "प्रभावतीची प्रकृती बरी नाही. त्यामुळे मी एकटाच येणार आहे."

"मग बाळू रिक्शावाल्याला पाठवू का—तुम्हांला आणायला?"

तेव्हा म्हणाले, "नको नको. बरोबर येतो बघा."

बोलल्याप्रमाणे सकाळी नऊच्या ठोक्याला स्वारी हजर. मी, चंद्रकांत आणि आमचे पुण्यातील अत्रे सभागृहाचे व्यवस्थापक माधवराव खरे फाटकात उभे राहून त्यांची वाटच पाहत होतो. परंतु जीए रिक्शाने न येता चालत येताना पाहून आम्हांला तिघांनाही आश्चर्य वाटले. हातात गुलाबाची फुले आणि पुडे. आमच्या नमस्कारांचा उलट नमस्काराने स्वीकार करून मला त्यांनी पहिला प्रश्न विचारला, "पुण्याचे सर्व रिक्शावाले तुमच्या मालकीचे दिसतात!"

"का? काय झालं?" मी विचारले.

"मी जर रिक्शा थेट तुमच्या गेटवर आणली असती तर रिक्शाचं भाडं तुम्ही मला देऊ देणार नाही, हे माहीत होतं. त्यामुळे मी रिक्शावाल्याला तिकडे दूर उभं केलं. मी अत्रे सभागृहात जातोय याचा थांगपत्ताही त्याला लागू दिला नाही. तरी पण तो बेटा माझ्याकडून भाडं घ्यायला तयार नाही. मी विचारलं, असं काय म्हणून? तर म्हणाला, 'अप्पा मला काय ते देतील.' हा काय प्रकार आहे? मी कोथरूडला रिक्शा ठरवली तेथे तर तो तुमच्या ओळखीचा निघणं शक्यच नाही. पण इथं बघतो तर तो मलासुद्धा ओळखतोय. हे काय गौडबंगाल आहे? का पुण्यातल्या तमाम रिक्शावाल्यांना माझा फोटो देऊन असा असा माणूस रिक्शात चढला तर त्याच्याकडून भाडं घ्यायचं नाही असा फतवा तुम्ही काढलाय?"

या गोष्टीचा उलगडा वाळू रिक्शावाला भेटल्यावर झाला. जीएंना कोथरूडहून आणणारा तो रिक्शावाला वाळूच्या नेहमीच्या गाठीभेटीतला होता, आणि एक दिवस वाळूनेच त्याला जीए हे मोठे लेखक असल्यामुळे त्यांच्याकडून पैसे घ्यायचे नाहीत, अशी अप्पा परचुरे यांची सक्त सूचना असल्याचे सांगितले होते. योगायोगाने जीएंना कोथरूडला हाच रिक्शावाला भेटला, आणि त्यांना घेऊन परचुरे यांच्याकडेच यायचे होते, म्हटल्यावर त्याने जीएंकडून पैसे घेतले नव्हते.

तर अशा तऱ्हेने जीए 'पेलपाखरे'च्या प्रकाशनाला अत्रे सभागृहात आले. खरे तर माझ्या प्रकाशनात येणारे जीएंचे हे पहिले पुस्तक. त्याचे समारंभपूर्वक प्रकाशन करायची माझी इच्छा होती. पण जीएंचे आणि समारंभाचे वाकडे. त्यामुळे नुसतीच पहिली प्रत त्यांच्या हातात ठेवून मी माझ्या परीने 'पेलपाखरे'-चे प्रकाशन केले. जीएंनी पुस्तक बाजूला ठेवले, आणि टपोऱ्या गुलाबपुष्पांचा गुच्छ आणि पेढ्यांचा एक पुडा माझ्या हातात दिला आणि म्हणाले, "माझं पुस्तक उत्तम प्रकारे प्रकाशित केल्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद."

महाराष्ट्राचा एक श्रेष्ठ कथाकार प्रकाशकाच्या घरी येऊन आपले पुस्तक प्रसिद्ध केल्याबद्दल त्याला धन्यवाद देतो, यावरूनसुद्धा त्यांचे मन किती मोठे आहे हे कळून येते. वास्तविक त्यांचे पुस्तक प्रकाशित करण्याची संधी लाभली यामुळे मी धन्य झालो होतो.

जीएंनी माझ्याप्रमाणेच माझा भाऊ चंद्रकांत आणि आमचे अत्रे सभागृहाचे व्यवस्थापक माधवराव खरे यांनाही एकेक गुलाबगुच्छ व पेढ्यांचा एकेक पुडा दिला. आम्ही सगळेच जीएंच्या या कृतीने भारावून गेलो होतो. मग अकस्मात उठून आम्ही त्यांचे अभिनंदन केले. तो त्यांचा वाढदिवस असे धरून मी ते केले होते.

"तुम्हांला कसं कळलं माझ्या वाढदिवसाचं?" असे खोदून खोदून त्यांनी मला विचारले. मी म्हटले, "तुम्ही हे पुस्तक दहा जुलैला तयार व्हावं म्हणून सांगितलंत त्याच वेळी माझ्या ते ध्यानात आलं."

तेव्हा ते म्हणाले, "माझंच चुकलं."

"काय?" चंदूने विचारले.

"आज माझा वाढदिवस नाही असं जर मी आत्ता ठणकावून सांगितलं

असतं तर तुम्हांला काही कळलं नसतं."

तेव्हा चंदू म्हणाला, "बरं झालं. तुम्ही तसं सांगितलं असतं तर आमचं जेवण फुकट गेलं असतं."

ते लगेच म्हणाले, "चला."

चंदूची जीभ आता बरीच धीट झाली होती. तो म्हणाला, "लेखकाबरोबर नाही. प्रकाशकाबरोबर."

जीए संकोचून म्हणाले, "त्यांना कशाला भुर्दंड?"

चंदूची जीभ आता चांगलीच सैल सुटली होती. तो म्हणाला, "भुर्दंड कसला? त्याचे पैसे तुमच्या पुस्तकातूनच काढणार ना तो?"

यावर बराच हशा पिकला. जीए आपण जेवण देणार, असे धरून बसले होते. मी अर्थातच त्यांना ती तोशीस दिली नाही. तीन-चार तास त्यांच्या संगतीत घालवून आम्ही त्यांना निरोप दिला, तेव्हा दुपारचा एक वाजून गेला होता.

आणखी चार तासांनी जीएंकडून मला फोन आला. एवढा वेळ आम्ही एकत्र होतो, आणि एवढ्यात काय निघाले? म्हणून काळजीतच मी तो उचलला. तर जीए स्वतःच बोलत होते. म्हटले, "काय विशेष?"

"विशेष म्हणजे पुस्तक छान झालं आहे, पण त्यात महत्त्वाच्या ठिकाणी एक चूक झाली आहे."

"कसली?" मी विचारले.

"अर्पण-पत्रिकेतली शेवटची ओळ. 'आणि कर्नाटक विश्वविद्यालयाचे मुक्त वाचनालय यांस— हा एक कृतज्ञ सूत फेरा'च्या ठिकाणी 'ही एक कृतज्ञ फेरा' असं छापलं गेलं आहे."

मी चुकीबद्दल त्यांची क्षमा मागितली, आणि त्यांना सांगितले, "चुकीच्या मजकुराचे ते पान असलेला तो फॉर्म मी रद्द करतो, आणि चूक दुरुस्त करून तेवढा फॉर्म पुन्हा छापून घेतो." त्याच क्षणी छापखान्याला फोन करून त्यांनी केलेला हा चमत्कार त्यांना कळवला, आणि फॉर्म पुन्हा छापून घेण्याची व्यवस्था करण्याची विनंती केली.

चूक सुधारण्याची व्यवस्था केली आहे, हेही जीएंना परत फोन करून कळवले. त्यांनी याबद्दलही माझे आभार मानले, तेव्हा त्यांच्या शब्दांत इतका संकोच होता की ती चूक जणू काही त्यांनीच केली होती. "याला फार खर्च येईल

का ?" असेही त्यांनी विचारले.

मी म्हटले, "आला तरी ज्याची चूक आहे त्यानं तो केला पाहिजे."

तरीही फोनवरच्या बोलण्यात त्यांनाच यावद्दल ओशाळल्यासारखे वाटत होते. जीएंच्या मनाचा हा हळुवारपणा हाच त्यांचा मोठेपणा होता.

५

मायबोली

जीए हे शब्दांचे प्रभू होते. अनोख्या, कधी न ऐकलेल्या शब्दांचा वापर हा तर त्यांचा विशेष होता. इतर भाषांतील शब्दांचा जरूर तिथे ते मुक्तपणे वापर करीत असत. अशाच काही कानडी शब्दांबद्दल मी त्यांना एकदा विचारले, तेव्हा ते म्हणाले, " चांगला शब्द हा मिळेल तिथून उचलावा. "

आणि बोलता बोलता त्यांनी मला असे दाखवून दिले की, मी म्हणत होतो ते शब्द कानडी नसून मराठीच आहेत, इतकेच नव्हे तर ते महाराष्ट्र शब्दकोशात असल्याचेही त्यांनी दाखवून दिले. मला पाठवलेल्या एका पत्रात अशा काही शब्दांबद्दल त्यांनी केलेले स्पष्टीकरण पाहा :

अभंड : हा शब्द महाराष्ट्र शब्दकोशात दिला आहे. त्याचा अर्थ अमर्याद, अतिशयोक्त असा आहे, व अगदी परवापर्यंत हा शब्द आमच्या घरी वापरला जात असे. (उदा : " मला इतकी भूक लागली आहे की, मी दोनशे भाकऱ्या खाईन. " या वल्गनेला उत्तर : " मुकाट्याने पाटावर बैस. काही तरी अभंड बोलून जीभ वाजवू नकोस ! ").

मंगळणे, मंगळवणे : हा शब्द देखील शब्दकोशात आहे. त्याचा अर्थ गोड बोलून काम करून घेणे. (" एखादे मूल जेवताना तक्रार करू लागले तर त्याला मंगळवले पाहिजे. ")

उजदार : हा शब्दही महाराष्ट्र शब्दकोशात आहे. म्हणजे पुढचे दार. उजदार–परसदार हे शब्द जोडीने देखील येतात.

येडताक (एडताक) : म्हणजे हेलपाटा. हा शब्द कानडीतून मराठीत आला की मराठीतून कानडीत गेला हे मला माहीत नाही. पण बेळगाव जिल्ह्यातील मराठी माणसाच्या अगदी परिचयातील तो शब्द आहे. तिकडच्या मराठी लेखकांच्या लेखनात हा शब्द अनेकदा दिसतोही.

जीएंच्या अशा शब्दवापरावद्दल एकदा 'महाराष्ट्र टाइम्स' दैनिकात एका वाचकाचे पत्र प्रसिद्ध झाले. त्याबाबत मी जीएंना विचारले. तेव्हा ते म्हणाले, "पत्रलेखकानं हेच पत्र मला पाठवलं असतं तर त्यांनी दाखवून दिलेल्या प्रत्येक शब्दाचं शंकानिरसन मी केलं असतं. परंतु पत्र वृत्तपत्रात आहे. त्यामुळे त्याची दखल घेण्याची मला आवश्यकता वाटत नाही."

वापरलेल्या शब्दाला त्यांच्या लेखी किती आणि कसे महत्त्व होते याचे एक उदाहरण सांगण्यासारखे आहे. 'पैलपाखरे' नंतर 'मुग्धाची रंगीत गोष्ट' आणि 'बखर बिम्मची' या मुलांसाठी त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांच्या छपाईचे काम सुरू झाले. त्यातील 'बखर बिम्मची' या पुस्तकात फाटकाऐवजी 'गेट' हा इंग्रजी शब्द जीएंनी वापरला आहे. मी साबरकरवादी असल्यामुळे मला तो खटकत होता. एक दिवस या पुस्तकाची मुद्रिते घेऊन मी स्वतः जीएंकडे गेलो, तेव्हा मी 'गेट' ऐवजी 'फाटक' हा शब्द वापरला तर चालणार नाही का, असे त्यांना विचारले.

जीएंनी काय उत्तर द्यावे? म्हणाले, "आठ दिवसांनी या प्रश्नाचं उत्तर देईन."

मी बुचकळ्यात पडलो. या प्रश्नाचे उत्तर द्यायला आठ दिवस कशाला हवेत हे मला कळेना. आठ दिवसांनी जीएंनी माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले ते असे : "'गेट'च्या ऐवजी 'फाटक' अशी दुरुस्ती तुम्ही सुचविलेली आहे ती स्वीकारायला फारशी अडचण नाही. तशीच हा शब्द ठेवण्यासही फारशी अडचण नसावी. काही इंग्रजी शब्द मराठी शब्दांपेक्षा जास्त परिचित झालेले आहेत उदाहरणार्थ : मॅक्सी, पेपर, टीव्ही, गॅस वगैरे. पिझ्झा, हॉट वाइट पाव, सँपल इत्यादी शब्द मी येथे आल्यावर शिकलो.

"याबाबत मी काल एक छोटा प्रयोग केला. मी पाच मुलामुलींना बोलावलं आणि त्यांना एकेक चॉकलेट दिलं. मी मुद्दामच इंग्लिश मीडियममधल्या मुलांना घेतलं नाही. (माझ्या दोन्ही भाच्या इंग्लिश मीडियमवाल्या आहेत.) त्यांतील दोन मुलं म्युनिसिपल शाळेत जातात. दोन मराठी माध्यम असलेल्या शाळेत जातात. एक छोटी मुलगी अजून शाळेत जात नाही. मी त्यांना 'फाटक' म्हणजे काय, म्हणून विचारलं. तर चार मुलांनी माहीत नाही म्हणून सांगितलं. पण 'गेट' म्हणजे सगळ्यांनीच दार, दरवाजा, बागेचा दरवाजा अशी उत्तरं दिली. 'फाटक' म्हणताच चार मुलांनी माना हलवल्या, पण त्या छोट्या मुलीनं मात्र माहीत

आहे म्हणून सांगितलं.

"मी नाही म्हटलं तरी थोडा सर्द झालो. इतरांना माहीत नाही ती गोष्ट तिला माहीत असावी याचं मला नवल वाटलं. तुला काय माहीत आहे ते सांग म्हणताच ती म्हणाली, 'फाटक भटजी आमच्या वाजूलाच राहतात!' अशा तऱ्हेने तिने माझी व माझ्या प्रयोगाची बिल्हेवाट लावली."

एवढे सारे करून आणि लिहून जीएंनी पत्राच्या शेवटी पुन्हा शेरा मारला होता: "थोडक्यात 'गेट' ऐवजी 'फाटक' हा शब्द वापरायला माझी हरकत नाही. पण तो शब्द ठेवला तर काही बिघडेल असंही वाटत नाही. बन वे ऑर द अदर, माझा कसलाच आग्रह नाही."

त्यांची ही एक मोठी गंमत होती. पत्रात आपणाला जे काही म्हणायचे असेल ते स्पष्टपणे मांडायचे. आपली आवड, इरादा, इच्छा दाखवून द्यायची. पण शेवटी आग्रह धरायचा नाही. कित्येक पत्रांच्या अखेरीस त्यांनी असे लवचिक वळण घेतले आहे. त्यांनी 'बखर बिम्मची' या पुस्तकाची चित्रे आपणाला न दाखवता छापल्याबद्दल मला चोख शब्दांत सुनावले आहे, पण शेवटच्या परिच्छेदात त्यांनी ही नाराजी आपली नसून आपल्या मित्रांची असल्याचे लिहिले आहे. इतकेच नव्हे तर शेवटी "तुम्हांला दोष प्राप्त होऊ नये म्हणून हे लिहीत आहे," असेही एक वाक्य जाता जाता टाकून दिले आहे!

आता 'गेट' सारख्या काही रुळलेल्या इंग्रजी शब्दांची त्यांनी ज्या तऱ्हेने भलावण केली आहे ती मला पटली नाही. कारण असे किती तरी शब्द आहेत की ते इंग्रजी भाषेच्या अतिप्रेमामुळे आपल्या तोंडी बसले आहेत. इंग्रजाळल्या संस्कृतीतून ते पसरले आहेत. त्यामुळेच ते वापरले नाहीत तर आपण अडाणी ठरतो असे आज अडाणी माणसांना सुद्धा वाटू लागले आहे. जाणत्या माणसांनी मराठी शब्द वापरले की आपोआप ते अजाणत्यांच्या तोंडी बसतील असे मला वाटते. जिथे आपल्या भाषेत शब्दच देता येणार नाही त्या ठिकाणी इंग्रजी शब्द वापरणे निराळे आणि केवळ फॅशन म्हणून त्यांचाच भरणा करणे निराळे. पण हे जीएंना मी काय पटवून देणार? त्या वेळपर्यंत जीएंशी माझी तेवढी घसणही नव्हती.

याचा अर्थ जीए इंग्रजीचे जादा अभिमानी होते असा नाही. त्यांनी इंग्रजी शिकवले, इंग्रजीचे अफाट वाचन केले, मित्रांना शुद्ध इंग्रजीतून पत्रेही लिहिली.

पण मराठी भाषेवर त्यांचे अतोनात प्रेम होते. हे केवळ त्यांनी मराठीतून लेखन केले एवढ्यावरूनच मी म्हणत नाही. त्यांनी आपल्या बहिणीच्या मुलींसाठी एक पत्ररूप कॅसेट तयार केली आहे. त्यात त्यांनी इंग्रजी आणि मराठी या भाषांबद्दल फार छान उद्‌गार काढलेले आहेत. हे उद्‌गार त्या मुलींशी बोलताना काढलेले असले तरी ते जीएंच्या आवडीनिवडींबद्दल बरेच काही सांगून जातात. मुलांप्रमाणे मोठ्यांनाही त्यातून बरेच काही मिळेल. त्यांच्या भगिनी प्रभाताई त्यांना "तू हाडाचा शिक्षक आहेस," असे म्हणत. त्याचाही प्रत्यय त्यात डोकावून जाताना दिसतो. मुग्धा-मनीषाला ऐकवलेले ते बोल इथे मुद्दाम देत आहे :

"प्रिय मुग्धा आणि प्रिय लिट्‌ल मनीषा, तुम्ही दोघी कुठच्या कुठे दोनशे मैलांवर पुण्याला जाऊन बसलात. त्यामुळे आम्हांला पाहिजे त्या वेळी तुमच्याशी काही बोलताच येत नाही. हां, आम्ही पत्रं पाठवतो. मग तुमची आई कधी तरी आठवण झाली, वेळ मिळाला तर उत्तर पाठवते. मुग्धा, तू देखील छोटी सुरेख पत्रं लिहितेस. पण हे सगळं काही खरं नाही समोरासमोर बोलत राहण्याची सर त्याला कशी येणार ? शिवाय लांबलचक मोठी पत्रं लिहायला तुला अजून थोडे दिवस जावे लागतील. लिट्‌ल तर अद्याप शाळेत देखील जात नाही...

तू काही मराठी कविता किंवा गाणी शिकलीस का ? मला वाटतं, या वयातच तू पुष्कळशा मराठी कविता शिकून घ्याव्यास. इंग्रजीचा तू जरूर चांगला अभ्यास कर. इंग्रजी भाषा एखाद्या राजवाड्यासारखी भव्य आहे. नंतर तुला इंग्रजी वाचनाची आवड निर्माण झाली तर तुला आयुष्यभर टिकेल असा आनंद मिळेल. एखाद्या झाडाला सतत वर्षभर फुलं येत असावीत त्याचप्रमाणं त्या आवडीनं तुला कायम आनंदाचा बहर मिळेल. परंतु काही झालं तरी मराठी आपली मायबोली आहे. आता बघ मुग्धा, इतरांनी तुला जरी किती शाबासकी दिली तरी आईबाबांनी तुझं कौतुक केलं तर तुला जास्त आनंद वाटतो. होय की नाही ? भाषेच्या बाबतीत तसंच घडतं. म्हणून आपण झाडासारखं जगायला हवं. झाड कसं उंच उंच होत आभाळातील सूर्य, चंद्र, चांदण्या यांच्या प्रकाशाकडे पाहत राहतं. पण ते कधी आपल्याला जीवन देणाऱ्या मातीला विसरत नाही की आपली मुळं तिच्यातून वर काढत नाही. म्हणून मी म्हणतो, इंग्रजीचा खूप अभ्यास कर, पण मराठीकडे दुर्लक्ष नको.

तुला एखादं विशेष काही तरी आईला सांगायचं असेल किंवा आईला तुझ्या

कानात एखादी गोष्ट बोलायची असेल तर तेव्हा इंग्रजी किती परकं वाटतं बघ तरी. याचं कारण, शेवटी आपली खरी भाषा म्हणजे मराठी हे आहे. शिवाय लहान वयातच आठवणीत राहिलेली गाणी किंवा कविता नंतर फार दिवस आपल्या ध्यानात राहतात.

मी लहान होतो त्या वेळी माझी आई पुष्कळ ओव्या म्हणून दाखवत असे. शिवलीलामृताचा अकरावा अध्याय वाचत असे. आज देखील इतक्या वर्षांनंतर त्यातील मला पुष्कळसं आठवतं आणि ते सगळं अगदी तिच्याच आवाजात बरं का! नंतर शाळा-कॉलेजात शिकलेलं पुष्कळ मी अगदी विसरून गेलो. पण लहानपणी ऐकून पाठ झालेल्या ओळी मात्र तशाच गंजून न जाता माझ्याजवळ राहिल्या आहेत. यासाठी तू आत्ताच शक्य होतील तेवढ्या कविता, श्लोक, ओव्या, स्तोत्रं शिकून घे. मोठी झाल्यावर तू कदाचित ज्ञानेश्वरी वाचशील किंवा वाचणारही नाहीस. मी स्वतः देखील काही तिचा अभ्यास केलेला नाही. तो तत्त्वज्ञानाचा एक ग्रंथ आहे. पण त्यातील काही ओव्या अतिशय मधुर आहेत. कविता निरनिराळ्या वृत्तांत आणि छंदांत लिहिता येते खरी, पण ओवीसारखी कोवळीक इतरत्र क्वचितच दिसते. खरं म्हणजे ओव्यांमधून मराठीच्या मायेचा हात आपल्या पाठीवरून फिरतो. त्यातील काही ओव्या तू शिकून घ्याव्यास.

ज्ञानेश्वरांची मुक्ता नावाची एक लहान बहीण होती. एकदा ज्ञानेश्वरांना अतिशय मनस्ताप झाला आणि ते आपल्या खोलीचं दार बंद करून आत एकाकी बसले. त्या वेळी या धाकट्या बहिणीनं त्यांनी दार उघडावं म्हणून विनवणी करताना काही अभंग लिहिले. त्यांना ताटीचे अभंग म्हणतात. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनं या ओळी भव्य आहेत असं नाही. पण तो प्रसंग अत्यंत हृदयस्पर्शी आहे आणि त्यामुळे मला ते अभंग जिव्हाळ्याचे वाटतात.

ज्ञानेश्वरांना त्या वेळी एवढा कसला मनस्ताप झाला, तो कोणी दिला हे तुला नंतर त्यांचं चरित्र वाचल्यावर कळेल. हां, आता तुला काही श्लोकांचा, कवितांचा अर्थ पूर्ण कळणारही नाही. पण त्यामुळं फारसं काही बिघडत नाही. आज ना उद्या तुला तो कळेलच. एखादी बी रुजत घातल्यावर ती उगवायला काही दिवस जावे लागतातच. आणखीन एक गोष्ट लक्षात ठेव बरं का! अर्थ हा नेहमीच फार महत्त्वाचा असतो असं नाही. काही ओळी रंगीत फुलपाखरांप्रमाणं येतात. मग त्यांच्या पंखावर बसून थोडा वेळ इकडे तिकडे गमतीनं फिरून

यायचं. कुठं जायचं, कशासाठी जायचं या गोष्टी असल्या ठिकाणी महत्त्वाच्या नाहीत.

तुला हातग्याची गाणी माहीत आहेत का? हातगा हा मुलींचा एक खेळ आहे. हत्तीचं चित्र मध्ये ठेवून मुली गोल फिरतात आणि गाणी म्हणतात. मग शेवटी खिरापत ओळखायची, आणि सगळ्यांनी ती खायची. तुझी आई तुला हातग्याच्या गाण्यांविषयी सांगेल. आज जर वेळ मिळाला तर शेवटी तुझी मावशी तुला एक गाणंही म्हणून दाखवील. ही गाणी फार जुनी आहेत, आणि ती कुणी लिहिली हे मलाही माहीत नाही. ती तुझ्या आईनं, तुझ्या मावशीनं लहानपणी म्हटली. त्यांच्या आईनं आपल्या लहानपणी म्हटली आणि तेव्हा देखील ती फार जुनी होती. आता बघ, त्या गाण्यांत एक गाणं असं आहे:

हणमंताची निळी घोडी. येता-जाता कमळे तोडी
कमळाच्या पाठीमागे होती राणी, अग अग राणी– इथे कुठे पाणी
पाणी भरले यमुना-जमुना .....

या सगळ्याचा अर्थ काय हे मात्र मला विचारू नकोस. कारण मला तो माहीतच नाही. हा हणमंत कोण होता कुणास ठाऊक? पण मुग्धाबाई, तो माणूस मात्र अगदी रसिक वरं का! सारं जग धुंडाळून त्यानं निळ्या रंगाची घोडी शोधून आणली. घोडे तांबडे, पांढरे, काळे असतात. पण असल्या साध्या घोड्यांनी या श्रीमंताचं समाधान होईल की काय? नाव काढू नको. त्याला घोडी पाहिजे ती अगदी निळ्याच रंगाची. आणि एवढ्या श्रमानं गुणवंत निळी घोडी आणल्यावर तो काय तिला कामाला जुंपील? छे! ही आपली इकडे तिकडे ऐटीत हिंडत राहिली. पण कशी हिंडली? तर येता जाता कमळं तोडत. इतर रंगांच्या घोड्या झुडपात तोंड घालतील, हरभरे खातील, अगदी फार तर झेंडूची फुलं तोडतील. पण ती मुलखावेगळी घोडी तसलं काही गावठी करणार की काय? ती येता जाता नुसती कमळंच तोडत राहणार. तू म्हणशील, कमळं पाण्यात असतात. येता जाता तिनं तोडावी इतकी का ती रस्त्याच्या कडेला असतील? अग, घोडी निळी असली की असं कमळानं भरलेलं सरोवर आपोआप अगदी वर रस्त्यावरच येऊन वसणार.

आणखी गंमत पुढंच आहे. एक कमळ त्यामध्ये काय असावं? तर या कमळाच्या

पाठीमागे चक्क एक राणी होती. ती कुठल्या देशाची राणी होती देव जाणे. पण शहाण्या राणीप्रमाणं राजवाड्यात बसून सोन्याच्या वाटीतून केशरी दूध पिण्या-ऐवजी ती पाण्यात कमळाच्या मागे काय करीत होती हे मला अजूनही समजलं नाही. पण खरं सांगू का मुग्धा ? मला त्यांचा जरी अर्थ समजला नाही तरी कमळं तोडणारी ही निळी घोडी पाहायला मला फार फार आवडलं असतं. पण ते पाहायला मिळतं याच गाण्यात. म्हणून मला आजही त्या ओळी म्हणाव्याशा वाटतात :

हगमंताची निळी घोडी, येता-जाता कमळे तोडी
कमळाच्या पाठीमागे होती राणी, अग अग राणी इथे कुठे पाणी,
पाणी भरले यमुना-जमुना ... ...

आता मी तुला मला आवडलेल्या काही कविता वाचून दाखविणार आहे. फार नाही, अगदी दोनचारच. मी सगळ्याच कविता वाचून दाखवू लागलो तर तुम्हांला एक दिवस पुरणार नाही. यशवंत, माधव जूलियन यांच्या किंवा त्यानंतर विंदा करंदीकर, पाडगावकर यांच्या कविता नंतर कधी तरी. बालकवी नावाचे एक कवी बऱ्याच वर्षांपूर्वी होऊन गेले. त्यांच्या पुष्कळ कविता नाद-मधुर आहेत. त्यांची एक कविता मला फार आवडते. मी शाळेत असताना ती प्रथम वाचली, तेव्हा ती लक्षात राहिली. कॉलेजमध्ये असताना मला इतर कवितांबरोबर तिचा अभ्यास करावा लागला. नंतर कॉलेजमध्ये मला ती शिकवावी लागली. आज तसलं शिकणं, तसलं शिकवणं सारं संपून गेलं आहे. परंतु ती कविता मात्र माझ्याजवळ राहिली आहे. त्या कवितेचं नाव आहे 'औदुंबर' :

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेउन
निळासावळा झरा वाहतो बेटा-बेटातुन
चार घरांचे गाव चिमुकले पैलटेकडीकडे
शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गर्दी पुढे
पायवाट पांढरी तयातुन अडवी-तिडवी पडे
हिरव्या कुरणामधुन चालली काळ्या डोहाकडे ... ...

कसं छान सुरेख चित्र आहे, नाही ? दीपावलीच्या भेटकार्डावर असावं

त्याप्रमाणं नाजुक टवटवीत आहे. पण या ठिकाणी नाचत उड्या मारत धावायचं नाही बरं का ! अगदी सावकाश बोलायचं, हळू पाऊल टाकायचं. कारण त्या ठिकाणी काय आहे माहीत आहे का तुम्हांला मुग्धाबाई ? एखादा योगी पाण्यात पाऊल सोडून ध्यानस्थ बसावा त्याप्रमाणं पाण्यावर काळीशार सावली टाकत पाण्यात पाय सोडून तिथे औदुंबर बसला आहे :

झाकळुनी जळ डोहकाळिमा पसरी लाटांवर
पाय टाकुनी जळात बसला तेथे औदुंबर !

तुला चित्रं काढायला आवडतात. तुला निरनिराळे रंग आकर्षक वाटतात. त्याच बालकवींनी असलं एक रंगीत चित्र या कवितेत दाखविलं आहे :

फिकट निळीने रंगविलेला कापुस मेघांचा
वरुनि कुणी गुलजार फिरविला हात कुसुंब्याचा
त्यातहि हसली मंदपणे ती चंद्रकला राणी
कडेकडेने मेघावर ये मोत्याचे पाणी
इंद्रनिळाचा रंग बहरवी गिरिच्या अंगाला
मधुन जळाची शुभ्र शोभते ती मोहनमाळा
चहुबाजूला दाट थाटला हा हिरवाळीचा
सृष्टिसखीने साज घेतला पाउसकाळीचा

जुन्या काळात माधव नावाचे कवी होऊन गेले. ते चिपळुणात राहत असत. फार वर्षांपूर्वी त्या ठिकाणी थोडे दिवस मी गेलो होतो. त्या वेळी मला त्यांना भेटता आलं असतं. पण आज, उद्या करत दिवस गेले. आणि अचानकपणं माझं तिथलं राहणंच संपून गेलं. ते घडलंच नाही. पण आज मात्र मला वाटतं, वेळात वेळ काढून आपण त्यांना भेटायला हवं होतं. त्यांनी पुष्कळ ऐतिहासिक कविता देखील लिहिल्या आहेत. त्यातील एका कवितेची सुरुवातच अशी जोरदार आहे :

तुडुम तुडुम तरि झडे नगारा
एल्गाराचा देत इशारा !

पण मला त्यांची ' हिरवे तळकोकण ' ही कविता फार आवडते. तुझा काय, माझा काय, कोकणाशी फारसा संबंध नाही हे खरं आहे. पण त्यांनी वर्णन केलेली

आंबा, जांभुळ, पिंपळ ही झाडं; गोकर्ण-सुरंगीसारखी फुलं; काजू, फणस, नारळ असली फळं आपल्याकडेही होतात. म्हणून तुला ती ओळखीची वाटतील. त्यांचं कोकणावर फार प्रेम होतं. आणि प्रेम असलं की अंगणातील साधी कोरांटी देखील अगदी जिव्हाळ्याची वाटते. त्यांनी कोकणातील साधी दृश्यं सुद्धा अतिशय रंगवून वर्णन केलेली आहेत. कोकण मुळातच रंगीत आणि सुगंधी आहे. पण त्याच्या मायेमुळे त्याच्याभोवती मऊ सोनेरी प्रकाश देखील दिसतो. आता एक वर्णन बघ हां :

सह्याद्रीच्या तळी शोभते हिरवे तळकोकण
राष्ट्रदेविचे निसर्गनिर्मित केवळ नंदनवन ...

कुठे आढळे फळभाराने लवलेली आवळी
कुठे गाळिती भुळभुळ अपुली पक्व फळे जांभळी
कुठे हलवितो पिंपळपाने पिंपळ पारावर
कुठे वडाच्या पारंबीवर झोके घे वानर

कुठे थाट घनदाट कळकिचा, त्यात संचरे कुणी
पुंगि बजावित फंदि मुशाफिर दर्यापुर सोडुनी ...

औदुंबर तरु अवधूताचा छाया दे शीतळ
शिवयोग्याचा बेल वाढवी भावभक्तिचे बळ
बघुनि पांढरी भूतपाळ वेताळ काढितो पळ
आइन किंजळ करिती मांत्रिक-मंत्रबळा दुर्बळ ...

घुंद सिंधुला मारवेलिची मर्यादा घालुन
उभी सैकती कोकणदेवी राखित तळकोकण
निकट माजली निवडुंगांची बेटे कंटकमय
आश्रय ज्यांचा करुनि नांदती कोचिंदे निर्भय...

मागे ज्यांच्या डुले नारळीपोफळिचे आगर
पुढे विराजे निळावंतिचे निळेच जळमंदिर
राष्ट्रदेविचे निसर्गनिर्मित ऐसे नंदनवन
सह्याद्रीच्या तळी शोभते हिरवे तळकोकण

त्यांनी एक छोटीशी गमतीची पण कविता लिहिली आहे. वरं का मुग्धा, तू आता पोहायला जातेस, तिथं पाणी अगदी ओलं ओलं असतं, होय की नाही ? पण तरी तू पोहून येतेस. अग, पाणी ओलं असणार नाही तर काय वाळवलेल्या पापडासारखं कोरडं राहील ? पण ती गोष्ट बाळा नावाचा एक मुलगा होता त्याला बिलकुल कबूल नव्हती. तो एकदा पोहायला नदीवर गेला. पण पाणी ओलंचिंब आहे म्हणताच तो घरी परतला आणि आईला म्हणाला, "अग आई ! ते पाणी फार ओलं आहे. ते टॉवेलानं चांगलं कोरडं कर. मग मी पोहायला शिकेन." आहे की नाही हा शहाणा बाळ्या ? ऐक ती कविता :

शिकावया पोहायाला नदीवर बाळ्या गेला
तसाच परि परतुनि आला सांगु लागला आईला
आई, पाणी ओले म्हणूनी आलो निघुनी
कर आधी कोरडे तया शिकेन मग मी पोहायाला !

आता मी जी कविता वाचून दाखवणार आहे ती समजायला थोडी अवघड आहे. पण नंतर तू मोठी झालीस, शिकून कॉलेजात गेलीस की तुला तिचा अर्थ कळेल. आणि ती किती सुंदर आहे ते तुला समजून येईल.

प्रथम गुलाबाची कळी अगदी लहान हिरवे टोपडे घातलेली दिसते. पण थोडे दिवस थांबून बघ, तिच्यातूनच एक डौलदार सुंगधी फूल दिसू लागते. या कवितेचं देखील तसंच आहे. मला तर ती कविता आवडतेच. पण ती मावशी, आई यांना देखील आवडते. तुला सुद्धा ती आवडते का बघ. ऐक हं :

युगांमागुनी चालली रे युगे ही, करावी किती भास्करा वंचना
किती काळ कक्षेत धावू तुझ्या मी, कितीदा करू प्रीतिची याचना

नभाळीतले ना उमाळी उसासे, न ती आग अंगात आता उरे
विझूनी अता यौवनाच्या मशाली, उरी राहिले काजळी कोपरे
परी अंतरी प्रीतिची ज्योत जागी, अविश्रांत राहील अन् जाग ती
न जाणे न येणे कुठे चालले मी, कळे तू पुढे आणि मी मागुती

दिमाखात तारे नटोनी थटोनी, शिरी टाकिती दिव्य उल्का पुढे
परंतू तुझ्या मूर्तिवाचून देवा, मला वाटते विश्व अंधारले
तुवा सांडलेले कुठे अंतराळा, वेचूनीया दिव्य तेजस्कण
मला मोहवाया बघे हा सुधांशू, तपाचार स्वीकारुनी दारुण

पिसारा प्रभेचा उभारून दारी, पहाटे उभा शुक्र हा प्रेमळ
करी याचना प्रीतिची लाल होऊनिया लाजरा मंगळ
निराशीत संन्यस्त होऊन बैसे, ऋषींच्या कुळी उत्तरेला ध्रुव
पिसाटापरी केस पिंजारुनी कधी धूमकेतू करी आर्जव

परी भव्य ते तेज पाहून कोजून, घेऊ गळ्याशी कसे काजवे
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा, तुझी दूरता त्याहुनी साहवे.
तळी जागणारा निखारा उमाळून येतो कधी आटवा मी वर
शहारून येते कधी अंग तूझ्या स्मृतीने उडे अन् झडे अंतर

अमर्याद मित्रा तुझी थोरवी अन् मला ज्ञात मी एक धूळीकण
अलंकारण्याला परी पाय तूझे धुळीचेच आहे मला भूषण. ”

या सर्वांच्या शेवटी जीएंनी मुग्धाला उद्देशून एक कविता म्हणून दाखवली आहे. ती अर्थात भाचीसाठी त्यांनी स्वतःच केलेली आहे. ती अशी :

लाल पेरू लाल ग, गोरे तिचे गाल ग
कळी बसली रुसून ग, आई बघते हसून ग
लाड बाइचे लाड ग, पापे तिचे गोड ग
चिमणा राग सोड ग, ते डाळिंब फोड ग
मिनी येते धावुन ग, आई घेते उचलुन ग
तिला पापे चुकचुक ग, आम्ही मात्र टुकटुक ग.

जीएंची भाची मुग्धा आणि लिट्ल मनीषा यांना यातले काय कळले, काय नकळले हा भाग निराळा. पण जीएंच्या लहानथोर असंख्य वाचकांनाही त्यातून काही ना काही मिळावे, म्हणून हा एवढा प्रपंच.

६

चंदू

जीए संकोची होते तसे थोडे भिडस्तही होते. माणसांना दुखवणे, तोडणे त्यांना जमत नसे. म्हणूनच आयुष्यात काही माणसे त्यांनी मुळातच दूर ठेवली असतील किंवा टाळली असतील का असा एक प्रश्न मला नेहमी पडतो. माझी जीएंशी एवढी जानपहचान आहे हे कळल्यावर अनेक जण आपणाला एकदा त्यांच्याकडे घेऊन चलण्याविषयी मला गळ घालीत. जीएंची आगाऊ संमती मिळवूनच मी या बाबतीत पाऊल टाकत असे.

पुण्यातील एका व्यक्तीने माझ्याकडे जीएंचा पत्ता मागितला. पण मी तो मोठ्या मुश्किलीने टाळला. एक दिवस ते गृहस्थ मला म्हणाले, "जीएंच्या पत्त्याची तुमच्याकडून आता मला गरज नाही. आता मी त्यांना केव्हाही भेटू शकतो."

"काय म्हणता काय?" मी हसून विचारले, "कुठून मिळवलात पत्ता?"

ते म्हणाले, "जीएंच्या भगिनी नंदाताई 'किर्लोस्कर कन्सल्टंट्स'मध्ये काम करतात. त्यांच्याचकडे राहतात जीए. नंदाताईंचा पत्ता तर मला माहीत आहेच. आता मी त्यांच्याकडे जाऊन जीएंना केव्हाही भेटू शकतो."

मी म्हटले, "तुम्हांला जर तसं भेटता आलं तर माझी बिलकुल हरकत नाही. पण तरीही सांगतो, जीएची भेट एवढी सोपी नाही."

गृहस्थ इरेस पडले. म्हणाले, "आणि भेटलो तर?"

मी त्यांना म्हटले, "मी शंभर रुपये हरेन."

"पैज?" त्यांनी विचारले.

मी पैज लावली. पुढे काही दिवसांनी जीएंकडे गेलो तेव्हा मी त्यांना असे असे गृहस्थ आले होते का म्हणून विचारले. जीए म्हणाले, "नाही. का हो?" तेव्हा मी त्यांना पैजेची हकीगत सांगितली. जीए म्हणाले, "पैजेत थोडी सुधारणा

करा. असा कुणी आला तर म्हणावं, त्यांची स्वाक्षरी आण आणि हजार रुपये घेऊन जा. नाही तर काय होईल, एखादा कोणी आमच्याकडे आला आणि चुकून मी दरवाजा उघडला तर मी त्याला भेटल्यासारखं होईल, आणि तुम्हांला पैसे मोजावे लागतील." आणि मग हसून म्हणाले, " हा बिझिनेस चांगला आहे. निम्मे तुमचे, निम्मे माझे ! "

अर्थात ही थट्टा होती. यातली अतिशयोक्ती वजा केली तरी कुणीही आला आणि त्याला ते भेटले असे सहसा होत नसे. याला एकच अपवाद होता. तो म्हणजे आमचा चुलत भाऊ चंद्रकांत परचुरे. त्याला मी पहिल्या भेटीत जीएंकडे नेले तेवढेच. पुढे लवकरच तो घरचा आणि मी दारचा अशी स्थिती आली ! चंदूने पहिल्या भेटीतच जीएंना जिंकले. पुण्यात जीएंना काही लागले, सवरले तर त्याचा उपयोग होईल या हेतूने मी त्याला त्यांच्याकडे नेले होते. ती कामगिरी तो शंभर टक्के बजावीत होता. आठवड्यातून एखादी खेप घालायची, सहज न मिळणारी वस्तू आणून द्यायची, चांगल्या डॉक्टरांच्या ओळखी काढायच्या आणि जीएंना त्यांच्याकडे घेऊन जायचे वगैरे गोष्टी चंदू न चुकता करीत होता.

चंदूचे एक चांगले आहे. त्याला स्वतःला भीड, संकोच वगैरे काही नाही. उंदरासारखा तो कुठेही कुरतडणार. जीएंच्या बाबतीत तर तो अक्षरशः सिंहाच्या आयाळीत बावरणारा उंदीर होता. खर्चापुरती त्याची चार-पाच पुस्तकेही त्याने वाचून काढली. पुण्याला आल्यापासून वाचन हा जीएंचा एकमेव आधार बनला होता. वाचताना एखादे पुस्तक त्यांना आवडले की ते चंदूला ते वाचायला देऊ लागले. हळूहळू चंदू हा त्यांच्या गळ्यातला ताईत बनला.

जीएंची सगळी पथ्ये पाळून काही लोकांना तो ' जीएदर्शन 'ही घडवू लागला. जीएंना काही काम लागले किंवा बऱ्याच दिवसांत दोघांची गाठभेट झाली नाही की जीए त्याला फोन करीत. या फोनवर दहा-दहा मिनिटे दोघांचे संभाषण चाले. एकदा जीएंचा फोन आला तेव्हा चंदू ऑफिसमध्ये नव्हता. फोन त्याच्या कचेरीतील एका अधिकाऱ्याने घेतला. हे अधिकारी जीएंचे चाहते. आपण फोनवर ज्यांच्याशी बोलतो आहोत ते जीए कुलकर्णी आहेत हे कळल्यावर ते थोडे हबकलेच. एवढ्या मोठ्या लेखकाशी चंदूचा घरोबा आहे हे कळल्यावर ते थक्क झाले. चंदूचा भाव वाढला. कारण चंदूच्या वशिल्याने लवकरच त्यांनी जीएंची भेट मिळवली. चंदूने ही भेट पुण्यातील आमच्या अत्रे सभागृहात जीएंना

बोलावून घडवून आणली.

जीए चंदूच्या साहेबांशी चांगले दीड तास बोलले. हे साहेब इंग्रजी पुस्तके वाचणारे होते. जीएंनी त्यांना तुम्ही कोणकोणती पुस्तके वाचली आहेत म्हणून विचारले. त्या अधिकाऱ्याने तीन-चार नावे सांगितल्यावर जीए त्यांना तिथेच थांबवून म्हणाले, " ही पुस्तकं तुम्ही नाही वाचली असती तरी चाललं असतं. नेमकी नको ती पुस्तकं वाचलीत तुम्ही ! "

एवढेच नव्हे, तर कोणती पुस्तके वाचावी त्यांची नावेही त्यांनी त्यांना सुचवली. त्यांतील एकही पुस्तक या साहेबांनी वाचले नव्हते. विशेष असे की, जीएंनी ' हिरवे रावे ' हा आपला कथासंग्रह त्यांना भेट म्हणून दिला.

हे गृहस्थ नवखे असताही जीए त्यांच्याशी अगत्याने बोलले ते केवळ चंदूमुळे. चंदूने ही भेट या साहेबांच्या इच्छेखातर घडवून आणली होती. असे असताना या गृहस्थांनी जीए गेल्यावर त्यांच्याशी झालेल्या या भेटीवर आधारून एक लेख प्रसिद्ध केला. त्यात त्यांनी लिहिले होते, " चंद्रकांत परचुरे यांच्या आग्रहावरून मी जीएंची भेट घेतली ! " आहे की नाही कडी ?

इथे जीएंनी धारवाडची एक आठवण सांगितली होती, तिची आठवण होते : " धारवाडला मला भेटायला एक पत्रकार आले होते. पुण्याचेच. गृहस्थ अघळ-पघळ गप्पा मारून, चहा-फराळ करून गेले. पण या पत्रकाराने पुण्यात जाऊन लिहिलं काय ? तर जीए आपल्याशी फार शिष्टपणाने वागले ! "

खरी गोष्ट अशी होती की, हा पत्रकार जीएंच्या कथांबद्दल काही-बाही बोलायला लागला होता. जीएंच्याच शब्दात सांगायचे तर, " तो आपल्या आवाक्याबाहेरचे बोलत होता. " इथे जीएंनी बोलणे आवरते घेऊन ही बैठक लवकर संपवण्याची घाई केली. हे अर्थातच त्या माणसाला आवडणे शक्य नव्हते.

या असल्या अनुभवांमुळेच पुढे पत्रकार जमातीची जीएंनी बरीच धास्ती घेतली होती. मराठीतले एक नट जीएंना भेटायला धारवाडला गेले, तेव्हा जीए घरात नव्हते. जीएंच्या भगिनी प्रभाताई यांनी त्यांना ते घरात नाहीत, कॉलेजमध्ये गेले आहेत असे सांगितले. पण त्यांचा यावर विश्वास बसला नाही. महाराष्ट्रात गेल्यावर आपल्या परिचितांना त्यांनी सांगितले, " घरात असून ते घरात नाहीत असं त्या बाईंनी आपणाला सांगितलं."

यामुळे इचलकरंजीचे आमचे एक स्नेही श्रीकांत भिडे यांना घेऊन चंदू

जीएंकडे गेला तेव्हा त्यांनी पहिला प्रश्न विचारला, "ते लेखक, पत्रकार अशांपैकी आहेत का?"

चंदूने नाही म्हटल्यावर जीएंचे दार भिड्यांना खुले झाले. श्रीकांत भिडे यांनी जीएंची सर्व पुस्तके नुसती वाचलेली नाहीत, तर ती विकत घेऊन त्यांचा संग्रह केला आहे, हे कळल्यावर जीएंना आनंद झाला. ते अधिक मोकळेपणाने बोलले. पण या गप्पा मुख्यतः इचलकरंजीकडच्या होत्या. या भेटीनंतर भिडे चंदूला म्हणाले, "जीएनी आपणाला पुनर्भेटीचं आमंत्रण दिलं."

तेव्हा चंदूने त्यांना सांगितले, "जीए भिडस्त आहेत. तुम्हांला बरं वाटावं म्हणून ते तसं म्हणाले असतील. ते खरं धरून चालू नका."

पोटदुखी आणि दृष्टिदोष यांनी जीएंची प्रकृती अति नाजूक बनली होती. यात चंदू हा त्यांना मोठाच विरंगुळा बनला होता. चंदूने एकदा फोन करून "तब्येत काय म्हणते?" म्हणून चौकशी केली, तेव्हा जीए म्हणाले,

"बरी नाही."

"का हो? काय झालंय?" चंदूने विचारले.

"आमची जुनी मैत्रीण आज भेटायला आलीय!" चंदू एकदम गोंधळून गेला. काही वेळ त्याचा गोंधळ तसाच ठेवून जीए म्हणाले, "अहो, जुनी मैत्रीण म्हणजे तसं काही नाही. आमची पोटदुखी! मधून मधून ती डोकं वर करते."

संध्याकाळी चंदू त्यांच्या घरी गेला तोपर्यंत जुनी मैत्रीण कुठे गायब झाली होती. पण डोळे नीट काम देत नव्हते. चंदूने यावर आपल्या एका परिचित डॉक्टरांचे नाव त्यांना सुचवले. जीए त्यात काही अर्थ नाही, म्हणत होते. पण चंदूने "एकदा दाखवून तर पाहू," म्हणून आग्रह धरल्यावर ते तयार झाले.

चंदूने लगेच फोन करून त्या डॉक्टरांची भेट ठरवली. त्याप्रमाणे ठरल्या वेळी जीएंना घेऊन तो त्या नेत्रतज्ञांकडे गेला. या तज्ञांनी जीएंच्या डोळ्यांची आपल्या परीने तपासणी केली, आणि औषधांची एक यादी जीएंच्या हातावर ठेवली. जीएंनी ती वाचली. "ठीक आहे—" म्हणून ते उठले, आणि अर्ध्या जिन्यातच त्यांनी ती यादी फाडून टाकली.

चंदू त्यांच्याकडे बघत जिन्यातच थबकला. जिना उतरून रस्त्यावर आल्यावर जीए हसत हसत त्याला म्हणाले, "सी. के., तुम्ही वाईट वाटून घेऊ नका. ही सर्व औषधं मी पूर्वी घेतलेली आहेत. त्यांचा मला काहीही उपयोग झालेला

नाही. तेव्हा आपण डोळे तपासण्यासाठी आलो होतो, हे विसरून जाऊया. जवळपास एखादं चांगलं हॉटेल असलं तर पाहा. आपण थोडं काही खाऊ. म्हणजे लवकर विसरायला होईल आणि तुम्हांला सुद्धा बरं वाटेल!"

नंतर जीएंकडूनच मला एका भेटीत कळले की, केवळ चंदूच्या तीव्र इच्छेखातर ते त्या नेत्रतज्ञाकडे गेले होते. एरवी कित्येकांना उडवून लावणारे जीए आपला मनुष्य म्हटला की त्याला किती जपत असत हे त्या दिवशी माझ्या लक्षात आले. भिडेचा किंवा संकोचाचाही भाग त्यात असला पाहिजे. कारण दृष्टीत निर्माण झालेला हा दोष असाध्य आहे, हे धारवाडच्या नेत्र-चिकित्सकाकडूनच त्यांना कळून चुकलेले होते.

पोटदुखीने तर ते फारच बेजार झाले होते. पुण्यात आल्यावर त्यांनी सर्व प्रकारच्या चाचण्या व तपासण्या करून पाहिल्या होत्या. परंतु निश्चित निदान सापडत नव्हते. अखेरीस ते इतके वैतागले की कुठलीही वैद्यकीय तपासणी करण्यास ते नाराज असत. अखेर पोटदुखीवर शस्त्रक्रिया हा उपाय सांगण्यात आला. तेव्हा आपल्या स्वभावानुसार जीएंनी या शस्त्रक्रियेसंबंधी सर्व गोष्टींची चौकशी सुरू केली. ही शस्त्रक्रिया करून सुद्धा गुण येईल याची खात्री एकही तज्ञ देत नव्हता. शस्त्रक्रिया आणि रुग्णालयात काढावे लागणारे दिवस यांच्या खर्चाचा अंदाज घेतल्यावर मी त्यांच्याकडे गेलो असता मला ते म्हणाले, "एकंदर शस्त्रक्रियेचा खर्च विचारात घेतला तर माझ्या उर्वरित आयुष्याची किंमत आता तेवढी राहिलेली नाही. इतकं होऊन व्याधिमुक्त होण्याची निश्चिती नाहीच. त्यामुळं शस्त्रक्रियेचा विचार मी सोडून दिला आहे"

मी त्यांना म्हटले, "खर्चाची काळजी तुम्ही करू नका."

"का करू नको?"

म्हटले, "आम्ही आहोत ना? तुमच्या बहिणी आहेत, पैठणकर आहेत, मी आहे."

यावर ते म्हणाले, "माझं आयुष्य हे माझं आहे. त्यावर दुसऱ्या कोणी खर्च करून कसं चालेल? खर्च करूनही पोटदुखी कायमची बंद होईल याची गॅरंटी ते देत नाहीतच. म्हणजे हा पैसा प्रयोगावारी घालवायचा?" आणि यावर पुन्हा एकदा त्यांनी ते उद्‌गार काढले, "माझं उरलेलं आयुष्य एवढ्या मोलाचं नाही!"

यावर तुम्ही काय बोलणार ?

या काळात चंदू हा जीएंचा रामभक्त हनुमान बनला होता. त्यांचा प्रवक्ता म्हणूनही त्याने बराच लौकिक मिळवला होता. जीएंकडे पोचण्याचा मार्ग चंदूच्या घरावरून जातो, इतपत नाव त्याने मिळवले होते. नारदासारखा त्याचा सर्वत्र संचार असतो. कुणाला केव्हा त्याची गरज लागेल याचा नेम नसतो.

चंदूकडून जीएंच्या बाबतीत मी जी अपेक्षा केली होती ती तो सर्वतोपरीने पुरी करीत होता. खुद्द जीएंनीच एका पत्रात त्याच्याविषयी लिहिले होते : "सी. के. मधून मधून भेटतात. पण संसार व व्यवसाय संभाळून त्यांना देखील वेळ कमीच पडतो. पण भेटले म्हणजे वेळ फार चांगला जातो. (त्यामुळे त्यांच्या बाबतीत दिवस, वेळ, आधी सूचना असल्या गोष्टी मी पूर्णपणे बाजूला ठेवल्या आहेत.)"

सी. के. म्हणजेच चंद्रकांत केशव परचुरे. त्याचा उल्लेख ते नेहमी 'सी. के.' असा करीत. ते जीए तसा त्यांच्या लेखी चंदू 'सी. के.' बनला होता !

मध्यंतरी नोबेल पारितोषिक-विजेते गोल्डिंग यांच्या 'लॉर्ड ऑफ द फ्लाइज'-चा जीएंनी अनुवाद केला होता. पॉप्युलर प्रकाशनाने ते प्रकाशित केले होते. पुण्यातील डेक्कन जिमखान्यावरच्या इंटरनॅशनल बुक डेपोमध्ये या पुस्तकाचं प्रकाशन समारंभ होणार, अशी बातमी पुण्याच्या 'सकाळ'ने मुखपृष्ठावर अगदी चौकट टाकून प्रसिद्ध केली होती. या समारंभाला जीए स्वतः हजर राहणार असेही त्यात छापले होते.

चंदूला आश्चर्य वाटले. कारण जीए समारंभ, प्रदर्शने वगैरे कटाक्षाने टाळतात हे त्याला ठाऊक झाले होते. मग हे कसे ? चंदूने जीएंना दुपारी फोन लावला आणि "बातमी वाचलीत का ?" असे विचारले. "प्रकाशन समारंभाला कुलकर्णी हजर राहणार आहेत म्हणून छापलंय सकाळवाल्यांनी."

"बातमी बरोबर आहे." जीए म्हणाले. "कुलकर्णी हजर राहतील हे खरं. पण कोण कुलकर्णी ? पुण्यात शेकडो कुलकर्णी आहेत...तेव्हा तुम्ही तिकडे लक्ष देऊ नका."

तरीही चंदू मुद्दाम त्या समारंभात जाऊन डोकावला. त्याने जीए तिथे आलेले नाहीत याबद्दल स्वतःची खात्री करून घेतली. हे तो जीएंना बोलला नाही. जीए बोलतात तसे चालतात की नाही एवढेच त्याला पाहायचे होते !

त्या दिवसापासून जीएंच्याबद्दल तो अधिकच छातीठोकपणे बोलू लागला. जीएंकडे त्याची वट आहे हे एव्हाना चंदूच्या मित्रपरिवारात सर्वश्रुत झाले होते. चंदू हा नारदासारखा अनेक क्षेत्रांत संचार करणारा असल्यामुळे त्याची केव्हा कुणाला गरज पडेल सांगता येत नाही. एक दिवस आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून चंदूला फोनवर विचारणा झाली: 'लॉर्ड ऑफ द फ्लाइज' चे लेखक गोल्डिंग पुण्यात आलेले आहेत. त्यांची आकाशवाणीसाठी मुलाखत घ्यायची आहे. जी. ए. कुलकर्णी यांनी त्यांचं पुस्तक भाषांतर केलेलं आहे. तेव्हा त्यांनी ही मुलाखत घ्यावी अशी आमची इच्छा आहे. यासाठी तुम्ही प्रयत्न कराल का?

"जीएंना विचारून नंतर सांगतो," असे म्हणाला तरी चंदूने जीएंना फोनबीन काही केला नाही. दुपारनंतर आकाशवाणीतील त्या फोन करणाऱ्या गृहस्थांना त्याने परस्पर ठोकून दिले, "जीए ही मुलाखत घ्यायला तयार नाहीत."

संध्याकाळी त्याने आपण असा असा आगाऊपणा केल्याचे जीएंना सांगितले. जीए म्हणाले, "शाबास, आता मात्र तुम्ही आमच्या तालमीत तयार झालात!"

'पैलपाखरे' पुस्तकावर 'केसरी' दैनिकात अभिप्राय आला, तेव्हा सोबत जीएंचा एक दुर्मिळ फोटो छापला होता. जीएंना कळेना हा फोटो त्यांना कोणी दिला. त्यांनी चंदूला फोन करून विचारले, "हा फोटो त्यांच्याकडे कुठून आला? तुम्ही दिला होता का?"

चंदू म्हणाला, ".माझ्याजवळ तुमचा फोटोच नाही, तर मी देणार कुठून?"

पण चंदू एवढ्यावर स्वस्थ बसला नाही. 'केसरी'त त्याच्या ओळखी होत्या. त्यातल्याच एका व्यक्तीला फोन करून चंदूने त्या फोटोबद्दल विचारले, तेव्हा असे कळले की जीए केव्हा तरी इचलकरंजीला गेले होते, त्या वेळी कुणी तरी काढलेला फोटो आहे तो!

आश्चर्य म्हणजे चंदूने एक दिवस 'पिंगळावेळ' हा जीएंचा कथासंग्रह खरेदी केला. चंदूला कधी काय लहर येईल याचा नेम नसतो. त्यातलीच ही एक लहर होती. हे पुस्तक घेऊन तो जीएंकडे गेला, तेव्हा जीए घरी नव्हते. चंदूने ते पुस्तक त्यांच्याकडे ठेवले, आणि जीएंनी त्यावर सही करून द्यावी, असा निरोप ठेवला.

काही दिवसांनी जीएंनी ते पुस्तक अत्रे सभागृहातर्फे चंदूकडे परत पाठवले. त्यावर जीएंची सही नव्हती. मात्र सोबत एक चिठी होती. त्यात लिहिले होते: "तुम्ही विकत घेतलेल्या पुस्तकावर मी सही करणे हा फुकटेपणाचा प्रकार आहे.

म्हणून मी सही केली नाही. मुळात तुम्ही हे पुस्तक विकत घ्यायला नको होते. तुम्हांला एवढी आवड आहे हे मला कळलं असतं तर मी हे पुस्तक तुम्हांला केव्हाही दिलं असतं."

अशाच एक लेखिका. त्यांना जीएंना भेटायचे होते. जीएंना त्यांनी फोनवर गाठून सांगितले, "माझं एक पुस्तक तुम्हांला द्यायचंय. केव्हा येऊ आपल्याकडे?"

जीए म्हणाले, " तेवढ्यासाठी तुम्ही मुद्दाम कशाला येताय? तुम्ही असं करा. तुम्ही ते अत्रे सभागृहात ठेवून द्या, म्हणजे मला मिळेल. "

बाई अर्थात नाराज झाल्या. पण पुस्तक द्यायचेय म्हटल्यावर दिले तर पाहिजे? त्यांनी ते अत्रे सभागृहात आणून दिले. तिथून चंदूने ते जीएंना नेऊन दिले.

थोडक्यात सांगायचे तर पुण्यातील त्या चार वर्षांत चंदू जीएंचा आधार बनला होता. केव्हाही हाक मारावी, चंदू तासा-दोन तासांत हजर. अनेक बाबतीत त्यांना तो उपयोगी पडत होता. कुठे जायचे असेल तर चंदू बरोबर हवा. त्यामुळेच चंदूच्या शब्दाला सुद्धा थोडे वजन आले होते. एकदा चंदूने अशी इच्छा व्यक्त केली की जीएंची कथा आकाशवाणीवरून ऐकवली जावी. जीए स्वतः ती वाचणार नाहीत हे चंदूला पाठ होते. दुसऱ्या कुणी वाचून दाखवली तर चालेल का? हा प्रश्न चंदूने जीएंजवळ काढला, आणि " तुमचं काय जातंय? वाचणारा वाचून दाखवील, ऐकणारे ऐकतील – त्यामुळं काही तुमची कथा बिघडणार नाही– " वगैरे काहीबाही सांगून अखेर त्यांची परवानगी मिळवली!

हे काम चंदूच करू जाणे. तो आणखी काय बोलला असेल हे देव जाणे. मी या फंदात पडलो नसतो, आणि मला ते जमलेही नसते. कदाचित जीएंनी संकोचास्तव चंदूची इच्छा मान्य केली असेल. काही असो, जीएंची एक कथा पुणे आकाशवाणीवरून वाचून दाखवली गेली. यथावकाश एक दिवस त्या कथेचे पैसे आले. मानधनाचा चेक आणि तो मिळाल्याची सही मागणारे व्हाउचर घेऊन स्वतः चंदूच जीएंकडे आला. पण जीए त्यावर सही करायला तयार नाहीत. ते म्हणाले, " ही कथा आकाशवाणीवर यावी म्हणून तुम्ही एवढी खटपट केलीत. तेव्हा ही रक्कम तुमची. "

चंदू पेचात पडला. जीए ऐकायला तयार नाहीत. आता ती रक्कम हे लेखकाचे

मानधन हे जीएंना कळत नसेल का? पण जीएंचे म्हणणे वेगळेच होते: "ही कथा आकाशवाणीवर येण्यासाठी तुम्ही एवढी मेहनत घेतलीत, तेव्हा या रकमेवर तुमचाच हक्क पोचतो."

इथे जीएंचा संकोची, दुसऱ्याच्या एवढ्या-तेवढ्या गोष्टीच्या उपकाराच्या ओझ्याखाली दबणारा स्वभाव लक्षात घेतला तर जीए त्या रकमेला का हात लावत नव्हते हे लक्षात येते. कितीही विनवणी करून सुद्धा ते ऐकत नाहीत हे पाहिल्यावर चंदू म्हणाला, "ठीक आहे. मग या पावतीवर तसं लिहून द्या."

"काय?"

"की ही कथा माझी नव्हती. ही कथा चंद्रकांत परचुरे यांनी लिहिलेली आहे. आणि त्याखाली सही करा."

इथे जीएंनी आपले म्हणणे सोडून दिले. सही केली, पण एक अट घातली. ती अशी: "ही रक्कम चंदूने आपल्याजवळच ठेवायची, आणि अप्पा परचुरे मुंबईहून आले की या रकमेचा हॉटेलात जाऊन तिघांनी मिळून समाचार घ्यायचा!"

यापेक्षाही मोठा पेचप्रसंग त्यांनी 'मुग्धाची रंगीत गोष्ट' आणि 'बखर बिम्मची' या दोन पुस्तकांच्या प्रकाशनानंतर आणला. ही पुस्तके मला देण्यापूर्वी त्यांनी मानधनाचा व्यवहार कसा करायचा, आपणाला काय आवडेल वगैरेबद्दल पत्राने विचारणा केली होती. पण आता ते हे विसरून गेल्यासारखे करू लागले. ते या पुस्तकांचे मानधन घ्यायलाच तयार नाहीत! एक म्हणजे त्यांचे-माझे स्नेहसंबंध आता इतके निकटचे झाले होते की, व्यवहाराची बोलणी सुद्धा करणे आम्हांला जड जाऊ लागले. त्यात जीएंचा स्वभाव हा असा भिडस्त, संकोची. त्या दोन पुस्तकांच्या मानधनाचा विषय काढला की ते म्हणत, "ते नंतर पाहू."

असे तीन वेळा झाल्यानंतर मी मानधनाच्या रकमेचा एक चेक त्यांच्याकडे टपालाने रवाना केला. पण दोन महिने उलटून गेले तरी तो चेक बँकेत गेला नाही! मी पत्र पाठवून त्याबद्दल त्यांना विचारले. तेव्हा त्यांचे पत्र आले ते असे: "तुमचा चेक वटवण्याची माझी इच्छा नव्हती. तुम्ही ती पुस्तके छापली हेच विशेष. मी ती पुस्तके गंमत म्हणून लिहिली होती, व त्यात माझ्या बाजूने तशी काहीच अडचण नव्हती. पण तुमच्या बाजूने मात्र तसे नाही. प्रकाशन म्हणजे नगद नारायणाचा प्रश्न असतो. शिवाय मी पैशाची अपेक्षा देखील

ठेवली नव्हती. त्याबाबत तुम्ही पुन्हा चेक द्यायची तसदी घ्याल म्हणून मी तो बँकेकडे पाठवत आहे. पण ते पैसे मी स्वतंत्र सुरक्षित ठेवत आहे."

स्वतःच्या रास्त मानधनाविषयी सुद्धा संकोची आणि दुसऱ्याचा बारीकसारीक उपकारही अंगाला लावून न घेणारे, पैशाअडक्याच्या व्यवहारात भिडस्त असे हे जीएंचे चित्र माझ्या मनावर कोरले जात असतानाच एक गोष्ट बरेच दिवस माझ्या मनात खटकत होती. ती म्हणजे साहित्य ॲकॅडेमीचे त्यांना मिळालेले पारितोषिक— आणि त्यानंतर तांत्रिक स्वरूपाच्या कारणावरून त्याबद्दल उठलेले वादळ.

त्यांच्या 'काजळमाया' या कथासंग्रहाला १९७३ सालचे उत्कृष्ट पुस्तक म्हणून हे पारितोषिक देण्यात आले होते. ते लागल्याची तार दिल्लीहून धारवाडला पोचली तेव्हा जीए धारवाडच्या आपल्या क्लबात होते. तिथे ही बातमी पसरली तेव्हा क्लबातील त्यांच्या अनेक जोडीदारांना आपल्यात रोज वसणारे हे गृहस्थ फार मोठे लेखक असल्याचे प्रथमच कळले!

या सन्मानाने जीएंना विशेष आनंद झाला हे विशेष. कारण त्यापूर्वी लागलेल्या बारीकसारीक बक्षिसांबद्दल जीएंनी कधी विशेष आस्था दाखवली नव्हती, असे त्यांच्या बहिणींकडून मला कळले होते. हे पारितोषिक स्वीकारण्यासाठी ते दिल्लीला गेले ते प्रभाताई, सौ. नंदाताई पैठणकर, त्यांचे यजमान श्री. पैठणकर यांना बरोबर घेऊन. दिल्लीच्या या प्रवासाला जोडून त्यांनी आपल्या या निकटवर्तीयांना दिल्लीच्या आसपासच्या काही यात्रास्थानांचा व प्रेक्षणीय स्थळांचाही प्रवास घडवला. पारितोषिकाची रक्कम त्यांनी अशा तऱ्हेने आधीच सत्कारणी लावली होती, आणि दिल्लीत मुक्काम करून मोठ्या आनंदात या पारितोषिकाचा स्वीकार केला होता.

परंतु त्यांचा हा आनंद फार काळ टिकला नाही. त्यांच्या एकूण कथेप्रमाणेच त्यांच्या आयुष्यात घडलेल्या या कथेचा शेवटही शोकपर्यवसायीच झाला. ते धारवाडला परतले, आणि मराठी वृत्तपत्रांतून त्यांना हे पारितोषिक कसे दिले गेले, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. ज्या वर्षासाठी हे पारितोषिक दिले गेले होते त्याच्या आधीच्या वर्षीच हे पुस्तक प्रकाशित झाले होते, असे उघड करण्यात आले होते.

हे वाचल्यावर जीएंनी ते पारितोषिक साहित्य ॲकॅडेमीला परत केले, असेही मी

ऐकले होते. पण याबद्दल साहित्यिक वर्तुळात अनेकांना शंका होती. म्हणून एक दिवस धीर करून मी हा विषय जीएंच्याजवळ काढला. अनपेक्षितपणे आलेल्या या प्रश्नासरशी जीएंनी मला उलट प्रश्न विचारला, "तुम्हांला काय वाटतं?"

"कशाबद्दल? या प्रकरणाबद्दल?" मी विचारले.

"नाही. मी ते पैसे परत केले असतील की नाही अशी शंका तुम्हांला आहे का?"

"काही लोकांना आहे."

"काही लोकांचं असू द्या. सर्वांना सर्वांचं समाधान कधीच करता येणार नाही. रामाला करता आलं नाही. सीतेला टाकून सुद्धा लोकांची ती शंका कायमच राहिली." आणि एवढे बोलून त्यांनी मला विचारले, "तुम्हांला स्वतःला काय वाटतं ते सांगा. मी ते पैसे परत केले असतील की नाही?"

"शंभर टक्के परत केले असणार. तुम्ही कुणाची दिडकीही अंगावर ठेवणार नाही. माझी स्वतःची खात्री आहे."

"मॅटर एंड्स देअर."

पण असे म्हणाले तरी तो विषय तिथे संपला नाही. पारितोषिकाच्या नावाखाली आपल्या आयुष्यावर हा निष्कारण डाग पडला, ही टोचणी त्यांच्या मनात खोल जाऊन बसली होती. कारण थोड्याच वेळानंतर त्यांनी मला विचारले, "यात माझी काही चूक होती का? चूक पॉप्युलर प्रकाशनवाल्यांची. पुस्तकाच्या प्रकाशनाची तारीख त्यांनी पुढं सरकवली. मला ती भोवली. पण प्रामाणिकपणं पुढं येऊन त्यांनी ती चूक निखालस शब्दांत अंगावर घेतली का? लेखकाला बाणाच्या टोकाशी ठेवून ते बाजूला झाले, आणि त्यानंतर लोकांना मतलब आहे तो जी. ए. कुलकर्ण्यांनी पैसे परत केले का याबद्दल. तो सुद्धा काही लेखक मंडळींनाच जास्त आहे."

पारितोषिक प्रकरणाचा हा सल किती खोल जाऊन बसला आहे, हे पाहिल्यावर मी स्तब्ध झालो. नंतर मला प्रभाताईंकडून कळले की जीएंनी पारितोषिकाची रक्कम परत पाठवली, ती साहित्य ॲकॅडेमीच्या वतीने प्रभाकर माचवे यांनी जीएंकडे परत पाठवून दिली होती. त्यासोबतच्या पत्रात माचव्यांनी जीएंना लिहिले होते : "एकदा दिलेलं पारितोषिक ॲकडेमी परत घेत नाही. तुम्ही त्याचा स्वीकार करावा."

पण तरीही जीएंनी त्याचा स्वीकार केला नाही. तो चेक साहित्य ॲकॅडेमीकडे पुन्हा परत केला. माझ्या मनात वेगळाच प्रश्न आहे : चूक तांत्रिक असली तरी त्या पारितोषिकाला ते पात्र होते की नाही ? जीएंची नसलेली ही चूक बाजूला सारून त्यांचा साहित्य ॲकॅडेमीला पुन्हा गौरव करता आला असता की नाही ? की त्यांचे 'काजळमाया' हे एकच पुस्तक या गौरवाला पात्र होते ? खरे तर हे पारितोषिक लेखकाच्या एकूण साहित्यसेवेला दिले जाते; असे मी ऐकले आहे. असे असताना साहित्य ॲकॅडेमीवाल्यांनी जीएंच्या बाबतीत झालेला हा अन्याय आणि अपमान भरून काढण्याचा प्रयत्न करायला हवा होता. पण तसे झाले नाही. शिल्लक राहिला तो जीएंनी पैसे परत केले की नाही एवढाच एक प्रश्न !

यासंबंधी जीएंच्या भगिनी प्रभाताई यांच्याशी मी बोललो तेव्हा त्यांनी साहित्य ॲकॅडेमीचे मानधन प्रवासखर्चासकट परत केल्याची पावतीच काढून माझ्या समोर धरली. तो प्रश्न आणि ती शंका कुणाच्या मनात राहू नये म्हणून मी ती इथे मुद्दाम छापली आहे.

साहित्य

SAHITYA AKADEMI

Rabindra Bhavan, 35, Ferozeshah Road,
NEW DELHI-1

No. 16829 Date 22 JUL 1974 19

RECEIVED WITH THANKS FROM Sh. G A Kulkarni
Dharwar.

the sum of Rupees Five thousand four hundred twenty & 70 P -

on account of T.A. Award amount & T.A. bill amt refunded.

by Cash/Cheque/M.O. SS 731 - 9 7 74 *on*

Rs. 5420=70

Accountant. *Secretary.*

साहित्य ॲकॅडेमीला ती रक्कम परत केल्याची हीच ती पावती
— प्रवासखर्चासकट.

आपले मानधन घेताना ते देणाराचाही विचार ते करीत असत, याचाही एक अनुभव मला पाहायला मिळाला. मुंबईच्या बालमोहन विद्यामंदिरातील एका शिक्षिकेला जीएंच्या 'बखर बिम्मची' या गोष्टीवर आधारून बालनाट्याचा प्रयोग बसवायचा होता. त्याच्या परवानगीविषयी त्यांनी माझ्याकडे चौकशी केली.

मी त्या शिक्षिकेकडून जीएंना परवानगी मागणारे एक पत्र लिहून घेतले, आणि ते जीएंकडे धाडून दिले. त्यासोबत जीएंना मी एक चिठ्ठी लिहून "आपल्या मानधनाविषयी त्या शिक्षिकेला परस्पर उत्तर पाठवावे व स्पष्ट शब्दांत काय असेल ते कळवावे", असे सुचवले होते. तरीही जीएंनी मलाच पत्र पाठवले. त्यासोबत त्यांनी त्या शिक्षिकेला हवी ती परवानगी दिली होती. शिवाय प्रयोगासाठी आपल्या काही सूचनाही लिहून दिल्या होत्या. परंतु प्रयोगाच्या मानधनाबद्दलचा प्रश्न त्यांनी माझ्यावरच सोपवून दिला होता. त्यांनी लिहिले होते :

"मी मानधनाचा आकडा मुद्दामच लिहिला नाही. त्यांचा प्रयोग व्यावसायिक नाही. शिवाय एखाद्या शाळेत असे काही करणे हे किती दगदगीचे काम आहे याची मला कल्पना आहे. या साऱ्याचा व्यवहारी विचार करून तुम्हीच ते ठरवावे असे मला वाटते. तुम्ही त्या बाबतीत जे ठरवाल ते मला पूर्णपणे मान्य आहे."

जीएंचा एक खास वाचक वर्ग आहे. त्यांच्या चाहत्यांची संख्याही खूप आहे. चंदूला जशी जीएंची कथा आकाशवाणीवर यावी असे वाटले, तसे जीएंच्या कथेचे काही तरी करावे असे वाटणारे काही रसिक आहेत. पण जीएंच्या कथेला नाट्यरूप वगैरे देणे हे कठिणातले कठीण काम आहे. तरीही कुठेकुठे तसे प्रयत्न होत असतात. त्यातलाच एक प्रयत्न माझे डोंबिवलीचे एक मित्र शरद जोशी यांनी केला होता. ते स्वतः 'ब्रिज' या खेळावर एक मासिक चालवतात, ब्रिजवर लिहितात. त्यांना जीएंची 'प्रदक्षिणा' ही एक कथा फार आवडली होती. त्या कथेवरून त्यांनी एक एकांकिका लिहिली.

त्यांनी जीएंकडे त्या एकांकिकेच्या प्रयोगासाठी परवानगी मागितली. जीएंनी त्यांना लिहिलेले पत्र त्यांच्या लेखकी व्यक्तिमत्वावर थोडा प्रकाश टाकणारे वाटल्यामुळे येथे ते देत आहे :

"श्री. शरद जोशी यांना स. न. वि. वि.

तुम्ही ब्रिजवर पुस्तके लिहिली आहेत. ब्रिजमध्ये खेळानंतर जे काही पोस्ट-मॉर्टेम होते त्यातील वितंडवाद पाहून निदान ब्रिज तरी कधी खेळायचे नाही,

असा माझा फार जुना निश्चय आहे. माझी पत्त्यांतील मर्यादा म्हणजे रमी. त्यात जिंकणे-हरणे ही सारी एकट्याचीच जबाबदारी व त्यामुळे निदान मूर्खपणा करण्याचे पूर्ण, निरामय स्वातंत्र्य असते.

"आपण आपली एकांकिका कोणा दिग्दर्शकाकडे दिल्याचे लिहिले आहे. त्यानंतर काय होते ते जरूर कळवावे. तुम्हांला ती कथा आवडली असल्याने तुम्ही तिच्यात अनाहूत बदल करणार नाही अशी मला खात्री आहेच, पण मागे एकदा तसल्या बाबतीत विचित्र अनुभव आल्याने मी ही काळजी घेत आहे. मी 'अखेरचा दिवस' नावाची एक कथा फार मागे लिहिली. पुण्याच्या एका लेखकाने तिची श्रुतिका करण्याची परवानगी मागितली. मी त्याच्या उत्साहाआड आलो नाही. त्यात घर सोडून गेलेली एक स्त्री आपल्या यारासह पुन्हा रात्री परत येते व नवऱ्याच्या प्रॉव्हिडंट फंडासाठी त्याला दुधातून विष देते. पण त्याआधीच ती गरोदर आहे, परक्याचे बीज तिच्यात आहे, हे पाहून हताश झालेला नवरा आत्महत्या करण्यासाठी त्याच दुधात गोळी टाकतो, अशी उपरोधाची धार असलेली ती एक कथा. (कथेचे नाव 'शेवटचा दिन' नसून 'अखेरचा दिवस' असे आहे--अखेरचा दिवस गोड व्हावा.) पण या लेखकाने त्या बयेला एक सावित्री करून टाकली. तिला पश्चात्ताप होऊन ती पतीच्या चरणांपाशी आली, अशी तिची विल्हेवाट लावली. त्याच्या कोणा दिग्दर्शकाने तर यापुढची पायरी गाठली. (कथेत एका मुलाचा उल्लेख असूनही) आपल्या नवऱ्यासाठीच आपणाला मूल पाहिजे म्हणून ती घरातून गेली व गरोदर होऊन आली, असा एक महामंगल मातृत्वाचा तडाखा त्याने ठेवून दिला. शेवटच्या स्वरूपात त्या कथेच्या रूपांतराचा मूळ कथेशी अगदी आंधोळीपुरता देखील संबंध राहिला नाही! तेव्हा असे काही 'प्रदक्षिणा'च्या बाबतीत घडणार नाही याची मात्र काळजी घ्यावी. रंगभूमीवरील नाटक या प्रकाराविषयी मला बिलकुल आकर्षण नाही. त्यात नाटकाला नट-नटी, प्रकाशयोजना, दिग्दर्शन यांवर फार अवलंबून राहावे लागते आणि परावलंबन जेवढे जास्त तेवढ्या जास्त तडजोडी स्वीकाराव्या लागतात. तो माझा स्वभाव नाही."

याच पत्रात त्यांच्या एका कथासंग्रहावर आलेल्या परीक्षणाबद्दल त्यांचे काय मत होते हे पाहणे उद्‌बोधक ठरेल.

"हे परीक्षण मला थोडे जुजबी वाटले. (उदा: 'पुनरपी' या कथेवरचा

अभिप्राय पाहा : "चार भिंतींचे आपल्यामागे काय होणार या विचाराने माई उदास होतात," etc.) हा तर त्या कथेचा विषयच नव्हे. व्यालेल्या मांजरीची पिले पायाखाली मऊ, गरम लागतात, त्याच वेळी माईचा बिछान्याला खिळलेला नवरा मरतो. जन्म-मृत्यूची ही साखळी तिला जाणवते न जाणवते तोच आणखी एक पोट भरलेली मांजरी दारात येते. त्याच वेळी माईला खऱ्या अर्थाने मृत्यूची, स्वतःच्या मृत्यूची भयाण जाणीव होते. हा अतिशय भयाण, सर्वस्वी एकाकी अटळ क्षण. त्याची भयछाया हा या कथेचा विषय ! त्यामुळे असला अभिप्राय अप्रस्तुतच नव्हे तर misleading ठरतो. हा अर्थात परीक्षण करणाऱ्याचा दोष मी मानत नाही. जर कथेमुळे हा समज निर्माण होत असेल तर त्या प्रमाणात कथा अपुरी ठरली असेच म्हटले पाहिजे !"

कालांतराने श्री. शरद जोशी यांनी 'प्रदक्षिणा' या कथेवर आधारित एकांकिका लिहून जीएंच्या अवलोकनार्थ तिचे हस्तलिखित त्यांच्याकडे पाठविले. एकांकिका वाचून जीएंनी आपला अभिप्राय पुढीलप्रमाणे पाठविला :

"मी सोबत आपण प्रयत्न केलेल्या एकांकिकेचे हस्तलिखित परत पाठवत आहे.

"त्याबाबत मी स्पष्ट लिहिले तर राग मानू नका. मला वाङ्मयीन दृष्ट्याही ते फारसे समाधानकारक वाटले नाही. (१) दादासाहेब एक खरोखर कर्तृत्ववान माणूस आहे, तो एक निव्वळ दांभिक पुढारी नाही, म्हणूनच त्याच्या जीवनाचे थर तपासण्यात अर्थ आहे. त्याला भेटण्यासाठी येणाऱ्या माणसांच्या वर्णनाला घालवून दिल्यामुळे तो एक कुटुंबप्रमुख एवढाच उरला आहे. (२) जानू नेहमी पत्रे बॅगमध्ये घेऊन हिंडत नसते. तिने ती मुद्दाम शोधून आपल्या बॅगेमध्ये ठेवलेली आहेत. (३) आबाजी तर एकांकिकेत केवळ हरकाम्या झाला आहे. कथेत ते फार महत्त्वाचे पात्र आहे. सत्याची जाणीव झाल्याने इतरांच्या बाबतीत कडवटपणा उरतो. पण आबाजी तो देखील तसाच स्वीकारतात. 'पण माझे कोण ऐकणार ?' या शब्दांना फार महत्त्व आहे. आबाजी मेल्यानंतर थट्टेने नोकर ते शब्द उच्चारतात. पण त्यानंतर त्या शब्दांची सूचना दादांच्या पुतळ्यातून येते की काय असाही एक फाटा त्या शब्दांना आहे. त्या त्या व्यक्तीला सत्याचे आणखी एक रूप दिसले. पण त्यात दादांचीही काही बाजू असणारच ना ? (४) शेवटी तर तुम्ही पुतळा आदळण्याचा जो बदल केला आहे तो वाईट अर्थाने

नाटकी, हिंदी चित्रपटात शोभणारा व अनधिकृत आहे. मला तो अभिप्रेत तर नाहीच, उलट माझी त्याला स्पष्ट हरकत आहे. ते मुठी आवळणे, त्वेष दाखवणे हे देखील अक्षम्यच. सुन्न, स्तब्ध झालेल्या मनाचे दुःख जास्त धारदार असते. एकंदरीने तुमच्या एकांकिकेतील पात्रे ढोबळ, त्यांच्या हालचाली अपेक्षित व सांकेतिक, दुष्ट व सुष्ट अथवा फसलेली अशी विभागणी झालेली वाटतात.

" हा तुमचा दोष नसून माध्यमाचा दोष आहे. प्रत्यक्ष दिसणारे, ऐकू येणारे काही असल्याखेरीज ते रंगभूमीवर दाखवता येत नाही. उलट अत्यंत महत्वाच्या गोष्टी तर अशा घडत नाहीत. (आबाजींनी तुळशीची पाने तोडणे, शांताक्कांनी सोप्यासोप्याने घर मनातून काढणे, रामकृष्णाने राजाभाऊची सावली देखील टाळणे, इत्यादी.)

" अत्यंत श्रेष्ठ नाटकात देखील हेच घडते. म्हणून तशी नाटके (उदा. किंग लिअर) पूर्णतः रंगभूमीवर येऊच शकत नाहीत. नाटक हे (माझ्यापुरते) दृश्य नसून मुख्यत्वेकरून काव्य आहे. थोडी अतिशयोक्ती करून म्हणायचे झाल्यास रंगभूमीवर जे दिसते ते काढून टाकले की जे उरते तेच खरे नाटक.

" एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात रूपांतर सहज होत नाही. पुष्कळदा तर ते केवळ अशक्य आहे. ' प्रदक्षिणा ' बद्दल मला हेच वाटत होते. त्या कथेत एक स्थळ, एक काळ अशा युनिटीज असल्याने प्रथमदर्शनी ती कथा एकांकिकेला योग्य वाटते. पण शांताक्का मुठी आवळून त्वेषाने पुतळा फोडील असे मात्र मला वाटले नव्हते. "

—तरीही या पत्राच्या शेवटी जीए लिहितात : " आपण घेतलेल्या परिश्रमांबद्दल आभार. "

हे सौजन्य हाही जीएंच्या पत्रांचा विशेष आहे.

डोळे अधू झाल्यामुळे पुण्याच्या या चार वर्षांच्या मुक्कामात जीए सतत अस्वस्थ असत. लेखन-वाचनावर फार मर्यादा आल्या होत्या. दैवाने वर्मी घाव घालावा तशी जीएंची अवस्था होती. भेटीगाठी टाळण्याचे हेही एक कारण होते, असे माझे मत झाले होते.

त्यांच्या या अखेरच्या दिवसांत दृष्टिदोषामुळे त्यांना रात्रीचे वाचन वर्ज्य करावे लागत होते. दिवसभरात होईल तेवढेच वाचन. आणि वाचन हा तर

त्यांचा या काळातला एकमेव आधार बनला होता. एक दिवस चंदूशी बोलताना स्थापत्यशास्त्राबाबत काही बोलणे निघाले. त्या वेळी चंदूला त्यांनी या शास्त्रावर एक छोटेसे व्याख्यानच दिले. एका बाजूला त्या विषयाचे काटेकोर नियम, सूचना, रंगसंगती आणि दुसऱ्या बाजूला त्याची प्रत्यक्ष उदाहरणे घेऊन त्यांनी असे एक चित्र निर्माण केले की चंदूची ग्रहणशक्ती संपून गेली. ती संपल्यावर चंदूने ऐकत असल्याचे फक्त नाटक चालू ठेवले होते.

सर्व ऐकून घेतल्यावर चंदूने विचारले, "आर्किटेक्चरचा तुम्ही अभ्यास केलाय का?"

यावर जीएंनी बाजूला असलेल्या पुस्तकांचा ढीग दाखवला. त्या विषयावरची डझनावारी पुस्तके तिथे उभी होती, आणि जीएंनी ती नुकतीच वाचून संपवली होती.

वाचनाचा झपाटा शेवटी शेवटी फार वाढला होता. यातले बहुतांश वाचन अर्थात इंग्रजीच असे. चंदू त्यांच्याकडे जाण्यापूर्वी त्यांना नेहमी फोन करून कळवीत असे. म्हणजे तेवढा वेळ ते गप्पांसाठी राखून ठेवत असावेत. फक्त एकदाच चंदूला त्यांनी "आज तू येऊ नकोस," असे सांगून परतवले होते. त्याचे कारण त्यांना सुनीताबाई देशपांडे यांच्याकडून 'नाइल' नावाचे एक दुर्मिळ पुस्तक मिळाले होते. ते पुरे व्हायला आठवडाभर लागणार होता. आणि हे पुस्तक वाचून संपल्याशिवाय चंदूला जीएंकडे फिरकण्याची त्यांनी सक्त मनाई केली होती!

लोकांना ते का आणि कसे दूर ठेवीत असत त्याचे हे एक ढळढळीत उदाहरण आहे. गंमत अशी की चंदू त्यानंतर आठ दिवसांनी जीएंकडे गेला तेव्हा ते नुकतेच बाहेर पडले होते. चंदू तिथे पोचला तेव्हा तिथे जीएंच्या कथासाहित्याचे एक भक्त आलेले होते, आणि त्यांना जीएंची भेट हवी होती. प्रभाताईंनी 'ते घरात नाहीत' असे सांगितले. पण त्यांना ते पटत नव्हते. प्रभाताई म्हणत होत्या, "तुम्ही आगाऊ कळवल्याशिवाय आलात, तर ते कसे भेटतील? तुम्ही तसं एखाद पत्र टाकून दिवस ठरवून या." ते गृहस्थ म्हणत होते, "गेले सात दिवस मी बाहेरच्या लॉंड्रीशी रोज वाट पाहत होतो. पण एकदाही मला ते दिसले नाहीत. म्हणून आज मी ते घरात निश्चित भेटणार म्हणून आलो. लॉंड्रीवाला म्हणतो, या सात दिवसांत ते बाहेर पडलेले नाहीत. मला वाटलं, ते आजारी

असतील. आणि तुम्ही म्हणता ते घरात नाहीत. असं कसं?"

त्यांच्या मागोमाग गेलेल्या चंदूने मग त्यांची समजूत घातली. आपणही काही खास कामासाठी त्यांच्याकडे आगाऊ न कळवता आलो, त्यामुळे ते भेटले नाहीत हे दाखवून दिले, आणि तोही निरोप ठेवून तिथून बाहेर पडला. तेव्हा कुठे त्या गृहस्थांना ते जेमतेम पटले, आणि ते चंदूबरोबर बाहेर पडले.

सुप्रसिद्ध लेखिका मालतीबाई दांडेकर यांचे चिरंजीव मोहन दांडेकर हे चंदूचे नातलग. त्यांनी जीएंची भेट घ्यायची इच्छा व्यक्त केली. चंदूने ती घडवूनही आणली. तरी पण ही भेट जीएंना कितपत मानवेल याबद्दल चंदूला आतून धास्ती वाटत होती. प्रत्यक्ष भेटीत जुने इंग्रजी चित्रपट हा विषय निघाला, आणि ही भेट चांगली दोन तास रंगली, तेव्हा दांडेकरांपेक्षा चंदूलाच जास्त धन्यत वाटली.

मी मुंबईहून मधून मधून फोन करून जीएंना हाक मारत असे. त्यांच्या तब्येतीबद्दल प्रत्यक्ष विचारपूस न करता इकडचा-तिकडचा विषय काढून अंदाज घेत असे. आजारी, व्याधिग्रस्त मनुष्याला आपली कुणी सतत काळजी वा विचारपूस केलेली त्रासदायक होत असते, हे मला स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अखेरच्या दिवसांत प्रकर्षाने दिसून आले होते.

७

पर्वणी

जी. ए. कुलकर्णी धारवाड सोडून पुण्यात राहायला आले आहेत, ही बातमी पुण्या-मुंबईच्या साहित्यिक वर्तुळांत हळूहळू पसरली होती. परंतु ते राहतात कुठे हे फार थोड्यांना माहीत होते. स्वतः जीएंनीच तशी खबरदारी घेतली होती!

स्वतःला इतर जगापासून ते कसे दूर ठेवीत असत याची एक-दोन उदाहरणे सांगतो. पुण्यात आल्यानंतर त्यांनी पहिले महत्त्वाचे ठिकाण कोणते गाठले असेल तर ते वाचनालय. पण या वाचनालयाचे सभासदत्व त्यांनी आपल्या नावावर घेतले नाही. तिथे त्यांनी बहिणीचे नाव दिले. पण कसे कोण जाणे, त्या वाचनालयातील ग्रंथपालाला हातात काठी, खांद्याला झोळी घेऊन येणारे हे गृहस्थ म्हणजे मराठीतले नामवंत कथालेखक जी. ए. कुलकर्णी आहेत हे कळले. पुस्तकाची देवघेव करताना त्यांनी जीएंना भीत भीत विचारले, "आपण जी. ए. कुलकर्णी ना?"

चोरी करताना पकडल्यासारखी जीएंची अवस्था झाली. त्यांनी त्या ग्रंथपालाला हळूच सांगितले, "हे पाहा, कृपा करून ही गोष्ट कुणाजवळही बोलू नका. इतर कुणाजवळ ही गोष्ट बोललात तर मला इथला दरवाजा बंद होईल!"

असाच प्रकार एका दुकानात घडला. जीएंना फ्रिज घ्यायचा होता. चंदूला घेऊन ते चंदूच्याच ओळखीच्या दुकानात गेले. तर तिथे वाईकर नावाचे एक गृहस्थ होते. पावती करताना त्यांनी जीएंना नाव विचारले. जीएंनी ते सांगितल्याबरोबर ते गृहस्थ चमकले. ते म्हणाले, "म्हणजे तुम्ही लेखक जी. ए. कुलवर्णी ना? मी तुमच्या कथा वाचतो. मला त्या फार आवडतात."

यावर जीए किंचित हसले. त्यांना 'थँक्यू' वगैरे म्हणाले. पण तिथून बाहेर पडल्यावर चंदूला म्हणाले, "म्हणजे पुन्हा या दुकानाची पायरी चढायला नको!"

चंदूने विचारले, "का?"

तर म्हणाले, "हा आता ज्याला त्याला सांगत सुटेल!"

चंदूने विचारले, "काय विघडलं?"

जीएंनी गॉगलमधून चंदूकडे एकदा नीट पाहून घेतले, आणि मग ते अगदी शांतपणे म्हणाले, "हे लोक मागं लागतील आपल्या! चला लवकर."

तरीही चंदू गप्प बसत नाही, हे पाहिल्यावर पुढे ते म्हणाले, "हे असे आपण मोकळेपणाने बोलत चाललो आहोत, तो खाजगीपणा संपून जाईल. चला लवकर."

तरीही चंदूला काही तरी खटकत होते. त्याने ते त्याच्या स्वभावाप्रमाणे बोलून दाखवले. तेव्हा जीए म्हणाले, "व्यक्ती म्हणून लोकांनी मला ओळखण्याचं कारण नाही. वाचकांनी माझ्या लिखाणाशी ओळख करून घ्यावी. एकदा लेखक लोकांना माहीत झाला की लेखकाच्या हालचालींवर बंधने येतात. तो मोकळेपणाने वावरू शकत नाही. तो आपले स्वातंत्र्य घालवून बसतो. अत्यंत आवश्यक असा एकांत गमावतो."

जीए इतर लेखकांपासून असे दूर का राहतात? कुणात मिसळत का नाहीत? त्यांच्या या स्वभावाबद्दल अनेक समज-गैरसमज पसरले होते. काही जण त्यांना एकलकोंडे तर काही जण माणूसघाणेही म्हणताना ऐकू येई. चंदूला त्यांनी दिलेल्या उत्तरावरून ते एकांतप्रिय होते एवढेच म्हणता येईल. माझ्या स्वतःच्या अनुभवावरून ते माणूसघाणे नव्हते, याबद्दल माझी खात्री झाली होती. अनेक लेखकांच्या बाबतीत 'दुरून डोंगर साजरे' असा प्रकार असतो. इथे प्रकार उलटा होता, असे मला वाटते. त्यांच्या जितके जवळ जावे तितके त्यांचे व्यक्तिमत्व उजळत जाते, हे तर मी दर भेटीगणीक अनुभवीत होतो.

त्यांच्याबद्दलचे गैरसमज दूर व्हावे, जीएंचे व्यक्तिमत्व काय आहे हे जगाला कळावे असे मला सारखे वाटे. म्हणूनच एका भेटीत मी त्यांना म्हटले, "टी. व्ही. वर तुमची एक मुलाखत व्हावी अशी इच्छा आहे."

त्यांनी हसून विचारले, "कुणाची?"

"माझी."

"कशाला?" त्यांनी विचारले.

"आपल्याबद्दल साहित्यिक वर्तुळात जे काही गैरसमज आहेत ते दूर व्हावेत–"

माझे वाक्य पुरे होण्याच्या आत त्याचा मतलब लक्षात घेऊन जीएंनी मला विचारले, "कुणी सांगितलं तुम्हांला माझ्याबद्दल गैरसमज आहेत म्हणून?

जे काही समज आहेत किंवा गैरसमज आहेत ते तसेच राहिले म्हणून काही बिघडत नाही. सर्वसामान्य माणूस हा गैरसमज करून घेणाराच असतो. त्याचे गैरसमज आपण कशाला हिरावून घ्यायचे? शिवाय एक गैरसमज तुम्ही त्याच्याकडून काढून घेतलात तरी त्यामुळे तो थांबत नाही. गैरसमज करून घेणं हा त्याचा आवडता उद्योग असतो. तो काढून टाकायला तो सहजासहजी तयार नसतो."

"तरी पण— मी काय म्हणतो—" मी माझे घोडे पुढे दामटण्याचा प्रयत्न केला.

"तुम्ही काही म्हणू नका. मला टी. व्ही. च्या पडद्यावर पाहायचीच तुमची इच्छा असेल तर असं करा. लाकडाची एक चौकट बनवा. एका बाजूला मी बसतो, दुसऱ्या बाजूला तुम्ही बसा. आणि तुम्हांला जे काही प्रश्न विचारायचे असतील ते विचारा!"

"छे छे, मला काही विचारायचं नाही."

"मग लोकांची काळजी तुम्ही करू नका. त्यापेक्षा आपण एक कप गरम गरम चहा घेऊ. म्हणजे आपल्या पोटाचे गैरसमज कमी होतील."

त्यानंतर जीएंनी मला समज आणि गैरसमज यावर एक छोटेसे व्याख्यान दिले. याच बोलण्याच्या ओघात आपल्या भोवती घडणाऱ्या घटनांचे अन्वयार्थ कसे लावायचे याचा एक वस्तुपाठच त्यांनी दिला.

एखाद्या घटनेची मीमांसा करताना ते त्या घटनेशी निगडित अशी आपली एखादी कथा मला वाचायला सांगत. एकदा वाचून उलगडा झाला नाही तर ती पुन्हा पुन्हा वाचायला सांगत. तरीही नाही समजली तर स्वतः त्यातल्या बारकाव्यांचा उलगडा करीत. प्रत्येक मुद्दा मला समजला आहे किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी मला प्रश्न विचारीत असत. काही न समजता नुसतीच मान डोलावलेली त्यांना आवडत नसे. काही इंग्रजी कादंबऱ्या आणि चित्रपट यांचेही दाखले ते देत.

चांगले इंग्रजी चित्रपट हा जीएंचा आवडता विषय होता, हे लक्षात आल्यावर त्यांना काही इंग्रजी चित्रपट दाखवावे असे मला वाटे. पण त्यांच्या बिघडलेल्या प्रकृतीमुळे तो योग येत नव्हता. पोटदुखी केव्हा उमटेल याचा भरवसा नसे. दृष्टिदोष हा तर सर्वांत मोठा शत्रू बनला होता. अखेर या सर्वांवर मात करून जीएंनी एक दिवस यासाठी काढला. 'केन अँड एबल' ह्या चित्रपटाची

व्हीडिओ कॅसेट भाड्याने आणून मी त्यांना तो दाखवला.

या चित्रपटाचा कालावधी फार मोठा म्हणजे सहा तासांचा होता. त्यामुळे तो तीन कॅसेट्समध्ये विभागलेला होता. पैकी दोन भाग पाहून झाल्यावर आम्ही जवळच्याच हॉटेलमध्ये जेवण घेतले, आणि उर्वरित भाग जेवणानंतर पाहिला. तो पाहून पुरा झाल्यानंतर जीए मला म्हणाले, "अप्पा, आपली ओळख यापूर्वीच व्हायला हवी होती. फार उशिरा ओळख झाली आपली!"

मला वाटले, चांगला चित्रपट पाहायला मिळाल्यामुळे ते भारावून गेले असतील. म्हणून मी विचारले, "आवडला ना?"

तेव्हा लक्षात आले, की चित्रपट आवडला म्हणून ते असे म्हणत नव्हते, तर चित्रपट पाहण्याचा एकूण कार्यक्रम त्यांना जास्त आवडला होता!

मला संकोचल्यासारखे झाले. आमच्याबरोबर चंदू होता. तो आपल्या नेहमीच्या फटकळपणाने म्हणाला, "असं काही तरी बोलू नका. अप्पा उगीच चढून जाईल."

जीए म्हणाले, "काही हरकत नाही. त्यामुळे असे योग वारंवार येतील." यावर साहजिकच आमच्या तिघांत हास्याची एक लाट उठली. ती ओसरल्यावर जीए म्हणाले, "तुमच्या दोघांमुळे माझी पुण्याबद्दलची धास्ती कमी झाली."

मी एकदम विचारले, "म्हणजे पुण्याबद्दलचा तुमचा गैरसमज दूर झाला का?"

"नाही." जीए हसून म्हणाले, "तुम्ही दोघे पुणेकर नाहीत. तुम्ही मुंबईचे, त्यामुळं धास्ती वाटत नाही."

चंदू म्हणाला, "मुंबईचे सुद्धा नाहीत. मुळात आम्ही दोघे कोकणी. म्हणजे गुहागरचे. नंतर मुंबईचे आणि अधून मधून पुण्याचे."

थोडा आत्मप्रशस्तीचा दोष पत्करूनही ही आठवण इथे मी मुद्दाम दिली आहे. जीए हे माणूसघाणे वा एकलकोंडे होते असा जो त्यांच्याबद्दलचा प्रवाद आहे तो कितपत खरा आहे याचा शोध आणि बोध घेणारांना यावरून घेता येईल. माझ्या मते जीए हे मराठी सारस्वतात उमटलेले एक रत्न होते, आणि माझ्या लेखी ते एक स्वप्न होते.

त्या दिवशी मला घासून पाहायची होती ती माझी आवड-निवड. जीएंच्या आवडी-निवडींशी ती कितपत जुळते हे पाहणे हा माझा अंतस्थ हेतू होता. म्हणून

जीएंना मी विचारले, "चित्रपट कसा वाटला ते सांगा ना?"

जीए म्हणाले, "चित्रपट चांगला होता. पण चित्रपटाचा शेवट असा नको होता."

"मग कसा हवा होता?" मी विचारले.

"चित्रपटाची अखेर सुखांतिकेत केली आहे. ती शोकांत हवी होती."

"का?"

"सुखांतिका मनावर क्वचितच ठसते. शोकांतिका ही वास्तवाच्या अधिक जवळची असते. मनावर तिचा परिणाम होतो. लेखकाला या चित्रपटाची शोकांतिका सहज करता आली असती. सुखांतिका आणि शोकांतिका या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत."

मी लेखक नसल्यामुळे मला यात जास्त काही कळत नाही. पण जीएंच्या बहुतेक कथा दुःख, वेदना, कारुण्य यांनी वेढलेल्या का असतात हे यावरून थोडेबहुत उमगले. सुखांतिका आणि शोकांतिका यावर जीएंच्या तोंडून असे विचार ऐकले की मला मराठीतले श्रेष्ठ नाटककार वसंतराव कानेटकर यांची आठवण व्हायची. वसंतराव 'शोकांतिकेचे अंतरंग : शेक्सपीरियन, ग्रीक आणि भारतीय' या नावाचा एक ग्रंथ लिहीत आहेत. याबाबत वसंतराव मला जे काही सांगत असत ते मी माझ्या भाषेत जीएंना सांगत असे. या दोन लेखकांची भेट घडवून आणण्याची माझी इच्छा होती. दोघांनी त्याला होकारही दिला होता. परंतु तो योग काही आला नाही.

जीएंच्या मते भारतीय शोकांतिका ही सर्वश्रेष्ठ शोकांतिका. आपल्या या विधानाला समर्पक म्हणून ते स्वातंत्र्यवीर सावरकरांचे उदाहरण देत. त्यांचे म्हणणे असे की, सावरकर हे बॅरिस्टर होते. त्यांनी आयुष्यात उत्तम वकिली करून भरपूर पैसा केला असता. पण आपले आयुष्य त्यांनी राष्ट्रासाठी झोकून दिले आणि आयुष्याची शोकांतिका करून घेतली. ही खरी जिवंत भारतीय शोकांतिका. ते म्हणत, "माणूस नेहमी सुखांतिका आणि शोकांतिका या दोहोंच्या मधल्या रेषेवरून चालत असतो." हाच मुद्दा विशद करून सांगताना जीएंनी उदाहरण दिले होते :

"आपण एखादं गुलाबाचं रोप लावतो. त्याला रोज पाणी घालतो. त्या रोपाची खूप काळजी घेऊन त्याला वाढवतो. कालांतराने गुलाबाच्या झाडाला

कळ्या येतात. कळी उमलते, फूल आकार घेतं. ही झाली सुखांतिका. पण आपण जेव्हा ती कळी तोडतो तेव्हा उरलेल्या देठाकडे पाहिलं की त्या तिथे दिसते ती शोकांतिका. फूल तोडल्यावर त्या झाडाची फांदी भकास दिसणार आहे याची कल्पना आपणाला असते, तरी देखील ते फूल आपण तोडतो आणि सुखांतिकेची शोकांतिका करतो!"

जीए अनेक लेखकांच्या गाठीभेटी टाळीत असले तरी त्यांना आवडणारे अनेक लेखक होते. सावरकर, अत्रे, कानेटकर, विंदा करंदीकर, श्री पु. भागवत, गंगाधर गाडगीळ, पु. ल. देशपांडे, व्यंकटेश माडगूळकर, विद्याधर पुंडलीक, जयवंत दळवी, दि. बा. मोकाशी अशी कित्येक नावे त्यांच्या 'गुड बुक्स'मध्ये होती. ते लेखकांना टाळीत असले तरी त्यांची पुस्तके ते टाळीत नसत. अनेकदा सामान्य वाटणारी पुस्तके सुद्धा त्यांच्या नजरेखालून जात असत, असे मी पाहिलेले आहे. आवडलेली गोष्ट आवडली म्हणतानाही त्यांची जीभ अडखळत नसे. तसे ते टी. व्ही.वरचे कार्यक्रम सुद्धा सहसा चुकवीत नसत. याबद्दल त्यांना एकदा विचारले तेव्हा म्हणाले, "जगात कोण, कुठे, काय करतोय, कुणाचं काय चाललंय हे त्यामुळं कळतं."

वसंत कानेटकरांचे 'असं घडलंच कसं?' हे नाटक दूरदर्शनवर दाखवले गेले, तेव्हा जीएंनी ते पाहिले होते. हे नाटक त्यांना आवडले, तेव्हा चंदूकरवी त्यांनी ते कानेटकरांना कळवलेले मला आठवते. त्याच सुमाराला भालबा केळकरांची एक मुलाखत दूरदर्शनवरून प्रसारित झाली होती. त्यातील 'वेड्याचं घर उन्हात' या वसंतरावांच्या नाटकातील काही स्वगते भालबा केळकरांनी साभिनय म्हणून दाखवली होती. या मुलाखतीनंतर 'वेड्याचं घर उन्हात' हे नाटक जीएंनी तत्काळ मागवून घेतले होते.

पण वसंतरावांच्या 'गवताला भाले फुटतात' या नाटकाबद्दल मला लिहिलेल्या एका पत्रात जीएंनी लिहिले होते : "तुम्ही जर गैरसमज करून घेणार नसाल तर सांगतो. 'गवताला भाले—' हे फारसे नाटकासारखे वाटत नाही. एक संवादमय हकीकत वाटते. हे माझे एकट्याचेच मत नाही. इतर काही जणांना देखील तसेच वाटते. पण त्यांच्या टीकेचा रोख विशेषतः मुखपृष्ठावर आहे. एका बाजूने ते अतिशय भावडे व बाळबोध झाले आहे. गवत म्हणून प्रत्यक्ष गवत, भाले म्हणून भाल्यांचे चित्र, असा प्रकार झाला आहे. विशेषतः जिरेटोप तर

कवटीसारखा दिसतो. दात मोत्यासारखे असावेत, पण मोती मात्र या चित्रातल्या-प्रमाणे दातांसारखे दिसू नयेत."

एवढे लिहिल्यावर जीए पत्राच्या शेवटी आपल्या नेहमीच्या रिवाजानुसार लिहितात: "हे सारे मी खुर्चीत बसून लिहीत आहे, तेव्हा असल्या बैठ्या मतांना तुम्ही फारशी किमत देऊ नये. कारण अनेकदा रंगमंचावर उभे राहिल्यावर असली मते अर्थहीन ठरवण्याचे सामर्थ्य एखाद्या नाटकात असते. तेव्हा कोल्हा-पूरला तुमचा प्रयोग झाल्यावरच त्याबाबत बोलणे योग्य ठरेल."

"प्रसिद्धीच्या झोतापासून जाणीवपूर्वक दूर राहून स्वतःविषयीचे कुतूहल वाढवण्यात जीए फार हुषार होते," असेही मी काही लेखकांच्या तोंडून ऐकले होते. पण माझ्या चार वर्षांच्या सहवासात मला असा कधी संशयही आलेला नाही. स्वतःबद्दलचे कुतूहल वाढवणारी किंवा कौतुक करून घेणारी माणसे कुठे ना कुठे उघडी पडत असतात. खरे तर जीएंना असल्या गोष्टींची जरुरीच नव्हती अशा उंचीवर त्यांच्या कथा-वाङ्मयाने त्यांना नेऊन ठेवले आहे. याउलट 'जीए' या नावासाठी भलते काही करू नये असा त्यांचा कटाक्ष होता.

त्यांच्या बालवाङ्मयाच्या पुस्तकांत रंगीत चित्रे असावी अशी माझी हौस होती. जीएंनी स्वतः होऊन मला विचारले, "याला खर्च किती येईल?" माझ्या तोंडून चौदा-पंधरा हजार रुपये खर्च येईल हे कळल्यावर त्यांनी मला वेड्यात काढले, आणि विचारले, "माझं पुस्तक म्हणजे तुम्ही काय समजता? ॲलिस इन वंडरलँड' की 'अरेबियन नाइट्स?"

मी असे किती तरी लेखक पाहिलेले आहेत की, प्रकाशकाने आपल्यावर खर्च करणे यात त्यांना भूषण वाटते. 'केन ॲंड एबल' हा चित्रपट मी जीएंना दाखवला त्या वेळी जेवणाचे बिल ते काही केल्या मला देऊ देत नव्हते. पण ते हॉटेलच माझ्या नेहमीच्या बगीतले निघाले, त्यामुळे त्यांनी जीएंनी पुढे केलेल्या पैशांना हात लावला नाही. "नेहमी नेहमी तुम्ही असं करता—" म्हणून जीए इतके नाराज झाले की रस्त्यातून परतताना काय बोलावे हेच त्यांना कळेना. तेवढ्यात दबा धरून बसलेल्या माझ्या एका परिचित जीए-चाहत्याने त्यांचे अलगद काही फोटो काढून घेतले, तेही त्यांच्या लक्षात आले नाही!

पण त्यांचा एक खास फोटो काढण्यासाठी मी आमचे परम मित्र मोहन वाघ यांना मुंबईहून घेऊन येतोय, असे सांगितले तेव्हा त्यांनी माझा बेत तिथल्या

तिथे हाणून पाडला. जीएंचा एखादा चांगला फोटो आपल्यापाशी असावा अशी माझी इच्छा होती. म्हणून मी मोहन वाघ यांना ही कामगिरी सांगितली होती. जीएंना मी तसे सांगितले. म्हटले, " त्यासाठी तुम्हांला कुठे जाण्याची गरज नाही. मोहन वाघ हे उत्तम फोटोग्राफर आहेत. ते इथे येऊन त्यांना हवे तसे फोटो घेतील. "

त्यावर जीएंनी विचारले, " मोहन वाघ ? एवढा मोठा कलाकार माझे फोटो काढण्यासाठी मुंबईहून येणार ? "

मी म्हटले, " तो कितीही मोठा असला तरी तो माझा मित्र आहे. तुमचा फोटो काढण्यात त्याला आनंदच होईल. "

पण यावर ' थांबा ' म्हणून ते आतल्या खोलीत गेले, आणि त्यांनी आपला एक फोटो मला आणून दिला. वर म्हणाले, " नको त्या गोष्टीवर वायफळ खर्च कशाला करायचा ? हा फोटो काय वाईट आहे ? "

तो फोटो लहान होता. मला भिंतीवर लावण्यासाठी त्यांचा मोठा रंगीत फोटो हवा होता. पण त्यांनी त्याला सक्त नकार दिला. तेव्हा त्यांनी दिलेला तो फोटो मोठा करायचा, आणि त्याची एक प्रत त्यांनाही द्यायची असे ठरले. मला असे वाटते की, या बारीकसारीक गोष्टी पाहिल्या तरी जीए स्वतःभोवती दिवे ओवाळून घेणाऱ्या त्या पंक्तीतले नव्हते.

जीए हे मोठे कलावंत होते, त्यामुळे छायाचित्रांपेक्षा सुद्धा तैलचित्रांना ते जास्त महत्त्व देत असावेत, हे पुढे लवकरच माझ्या लक्षात आले. जीएंनी पैठणकरांच्या म्हणजे नंदाताईंच्या घरातले वास्तव्य संपवून जवळच नवी स्वतंत्र जागा घेतली. या नव्या जागेत चंदूला घेऊन मी प्रथमच गेलो, तेव्हा माझ्या नजरेत काही विशेषत्वाने भरले असेल तर ते म्हणजे भिंतीवर टांगलेली तैलचित्रे. विशेष म्हणजे ही चित्रे स्वतः जीएंनी काढली होती. त्याहूनही नवलाची गोष्ट अशी की, या चित्रांभोवतीच्या चौकटी जीएंनी स्वतः तयार केल्या होत्या. म्हणजे खर्चापुरते सुतारकाम सुद्धा त्यांना अवगत होते !

ही माहिती मला प्रभाताईंकडून समजली. जीए स्वतःविषयी काही सांगत नसत. नव्या जागेत दोन नवीन खुर्च्या आल्या होत्या. पण सर्वांत उठून दिसत होती ती त्यांनी धारवाडहून आणलेली त्यांची लाडकी जुनी खुर्ची. आपल्या या नव्या निवासस्थानाबद्दल नंतर जीएंनी चंदूला पाठवलेल्या एका पत्रात लिहिले होते :

"या नव्या घरट्यात आम्ही अजून स्थिरावलो नाही. पाच-सात ऐसपैस सोप्यांच्या (पण अगदी घरगुती स्वरूपाच्या) घरांची जुनी सवय जात नाही. दोन पाउले टाकली की 'हॉल' संपतो. असल्या फ्लॅट्सची एक सोय काही धारवाडच्या जुन्या घरात मिळाली नसती, पण (त्या उत्तर कर्नाटकी अघळपघळ रुमालाप्रमाणे असणाऱ्या) घरांचे घरपण मात्र आम्हांला, विशेषतः प्रभावतीला जाणवते. साधारणपणे अंगाप्रमाणे कपडे शिवायचे असतात, पण ती फार जुनी पद्धत झाली आहे. हाउसिंग सोसायटीमधल्या फ्लॅट्समध्ये दिलेल्या कपड्यांमध्ये अंग कोंबून राहण्याचा प्रयत्न करावा लागतो."

धारवाड सोडण्यामागील नाखुषीचे हेही कारण होतेच. तिथल्या मोठ्या घराचा मोकळेपणा, ऐसपैसपणा शहरातल्या दोन किंवा तीन खोल्यांत—त्यांच्याच भाषेत बोलाययचे तर कबुतरांच्या खुराड्यात—कुठे मिळणार?

अशा या खुराड्यातून बाहेर पडायचे म्हणजे आगीतून फुफाट्यात पडायचे. माणसे आणि वाहने यांनी धडधाकट माणसाला सुद्धा सरळ चालण्याची सोय ठेवलेली नाही. चालण्याची तर जीएंना मोठी आवड. फिरायचे कुठे? मग ते पुणे विद्यापीठाच्या परिसरात जायचे. तो परिसर दाट झाडीने आणि विरळ रहदारीच्या रस्त्यांनी शांत-निवांत बनवलेला आहे. ओळख काढणारा किंवा ओळखणारा कुणी भेटण्याचीही धास्ती नाही. विद्यापीठाच्या आवाराइतकीच त्याची बाग आणि नर्सरी त्यांची आवडती होती.

बागेची किंवा फुलझाडांची त्यांना नुसती आवड नव्हती. त्यांचा अर्धा जीव त्यात गुंतलेला असे. पुण्याच्या गोळीबार मैदान भागात रामभाऊ जगताप यांची 'राम रोजेस' नावाची एक सर्वतोमुखी झालेली नर्सरी आहे. अनेक क्षेत्रांतील नामवंत असामी ती पाहायला आणि फुलझाडे विकत घ्यायला तिथे येत असतात. (हेमा मालिनी पुण्याकडे गेली की या नर्सरीत गेल्याशिवाय तिला चैन पडत नाही. गेली की डिकीभर फुलझाडे ती घेते. तिला जर विचारले, मागची फुलझाडे नेलीस ती काय म्हणतात, तर "बहुतेक सारी मरून गेली" असे सांगते, आणि आणखी डिकीभर फुलझाडे घेऊन जाते!")

तर अशा या 'राम रोजेस' नर्सरीचे वर्षातून एकदा भरणारे प्रदर्शन पाहायला जीए गेले. बरोबर चंदू. नर्सरीचा प्रदर्शन सप्ताह असल्यामुळे नर्सरीचे चालक रामभाऊ जगताप यांना येणाऱ्या प्रत्येक माणसाबरोबर वेळ घालवायला वेळ नाही.

इतर कुणी असता तर त्यांनी पाच-दहा मिनिटे बोलून त्याला बागेत सोडून दिले असते. "तुला काय हवं ते बघ, आणि काही लागलं तर नर्सरीचे माळी, सुपरवायझर हे आहेतच—" म्हणून. हे 'जीए' आहेत आणि मराठीतील मान्यवर लेखक आहेत हे रामभाऊंना काय ठाऊक? स्वतः जीए तर आपण कोण याचा सुगावा लागू देण्याची शक्यताच नव्हती.

पण असे असूनही रामभाऊ जगताप जीएंशी बोलण्यात गुरफटले. गुरफटले म्हणजे पार रंगून गुंतून गेले. मी एकदा त्यांची ही नर्सरी पाहायला गेलो तेव्हा रामराव मला म्हणाले, "तशी 'येडी' बरीच येतात. वरवर काहीबाही विचारतात, त्यांच्याशी फार बोलण्यात अर्थ नाही हे दोन मिनिटांत उघड होतं. पण हे काम मुळालाच हात घालणारं होतं. त्यांचं फुलझाडांबद्दलचं ज्ञान खऱ्याखुऱ्या ज्ञानी माणसाचं होतं. अशा व्यक्तीशी बोलण्यात आमचं ज्ञान उजळून निघतं. गंज निघून जातो, आणि कधी नाही एवढा आनंद मिळतो. आता हेच पाहा ना. त्यांनी मला विचारलं, 'काळा गुलाब काळा गुलाब' म्हणतात तो खरोखरच असतो का?"

"मग?" मी उत्सुकतेने विचारले.

"मग काय ते नंतर सांगतो." रामराव म्हणाले. "त्यांच्या प्रश्नाचा रोख असा होता की गुलाब काळा असू शकतो का? कारण निसर्गानं फुलांना अनेक रंग दिले आहेत. पण काळा हा निसर्गाचा रंगच नव्हे. निसर्गात काळं म्हणून काही नाहीच. तेव्हा काळा गुलाब काय, पण कुठलंच फूल काळं असू शकत नाही. आता गुलाबांच्या रंगांत अनेक नव्या नव्या छटा आम्ही प्रयत्नपूर्वक जमवून आणल्या आहेत. पण काळाभोर गुलाब परदेशात सुद्धा आजमितीस पैदा करता आलेला नाही."

"यावर जीए काय म्हणाले?"

"ते म्हणाले, मला तेच कळून घेण्याची उत्सुकता होती. तसं झालं, फूल काळं निघालं तर तो एक चमत्कार ठरेल. त्यांनी मला विचारलं, अनेक नर्सरीवाले काळा गुलाब म्हणतात ते काय? तेव्हा मी म्हटलं, ते दाखवतात तो काळपट मरून असा रंग असतो. काळा कुळकुळीत रंग आणण्याचे प्रयत्न जगभर चालू आहेत. पण अजून कुणाला ते जमलेलं नाही."

अशी ही फुलझाडांबद्दलच्या ज्ञान-माहितीची उजळणी दोन-अडीच तास

"या नव्या घरट्यात आम्ही अजून स्थिरावलो नाही. पाच-सात ऐसपैस सोप्यांच्या (पण अगदी घरगुती स्वरूपाच्या) घरांची जुनी सवय जात नाही. दोन पाउले टाकली की 'हॉल' संपतो. असल्या फ्लॅट्सची एक सोय काही धारवाडच्या जुन्या घरात मिळाली नसती, पण (त्या उत्तर कर्नाटकी अघळपघळ रुमालाप्रमाणे असणाऱ्या) घरांचे घरपण मात्र आम्हांला, विशेषतः प्रभावतीला जाणवते. साधारणपणे अंगाप्रमाणे कपडे शिवायचे असतात, पण ती फार जुनी पद्धत झाली आहे. हाउसिंग सोसायटीमधल्या फ्लॅट्समध्ये दिलेल्या कपड्यांमध्ये अंग कोंबून राहण्याचा प्रयत्न करावा लागतो."

धारवाड सोडण्यामागील नाखुषीचे हेही कारण होतेच. तिथल्या मोठ्या घराचा मोकळेपणा, ऐसपैसपणा शहरातल्या दोन किंवा तीन खोल्यांत—त्यांच्याच भाषेत बोलायचे तर कबुतरांच्या खुराड्यात—कुठे मिळणार?

अशा या खुराड्यातून बाहेर पडायचे म्हणजे आगीतून फुफाट्यात पडायचे. माणसे आणि वाहने यांनी धडधाकट माणसाला सुद्धा सरळ चालण्याची सोय ठेवलेली नाही. चालण्याची तर जीएंना मोठी आवड. फिरायचे कुठे? मग ते पुणे विद्यापीठाच्या परिसरात जायचे. तो परिसर दाट झाडीने आणि विरळ रहदारीच्या रस्त्यांनी शांत-निवांत बनवलेला आहे. ओळख काढणारा किंवा ओळखणारा कुणी भेटण्याचीही धास्ती नाही. विद्यापीठाच्या आवाराइतकीच त्याची बाग आणि नर्सरी त्यांची आवडती होती.

बागेची किंवा फुलझाडांची त्यांना नुसती आवड नव्हती. त्यांचा अर्धा जीव त्यात गुंतलेला असे. पुण्याच्या गोळीबार मैदान भागात रामभाऊ जगताप यांची 'राम रोजेस' नावाची एक सर्वतोमुखी झालेली नर्सरी आहे. अनेक क्षेत्रांतील नामवंत असामी ती पाहायला आणि फुलझाडे विकत घ्यायला तिथे येत असतात. (हेमा मालिनी पुण्याकडे गेली की या नर्सरीत गेल्याशिवाय तिला चैन पडत नाही. गेली की डिकीभर फुलझाडे ती घेते. तिला जर विचारले, मागची फुलझाडे नेलीस ती काय म्हणतात, तर "बहुतेक सारी मरून गेली" असे सांगते, आणि आणखी डिकीभर फुलझाडे घेऊन जाते!")

तर अशा या 'राम रोजेस' नर्सरीचे वर्षातून एकदा भरणारे प्रदर्शन पाहायला जीए गेले. बरोबर चंदू. नर्सरीचा प्रदर्शन सप्ताह असल्यामुळे नर्सरीचे चालक रामभाऊ जगताप यांना येणाऱ्या प्रत्येक माणसावरोबर वेळ घालवायला वेळ नाही.

इतर कुणी असता तर त्यांनी पाच-दहा मिनिटे बोलून त्याला बागेत सोडून दिले असते. "तुला काय हवं ते बघ, आणि काही लागलं तर नर्सरीचे माळी, सुपरवायझर हे आहेतच—" म्हणून. हे 'जीए' आहेत आणि मराठीतील मान्यवर लेखक आहेत हे रामभाऊंना काय ठाऊक? स्वतः जीए तर आपण कोण याचा सुगावा लागू देण्याची शक्यताच नव्हती.

पण असे असूनही रामभाऊ जगताप जीएंशी बोलण्यात गुरफटले. गुरफटले म्हणजे पार रंगून गुंतून गेले. मी एकदा त्यांची ही नर्सरी पाहायला गेलो तेव्हा रामराव मला म्हणाले, "तशी 'येडी' बरीच येतात. वरवर काहीबाही विचारतात, त्यांच्याशी फार बोलण्यात अर्थ नाही हे दोन मिनिटांत उघड होतं. पण हे काम मुळालाच हात घालणारं होतं. त्यांचं फुलझाडांबद्दलचं ज्ञान खऱ्याखुऱ्या ज्ञानी माणसाचं होतं. अशा व्यक्तीशी बोलण्यात आमचं ज्ञान उजळून निघतं. गंज निघून जातो, आणि कधी नाही एवढा आनंद मिळतो. आता हेच पाहा ना. त्यांनी मला विचारलं, 'काळा गुलाब काळा गुलाब' म्हणतात तो खरोखरच असतो का?"

"मग?" मी उत्सुकतेने विचारले.

"मग काय ते नंतर सांगतो." रामराव म्हणाले. "त्यांच्या प्रश्नाचा रोख असा होता की गुलाब काळा असू शकतो का? कारण निसर्गानं फुलांना अनेक रंग दिले आहेत. पण काळा हा निसर्गाचा रंगच नव्हे. निसर्गात काळं म्हणून काही नाहीच. तेव्हा काळा गुलाब काय, पण कुठलंच फूल काळं असू शकत नाही. आता गुलाबांच्या रंगांत अनेक नव्या नव्या छटा आम्ही प्रयत्नपूर्वक जमवून आणल्या आहेत. पण काळाभोर गुलाब परदेशात सुद्धा आजमितीस पैदा करता आलेला नाही."

"यावर जीए काय म्हणाले?"

"ते म्हणाले, मला तेच कळून घेण्याची उत्सुकता होती. तसं झालं, फूल काळं निघालं तर तो एक चमत्कार ठरेल. त्यांनी मला विचारलं, अनेक नर्सरीवाले काळा गुलाब म्हणतात ते काय? तेव्हा मी म्हटलं, ते दाखवतात तो काळपट मरून असा रंग असतो. काळा कुळकुळीत रंग आणण्याचे प्रयत्न जगभर चालू आहेत. पण अजून कुणाला ते जमलेलं नाही."

अशी ही फुलझाडांबद्दलच्या ज्ञान-माहितीची उजळणी दोन-अडीच तास

चालू होती. हे जीए कुलकर्णी नावाचे मराठीतील ख्यातनाम कथाकार आहेत हे उघड न होता ! हे उघड करण्याची चंदूलाही सक्त मनाई होती. पण नंतर असे झाले की, या रामभाऊंचे बंधू सुरेशराव जगताप नर्सरीलगतच असलेल्या घराच्या दुसऱ्या भागात राहत होते. हे जगताप बंधू म्हणजे जगताप-कार्ले प्रकाशनाच्या सर्जेराव जगतापांचे पुत्र. रामभाऊ फुलझाडांकडे वळले, आणि सुरेशराव छपाई-प्रकाशनाचा वडिलोपार्जित वारसा घेऊन बसले. चंदूच्या ते चांगल्या परिचयाचे.

ते घरी आहेत म्हटल्यावर चंदूने त्यांना हाक मारली. बरोबरचे गृहस्थ कोण असा प्रश्न इथे पहिल्याच प्रश्नोत्तरात आला. हे जी. ए. कुलकर्णी आहेत म्हटल्यावरोबर सुरेशराव चकित झाले. त्यांना 'जीए' ही माहीत होते, त्यांच्या कथाही त्यांनी वाचल्या होत्या, आणि त्यांचा 'एकलकोंडेपणा'चा इतिहासही त्यांच्या ऐकिवात होता. त्यांनी तावडतोब ही पर्वणी साधून जीएंना घरात आणून त्यांचे उत्तम रीतीने आगत-स्वागत केले. जीएंना चार पावले दूर राहण्याची सोयच ठेवली नाही !


गंमत अशी की हे सुरेशराव स्वतः चित्रकार असून ते छपाई-प्रकाशनाच्या धंद्यात पडलेले आहेत. त्यांच्या पत्नी सुनीतावाई याही चित्रकार. जुन्या काळातील मुंबईचे एक लेखक मा. कृ. शिंदे यांच्या या कन्या आपल्या पेंटिंग्जची जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये प्रदर्शनेही भरवतात. हेमा मालिनी फुलझाडांवरोवर त्यांची काही चित्रेही घेऊन जाते. तेव्हा साहजिकच गप्पा रंगल्या, आणि चित्रकला या विषयावर ज्ञान-माहितीची बरीच देवाण-घेवाण झाली, आणि ही गाडी पार रेम्ब्रां-पिकासोपर्यंत जाऊन पोचली.

यादरम्यान सुरेशराव जगतापांनी ही गाडी जीएंच्या कथासाहित्याच्या बाजूला झुकवण्याचा दोन-तीनदा प्रयत्न केला. पण जीए त्या बाजूला वळलेच नाहीत. त्यांना समाधान एकाच गोष्टीचे मिळाले की जीएंनी जगताप पति-पत्नींना वेळात वेळ काढून आपल्या घरी येण्याचे आमंत्रण दिले. चंदू म्हणतो, "सकाळी साडे-आठला तिथे पोचलेले जीए दुपारी एकनंतर तिथून बाहेर पडले, ते अत्यंत प्रसन्न मुद्रेने."

सुरेशराव जगताप म्हणतात, "एवढा महान कथाकार. या मनुष्याच्या शिष्ट बागणुकीबद्दल मी काय काय ऐकलं होतं. पण आमच्याशी बोलताना शिष्टपणा,

ताठा, आढ्यता यांचा मागमूसही दिसला नाही. मला तर ज्ञानेश्वर-तुकारामांची आठवण झाली. स्वतःबद्दल काहीही न बोलणारा असा लेखक माझ्या पाहण्यात नाही."

दोन्ही जगताप बंधूंचे म्हणणे असे पडले की, फुलझाडे काय किंवा चित्रकला काय, दोन्ही क्षेत्रांतील जीएंनी वाचनातून किंवा प्रत्यक्ष अनुभवातून स्वतः पैदा केलेले ज्ञान त्यांनी इथे पाजळून घेतले. पण पुऱ्या संभाषणातील त्यांचा सूर समजावून घेण्याचा होता. आपले ज्ञान 'पाजळण्या'चा नव्हता!



८

महाबळेश्वर

मी जीएंना पाहत होतो ते त्यांच्या अखेरच्या चार वर्षांत. धारवाड सोडून ते पुण्यात आल्यावर. पुण्यात येऊनही त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत नव्हतीच. बारीक-सारीक तक्रारी सुरू होत्याच. आपली अवस्था पाण्याबाहेर काढलेल्या माशासारखी झाली आहे, हे तेच म्हणत असत. धारवाडचे त्यांनी निर्माण केलेले त्यांचे विश्व आता कायमचे मागे पडले होते. त्यांच्या अलिप्त स्वभावामुळे पुण्यातील बाह्य जगात त्यांचे तसे कुणीच नव्हते.

या अशा वातावरणात ते अत्यंत हळवे झाले होते. त्यामुळे मनाविरुद्ध काही झाले की ते अस्वस्थ होत. मात्र संताप झाला तरी तो स्वतःपुरता. इतरांना त्याची झळ पोचणार नाही, हा त्यांचा स्वभाव. चंदू किंवा मी गेलो की तेवढ्या-पुरते ते आनंदी वाटत. पोपटाला पिंजऱ्यात टाकावे तशी काहीशी त्यांची गत झाली होती. म्हणूनच कुठे तरी दूर फिरायला जाण्याचा बूट मी काढला. माझ्या मनात होते, त्यांना घेऊन धारवाडला जावे. त्यांना आपल्या जुन्या विश्वात एक फेरी मारता येईल आणि आम्हांला त्यांचे ते विश्व पाहता येईल. पण ते कडाक्याच्या थंडीचे दिवस होते. म्हणून जीए म्हणाले, "धारवाडला एप्रिलकडे जायला हवं. आता थंडीत गारठून जाऊ. आणि प्रवास बराच लांबचा. दोन-तीन दिवसांत परतायचं म्हणजे कठीण जाईल." तेव्हा म्हटले, "महाबळेश्वरला येता का?"

यावरही "प्रवासाची दगदग झेपेल का?" असा प्रश्न आला.

मी म्हटले, "मी माझी गाडी आणतो. रस्ता चांगला आहे. अडीच-तीन तासांचा तर प्रवास आहे. दोन दिवस तिथे तुमची सर्व सोय करतो. कसलाही त्रास होणार नाही, याबद्दल तुम्ही निश्चिंत राहा."

ही कल्पना जीएंना फार आवडली. बारीक-सारीक गोष्टींची त्यांनी चौकशी केली. यावर चंदू त्यांना म्हणाला, "काही लागलं तरी आम्ही आहोत ना

बरोबर ?" चंदू हा तर त्यांचा जीव की प्राण. "मी आणि अप्पा असल्यावर तुम्हांला कसली काळजी ? गाडी स्वतः अप्पा चालवणार आहे. पोटातल्या पाण्याला सुद्धा धक्का लागणार नाही."

एवढे झाल्यावर ते तयार झाले. त्यांना खाजगी मोटारीतून प्रवास करण्याची आवड होती. दिवस ठरला, वेळ ठरली. त्याप्रमाणे त्या दिवशी सकाळी मी, चंदू आणि आमच्या पुण्यातील आचार्य अत्रे सभागृहाचे व्यवस्थापक माधवराव खरे असे तिघे गाडीत बसलो, आणि जीए व त्यांच्या भगिनी प्रभाताई यांना घेण्यासाठी त्यांच्या घराशी आलो. पण तिथे पाहिले तर काम बिथरलेले. का ? तर आठ वाजता येतो म्हणून सांगून गेलेले आम्ही आठ वाजून दहा मिनिटांनी पोचलो होतो !

जीए अस्वस्थ झाले होते, आणि महाबळेश्वरची सहल मनोमन रद्द करण्याच्या बेताला आले होते. जीए वेळ पाळण्याबाबत फार काटेकोर होते. कॉलेजमध्ये वर्षानुवर्षे वेळेआधी जाऊन विद्यार्थ्यांच्या स्वागताला ते हजर राहत असत ! सकाळीच जायला निघायचे तर कपडे करण्यापूर्वी स्कूटरला एकदा किक मारून बघणार आणि मगच कपडे घालायला घेणार अशी त्यांची रीत होती, शिस्त होती. आम्हांला दारात पाहिल्यावर त्यांच्या जिवात जीव आला. हसून एवढेच बोलले, "मी म्हटलं, तुम्ही आता येताय की नाही !—"

मी म्हटले, "वाटेत जिथे तिथे सिग्नल्स ना ? त्यामुळे उशीर झाला. बेत रद्द झालाच असता तर तुम्हांला आम्ही तसं कालच कळवलं असतं."

तरीही त्यांनी विचारले, "गाडी-बिडी ठीक आहे ना ?"

"एकदम. मुद्दाम चेक करून घेतलीय."

मग मात्र ते खुषीत आले. साडेआठला आम्ही तिथून निघालो. ते, प्रभाताई, चंदू, माधवराव खरे आणि मी. रस्ता चांगला होता आणि परिसर नवा होता. त्यांना मी माझ्या बाजूला फ्रंट सीटवर बसवले होते. कारण त्यांना गाडीत पुढे बसून प्रवास करायला फार आवडायचे, असे एकदा त्यांच्या बोलण्यात आले होते. त्यामुळे प्रवासभर ते खुषीत होते. पूर्वीच्या आयुष्यात त्यांनी केलेल्या प्रवासांचे अनुभव हा बोलण्यातला मुख्य विषय होता. मध्येच जीएंनी मला विचारले, "तुम्ही कुठे कुठे प्रवास केलाय ?"

मी म्हटले, "मी तसा फार प्रवास केलेला नाही. धंद्याच्या निमित्ताने दिल्ली,

कलकत्ता आणि पुणे यांच्या वाऱ्या केल्या तेवढ्याच. बाकी प्रवास म्हणजे महाबळेश्वर आणि आमचं गुहागर."

यावर चंदू म्हणाला, "अप्पा असले चिल्लर प्रवास करीत नाही. त्याचे प्रवास म्हणजे इंग्लंड, अमेरिका, कॅनडा. अगदीच काही नाही तर सिंगापूर, बँकॉक, हाँगकाँग."

मी म्हटले, "ते प्रवास नव्हेत. धंद्यानिमित्त होणाऱ्या खेपा. त्या काय हल्ली कुणीही करतात."

यावर बोलता बोलता जीए म्हणाले, "मला एकदा तुमच्या सिंगापूर-बँकॉककडे जायचंय."

मी म्हटले, "त्यासाठी पासपोर्टापासून तयारी करायला हवी."

लगेच त्यांनी विचारले, "या बाबतीत तुम्ही मला काही मदत करू शकाल का? मी पैसे खर्च करीन, पण मला कुठली काहीच माहिती नाही. आणि आता त्यासाठी मुंबईला खेटे घालणं मला झेपणार नाही—"

मी त्यांना या परदेश-प्रवासाची सर्व व्यवस्था करून देण्याचे आश्वासन दिले त्यानंतर प्रभाताईंसाठी एकदा अष्टविनायकाची यात्रा करायचा बेतही त्यांनी बोलून दाखवला. मी म्हटले, "तो प्रवास आपण या गाडीनंच करू."

चंदूने विचारले, "म्हणजे तुम्ही पण जाणार अष्टविनायकाला?"

जीए हसले. त्यांचा देवादिकांवर विश्वास नाही हे माहीत असल्यामुळे चंदूने हा प्रश्न विचारला होता. म्हणाले, "मी येणार. तुम्ही देवांचं दर्शन घ्या, मी निसर्गाचं घेईन."

"म्हणजे तुम्ही देवळात येणार नाही?" चंदूने विचारले.

"नाही." आणि चंदूला त्यांनी विचारले, "देव सर्वत्र भरलेला आहे ना? अगदी आपल्या हृदयात सुद्धा? मग देवळात कशाला जायचं?"

मी म्हटले, "तुम्ही काही म्हणा, आमचं देवाबाचून चालत नाही."

चंदूने विचारले, "देव नाहीच असं तुम्ही कशावरून म्हणता?"

यावर ते म्हणाले, "आपण शंकराचा फोटो पाहतो, गणपतीचा फोटो पाहतो. ही सर्व माणसांनी आपापल्या कल्पनेतून काढलेली चित्रं आहेत. तेहतीस कोटी देव कुठून आले? गणपती किंवा शंकर प्रत्यक्षात कुणी पाहिला आहे काय? हे सर्व माणसाच्या श्रद्धेचे खेळ आहेत."

असा-तसा माणूस असता तर आम्ही त्याच्याशी वाद घातला असता. पण जीएंपुढे आम्ही काय बोलणार? चंदूही गप्प बसला. माधवराव खरे साठी उलटलेले गृहस्थ. त्यांच्याकडे पाहून जीएंनी विचारले, "तुम्ही काहीच बोलत नाही?"

माधवराव म्हणाले, "मी त्या गावचा नाही!"

"गावचा नाही म्हणजे काय?" जीएंनी विचारले.

तेव्हा माधवरावांनी त्यांना एक जोक सांगितली : "दोन दारुडे होते. पिऊन पार पोचले होते. दोघांची हुज्जत सुरू झाली. कशावरून?"

"कशावरून?" आम्ही विचारले.

"वर आकाशात दिसतोय हा सूर्य आहे का चंद्र यावरून! एकाचं म्हणणं तो सूर्य आहे. दुसऱ्याचं म्हणणं—नाही, तो चंद्र आहे. हुज्जत वाढली गडी हमरी-तुमरीवर आले. तिकडून येत होता एक वाटसरू. दोघांनी त्याला अडवलं आणि विचारलं, 'अहो दाढीवाले, हा डोक्यावर दिसतोय हा सूर्य आहे क चंद्र?' तर तो दाढीवाला म्हणाला, मला काय माहीत? मी या गावचा नव्हे!"

अर्थात माधवरावांनी ही जोक सांगितली तरी त्यांना जीएंचा देवावरील अविश्वास मुळीच मान्य नव्हता. त्यांनी देव पाहायला फार मोठी तपश्चर्या लागते, हे अनेक ऋषि-मुनींचे दाखले देऊन जीएंना पटवण्याचा प्रयत्न केला. पाप-पुण्याच्या कल्पना, पुनर्जन्म आदी बराच उहोपाह झाला. शेवटी जीएंनी तो विषय सोडून दिला. दादा खऱ्यांच्या हिशेबी जीए गप्प झाले!

अशा थट्टा-विनोदात वाईचा पसरणी घाट केव्हा आला कळले नाही. हवा आता थंड होती. मन प्रसन्न करून सोडीत होती. जीएंनी मला विचारले, "गाडी थोडी थांबवता का?"

मला वाटले, जीएंना इथल्या निसर्गाचा आस्वाद घ्यायचा असेल. झाडा झुडपांच्या सान्निध्यात थोडे फिरायचे असेल. मी गाडी थांबवली, तेव्हा कळले, जीएंना सिगारेटचा आस्वाद घ्यायचा होता. मला सिगारेटचा वास सहन होत नाही, हे जीएंना कळले होते. एरवी अनेकांना हे माहीत असूनही या गोष्टीकडे कधी कुणी एवढे लक्ष दिले नव्हते. पण आज जीएंनी ते लक्षात ठेवून ही काळजी घेतली होती या जाणिवेने मी भारावून गेलो. किती बारीक-बारीक बाबतीत ते आपल्यापासून दुसऱ्याला त्रास होणार नाही याला जपत होते? असे

किती जण जपतात ?

मीही ती गोष्ट लक्षात ठेवून पुढे पाचगणीत आल्यावर जीएंना विचारले, "सिगारेट ओढायचीय का ?"

पण जीए नको म्हणाले. पाचगणीनंतर मी पाहिले, जीए बोलायचे थांबले होते. भोवती पसरलेल्या हिरव्या वनराईत ते मश्गुल झाले होते. नवा प्रदेश, डोंगर-दऱ्या, अनोखे पक्षी यांतून त्यांची नजर फिरत होती. एवढेच की, आम्हांला स्पष्टपणे ती दिसत नव्हती. तिच्यावर तो गॉगल होता ना ? मला एकदा तो गॉगल काढलेली त्यांची स्वच्छ नजर पाहायची होती. पण तो योग कधी आला नाही.

महाबळेश्वरमध्ये ड्रीमलँड हॉटेलात मुक्कामासाठी मी दोन जागा राखून ठेवल्या होत्या. एक जीएंसाठी आणि दुसरी आम्हा तिघांसाठी. तिथे मुक्काम ठोकल्यावर मी जीएंना विचारले, "हॉटेलची जागा ठीक आहे ?"

जीए म्हणाले, "ठीक म्हणजे काय ? छानच आहे."

सकाळचे अकरा वाजायला आले होते. चहा-पाणी झाल्यावर जेवण होईपर्यंत बसून काय करायचे ? म्हणून जीएंना आम्ही विचारले, "जवळपास एक फेर-फटका मारून यायचं का ? का विश्रांती घ्यायचीय ?"

"छे छे !— चला, फिरून येऊ." असे म्हणून ते लगेच तयार झाले.

जीएंना चालायची, फिरायची फार आवड होती. धारवाडला स्कूटर काढून टाकल्यावर विद्यापीठापर्यंतचे जाऊन-येऊन सहा किलोमीटर अंतर ते पायीच चालून येत असत. बरोबर दोन-तीन दिवसांचे 'खाद्य' म्हणून झोळीभर पुस्त-कांचे ओझे. इथे हॉटेलपासून बाजार अगदीच जवळ होता. अर्धा बाजार फिरून आल्यावर त्यांना थोडे अस्वस्थ वाटू लागले, त्यामुळे आम्ही बाजार अर्धवट टाकून हॉटेलवर परत आलो.

जीएंना हॉटेल, तेथील वातावरण आणि जेवण अतिशय आवडले. जेवण झाल्यावर "अन्नदाता सुखी भव" म्हणून हॉटेलवाल्याला त्यांनी समाधानाची पावती दिली. थोडी विश्रांती घेतल्यावर संध्याकाळी महाबळेश्वर परिसर पाहण्याचा कार्यक्रम आम्ही ठरवला होता.

मला गाडीचे थोडे काम करून घ्यायचे होते. त्यामुळे जीएंना महाबळेश्वरच्या आसमंतात फिरवून आणण्यासाठी मी एक टॅक्सी ठरवली. जीए, चंद्रकांत,

जीएंच्या भगिनी प्रभाताई आणि माधवराव खरे अशी चौघे त्यातून महाबळेश्वर-दर्शन करून संध्याकाळी सहाला ठरल्याप्रमाणे वेण्णा तलावापाशी परत आली. मी विचारले, "काय आवडलं का महाबळेश्वर?"

"आवडलं, सुंदर."

"सर्वांत कुठला पॉइंट जास्त आवडला?"

"सर्वच महाबळेश्वर आवडलं."

मग आम्ही थोडे पायी हिंडलो. वाटेत एके ठिकाणी एका मराठी दैनिकाचे संपादक सपत्नीक येताना दुरून दिसले. त्यांनी मला तिथूनच हाक मारली. मी जीएंना तिथेच सोडून त्यांना भेटायला गेलो. त्यांना जीएंना भेटण्याची इच्छा होती. मी तिथून मागे पाहिले तर जीएंनी पाठ फिरवली होती, आणि ते बरोबरच्या बाकी तिघांशी बोलत होते. त्यांचे आमच्याकडे लक्षच नसावे असे दिसत होते.

म्हणूनच संपादकांना तिथेच थांबवून मी जीएंजवळ आलो, आणि त्यांना म्हटले, "अमुक अमुक गृहस्थ तुम्हांला भेटू इच्छितात."

जीए म्हणाले, "प्लीज! मी महाबळेश्वर पाहायला पहिल्यांदाच आलोय. उद्या सकाळी आपणाला परत फिरायचंय. आपल्याजवळ वेळ आहे कुठे? बोलायचं म्हणजे काय, नुसतीच हाक मारायची नाही. बोलाय-चालायचं म्हणजे वेळ आधी ठरवायला नको काय? त्यांना म्हणावं, सॉरी, व्हेरी सॉरी. पुन्हा केव्हा तरी भेटू. नंतर केव्हा वेळ काढता येईल ते कळवतो पाहिजे तर!"

मी त्या संपादकांना जाऊन भेटलो. त्यांना जीएंचे म्हणणे सांगितले. संपादकांनीही "ठीक आहे—" म्हणून ही गोष्ट तशी हसत घेतली आणि ते आपल्या वाटेने निघून गेले.

मला ही गोष्ट जरा खटकली. हे असे व्हायला नको होते. काटेकोरपणे पाहिले तर जीएंचे म्हणणे बरोबर होते. "आगाऊ कळवून या आणि भेटा," हे काही चूक नव्हे. आगाऊ कल्पना न देता माणसे अनेकदा दुसऱ्याचा आणि स्वतःचा फार मोठा वेळ वाया दवडतात, याचा आपणाला प्रत्येकाला नेहमी अनुभव येत असतो. हे खरे असले तरी सुद्धा याला काही अपवाद असतात. एखाद्या वेळी ध्यानी-मनी नसताना एखादी व्यक्ती जेव्हा नजरेला पडते, तेव्हा चार शब्द बोलून आपणाला त्याला हसत खेळत सुद्धा सांगता येते, की बाबा रे, आत्ता मला

वेळ नाही, तुलाही नसेल. आपण केव्हा तरी सावकाशीने भेटू. एवढे बोलून आपणाला मोकळे होता येते. जीएंनी असे का केले नाही ?

आता दुसरा विचार मनात असाही येतो की, खुद्द जीएंना हे कळत नसेल ? दुसऱ्याच्या भावना, अगत्य हे जीएंना नसेल कळणार तर कुणाला कळणार ? मग जीएंनी असे का केले असेल ? म्हणजे त्या व्यक्तीबद्दल त्यांच्या मनात काही अढी असेल का ? अर्थात माझे हे विचार धंद्यातल्या माणसाचे. जीए हे अलौकिक घडणीचे लेखक. त्यांच्या मनात काय असेल कोण जाणे ?

फिरताना एक विहीर दिसली. एवढ्या उंचीवरची विहीर केवढी खोल असेल ? तिचे पाणी पाहण्यासाठी प्रभाताई जवळ गेल्या आणि उत्सुकतेने त्यांनी विहिरीत खोलपर्यंत पाहिले. त्या वेळी जीए बहिणीला ओरडले. लहान मुलांना मोठी माणसे अशा वेळी ओरडतात तशा काळजीने ते बरेच बोलले. तीही आज्ञाधारक मुलाप्रमाणे झटकन दूर झाली. मला अचानक त्यांच्या 'काकणे' कथेतली प्रचंड आ करून बसलेली विहीर आठवली. कबुतरांची लहान दुबळी पिले, एक गाडीवाला, गंगू न्हाविणीचा लंगडा नवरा अशा गाफील माणसांना पोटात घेणारी राक्षसीण !

आता काळोख पसरत चालला होता. आम्ही मग हळूहळू हॉटेलची वाट धरली. हॉटेलवर आल्यावर आम्ही जीएंना त्यांच्या खोलीवर सोडले, आणि "जेवायची वेळ झाल्यावर हाक मारतो," म्हणून आम्ही आमच्या खोलीवर निघालो. पण जीएंनी आम्हांला अडवले. म्हणाले, "निघालात कुठे ? आता जेवायची वेळ होईपर्यंत थोडा वेळ इथेच गप्पा मारू की !"

माझी पंचाईत झाली. कारण संध्याकाळी हे लोक महाबळेश्वर पाहायला गेले, तेव्हा मला तिथल्या बाजारात अचानक माझा एक मित्र भेटला होता तो भारतीय सेनेत एक अधिकारी होता. त्याला मी रात्री माझ्या खोलीवर बोलावले होते. तो होता मद्यशौकीन. त्याच्या संगतीत काही वेळ घालवून मग जेवण घ्यायचे असा बेत आम्ही केला होता. मी जीएंपासून ही गोष्ट लपवून ठेवली होती. पण आता जीए आम्हांला सोडायलाच तयार नाहीत म्हटल्यावर काय करणार ? शेवटी भीत भीत जीएंना हे कारण सांगितले. जीएंना आमच्या एकूण चुळबुळीवरून तो संशय आलाच होता. ते म्हणाले, "एवढंच ना ? मग इथेच बसा की. बोलवा तुमच्या मित्राला इथे."

तिथे प्रभाताईही होत्या. म्हणून मी जीएंना हळूच विचारले, "तुम्ही घेणार आहात का?"

जीए म्हणाले, "मी घेत नाही. घेत होतो, फार पूर्वी आता नाही. पण त्यामुळे तुमच्या रंगतीत बाधा येणार नाही. मी पाहतो ना तुमचा कार्यक्रम!"

काही वेळाने माझा तो मित्र आला. माधवराव खऱ्यांना त्याच्या जोडीला दिले आणि मी व चंद्रकांत यांच्यासाठी हॉटेलच्या नोकराला थंड पेय सांगितले. पण जीएंना इथे काही तरी चुकतेय असे वाटले. तेव्हा त्यांनी मला विचारले, "तुम्ही अजिबात घेत नाही हे कसं? तुमच्या ह्या स्नेह्यांना काय वाटेल?"

असे खोदून विचारल्यावर मी जीएंना सांगितले, "अशी केव्हा तरी बसलो तर थोडी घेतो — म्हणजे एखादा पेग. गंमत म्हणून. पण आज नको."

"आणि सी. के. सोवळे का?"

चंदू म्हणाला, "मी फक्त बिअर घेतो."

"होय ना? मग तुमचं काय असेल ते घ्या. तुम्ही कसं घेता ते तरी पाहूया."

असे म्हणून त्यांनी नोकराला बोलावून माझ्यासाठी आणखी एक ग्लास आणि चंदूसाठी बिअर मागवली. 'कसं घेता ते तरी पाहूया' या शब्दांनी आम्ही सगळेच लाजल्यासारखे झालो. पण हे वाक्य एखाद्या जाणकार तज्ञाने "तुम्ही कसे खेळता ते पाहूया तरी—" म्हणावे अशा थाटातले होते, हे लवकरच आमच्या लक्षात आले. थोडा वेळ ते आमचा एकंदर 'कार्यक्रम' निमूटपणे पाहत होते. तो पाहून घेतल्यावर त्यांनी मद्यपान या विषयावर आपले काही मौलिक विचार आम्हांला ऐकवले.

ते म्हणाले, "दारू ही आपल्यावर स्वार होता कामा नये. आपण तिच्यावर स्वार व्हायचं असतं." असे बोलत त्यांनी भारतीय सेनेतील माझ्या त्या मित्राला एका लष्करी अधिकाऱ्याचे उदाहरण सांगितले. हा लष्करी बेटा रमची बाटली तोंडाला लावायचा आणि ती आख्खी बाटली तशी संपवायचा. पाणी-सोडा काही नाही. त्यानंतर त्यांनी रम, जिन, व्हिस्की, ब्रँडी, बिअर अशा विविध पेयांचे कार्य, त्यांचे गुणधर्म, कोणते पेय कोणत्या प्रसंगी घ्यायचे, बैठक कशी रंगवायची हे सर्व तर सांगितलेच. पण व्होडका, स्कॉच वगैरे मद्ये कशी बनवतात, या प्रत्येक रसायनाच्या मुळाशी कोणते घटक असतात, याची तपशीलवार माहितीही सांगितली.

तरी सुद्धा त्यांनी स्वतः एक थेंब घेतला नाही की या पेयावद्दलच्या इच्छा-आसक्तीचा मागमूसही त्या तासभरात त्यांच्या नजरेत, हालचालींत कुठे जाणवला नाही. तो कप्पा जणू त्यांनी कायमचा बंद करून घेतला होता.

जीएंना महाबळेश्वर फार आवडले होते. दुसऱ्या दिवशी सोमवार होता. आम्हांला परतायलाच हवे होते. रात्री मी जीएंना म्हटले, "तुम्हांला चार दिवस राहायचं तर राहा की. तुम्ही म्हणाल त्या दिवशी इथून तुम्हांला पुण्यात आणण्याची व्यवस्था करतो."

पण जीएंनी त्याला नकार दिला. म्हणाले, "नाही. बरोबर आलो, बरोबरच परत जायच."

चार दिवस काढून पुन्हा एकदा महाबळेश्वरला यायचे, आणि मनसोक्त राहायचे, असा बेत करूनच दुसऱ्या दिवशी आम्ही पुण्यात परतलो. जीएंना कोथरूडच्या त्यांच्या घरी नेऊन पोचवले, तेव्हा जीएंनी माझ्या हातात एक छोटी कुंडी दिली. त्यात पांढऱ्या मिरचीचे छोटे रोप होते. माझ्यासाठी त्यांनी ते अगत्यपूर्वक तयार करून ठेवले होते.

पुण्यात आल्यावर नंदाताई पैठणकरांच्या घराच्या गच्चीवर जीएंनी कुंड्यांची एक छोटी बाग केली होती. गुलाबांचे अनेक प्रकार त्यांनी तिथे उठवले होते. गुलाब हे जीएंचे फार आवडते पुष्प. धारवाडला घराभोवती त्यांनी सुंदर बाग उठवली होती आणि निकटच्या माणसांना जपतात तसे ते बागेतल्या प्रत्येक झाडाला सांभाळतात, जपतात हे मला ठाऊक झाले होते. पुण्यात आल्यावर मिळेल त्या छोट्या जागेत आपला हा छंद त्यांनी जोपसला होता आणि जितक्या अधिकारवाणीने ते महाबळेश्वरला मद्यावर बोलले होते त्याच अधिकाराने ते वनस्पतिशास्त्रावरही बोलत असत. त्यांच्या बागेतले पांढऱ्या मिरचीचे झाड मला आवडले होते, असे मी केव्हा तरी त्यांना बोललो होतो. ते लक्षात ठेवून त्यांनी त्याची एक कुंडी तयार केली होती. त्या रोपाची निगा कशी राखायची, ते जमिनीत कुठे, कसे लावायचे याच्या तपशीलवार सूचनाही त्यांनी मला दिल्या.

ती कुंडी घेऊन मी गाडीत बसलो, तेव्हा जीएंनी मला विचारले, "या आपल्या ट्रिपचा खर्च किती झाला ते सांगाल काय?"

मी हसत म्हटले, "खर्च किती आला त्याची काळजी करू नका. तुम्ही आत जाऊन थोडा आराम करा."

जीए म्हणाले, "हे असं चालणार नाही. नेहमी तुम्ही असं करता. महाबळेश्वरचा खर्च म्हणजे काही किरकोळ खर्च नव्हे. तुम्ही हिशेब करून हा खर्च मला नंतर सांगा हवं तर. नाही तर मी देईन ती रक्कम तुम्हांला घ्यावी लागेल."

असे ते खूप बोलत राहिले. "नंतर बघू, नंतर बघू–" असे करीत मीही थोडा वेळ रेंगाळलो आणि निसटलो. म्हणजे गाडीच सुरू केली आणि पळ काढला.

९

संकोच

संकोच हा जीएंचा स्थायी भाव होता. दुसऱ्याने आपल्यासाठी एवढेसे काही केले तरी त्याचे त्यांना ओझे होत असे. त्यांचे-माझे संबंध वाढत गेल्यावर ते मला आपल्या मानसपुत्राप्रमाणे वागवत असत. मी कुठे जातो, माझी कुणाशी जास्त मैत्री आहे याची चंद्रकांतकडे बारकाईने चौकशी करीत. मी मुंबईला कुठे राहतो, माझे घर कसे आहे याची सुद्धा त्यांनी माहिती काढली होती. एकदा मुंबईच्या माझ्या घरी त्यांना यायचे होते. माझ्या मुलीने जर्मन भाषेत प्रावीण्य मिळविले आहे याचे त्यांना कौतुक होते. पण एवढी जवळीक वाढून सुद्धा मला एखादे छोटे काम सांगायचे झाले तरी त्यांना ते जमत नसे.

जीएंच्या निवृत्तीनंतर त्यांचे पेन्शन त्यांना महाराष्ट्रात मिळावे म्हणून धारवाड विद्यापीठाकडे त्यांनी विनंती केली. त्याचे कागदपत्र महाराष्ट्र सरकारकडे पाठवण्यात आले. पण तीन-चार महिने लोटल्यानंतरही महाराष्ट्र सरकारच्या लाल फितीबाहेर ते येण्याचे चिन्ह दिसेना. महाराष्ट्र सरकारचे अकाउंटंट जनरलचे ऑफिस मुंबईत आहे. जीएंनी हे काम मला सांगितले असते तर मी जाता-येता तिथून ते कागदपत्र हलवण्याचा सहज प्रयत्न केला असता. पण हे काम मला सांगावे की नाही या संकोचात एक महिना घालवल्यानंतर एक दिवस त्यांनी हळूच तो विषय माझ्या कानांवर घातला. तोही "माझ्यासाठी एवढी तसदी घ्याल का?" अशा आर्जवी सुरात. सुदैवाने मी मुंबईला पोचण्याच्या आत त्यांना ते पेन्शन थकबाकीसकट मिळाले. त्यांचा लगेच मुंबईत मला फोन आला :

"अहो, तुमच्या नावाचा महिमा अगाध असला पाहिजे. माझ्या कामाचे कागद मी तुमच्या हवाली केले हे बहुधा त्या कार्यालयात समजलं असावं. कारण आजच सकाळी रजिस्टरनं माझी पेन्शनची बाकी मला मिळाली."

यादरम्यान मी एकदा परदेशात जाऊन आलो. जीएंचे घड्याळ इतके जुने

झाले होते की, चंद्रकांत त्यांना म्हणाला, " हे आता टाकून द्या. अप्पा परदेशी गेला आहे. त्याला एक चांगलं घड्याळ सांगता येईल. " त्यांना नवीन घड्याळ घ्यायचेही होते. पण " अप्पांना असल्या लहान-सहान बाबतीत त्रास द्यायचा नाही," म्हणून जीएंनी त्याला नकार दिला.

चंदू त्यांना म्हणाला, " लहान-सहान नाही तर काय तुम्ही मोठी कामं कुणाला सांगणार आहात ? "

मी मायदेशी परतल्यावर चंदूने मला हे सांगितले. तेव्हा मी त्याला म्हटले, " जीए कसे सांगतील ? मी पैसे घेणार नाही या भीतीनं ते बोलले नसतील. " पण तरी सुद्धा जीएंचे घड्याळ फार जुने झाले आहे ही गोष्ट आपल्या लक्षात आली नाही याबद्दल मला हळहळ वाटली.

पण त्यांचा संकोच आणि माझी हळहळ यांची परमावधी व्हावी असा एक प्रसंग पुढे आला. बरेच डॉक्टरी उपाय होऊनही जीएंचे दुखणे कमी होत नाही, हे पाहिल्यावर मी माझे मामा नाना भावे यांच्याकडून एक खास औषध बनवून घेतले होते. माझ्या या मामांनी दिलेल्या औषधांनी काही जर्जर झालेल्या व्याधि-ग्रस्तांनाही गुण आलेला आहे. माझी आई तर साक्षात कर्क रोगाने पीडित होती. पण त्यांच्या सातत्यपूर्ण औषधयोजनेने ती त्यातून बाहेर पडली. आजही ती आमच्यात चांगली उत्साहाने वावरते आहे.

मामाने जीएंसाठी बनवून दिलेल्या औषधाचा जीएंना थोडा-फार गुणही येतोय असेही जीएंनी बोलून दाखवले. जीए ते नित्यनियमाने घेत होते, संपल्यावर ते आणखी घेतले पाहिजे अशीही त्यांची इच्छा होती.

पण त्यांनी ती कधी बोलून दाखवली नाही. एकदा ते अत्रे सभागृहात आलेही होते. पण हा विषय त्यांनी काढला नाही, आणि मलाही ते सुचले नाही. त्या औषधाचे पैसे मी घेत नाही म्हणून त्यांनी तो विषय काढला नसेल का ?

पुढे अखेरच्या दिवसांत चंदूजवळ " आपण ते औषध आणखी काही दिवस घेऊन पाहायला पाहिजे होतं– " असे त्यांनी बोलून दाखवले. हे केव्हा ? तर अखेरच्या दिवसांत. पण तोपर्यंत वेळ निघून गेली होती. आता मला वाटते की आपणही नंतर कधी त्या औषधाबद्दल त्यांना विचारले नाही. आता ही हळहळ, रुखरुख मला कायमची चिकटली आहे.

प्रकृतीने लगाम लावलेला असतानाही जीएंनी पुण्यातील अखेरच्या दिवसांत

'माणसे : अरभाट आणि चिल्लर' हे आपले आगळे पुस्तक पुरे केले. हे पुस्तक त्यांनी धारवाडलाच लिहायला घेतले होते. पण प्रकृतीच्या अडथळ्यांनी ते लांबणीवर पडले. ते पुरे झाल्यावर मला त्यांनी ते वाचायला दिले. मला ते इतके आवडले की माझ्या निकटवर्तीयांना मी त्यातले आठवेल ते, जमेल तसे सांगू लागलो. त्यांच्या लेखनाचा हा नवाच प्रकार होता. जीएंच्या प्रतिभेचा हा वेगळाच पैलू मला वाटला.

जीए हे कथालेखक. त्यांनी कथेशिवाय काही लिहिले नाही. कादंबरीच्या ते नादाला लागले नाहीत. 'माणसे : अरभाट आणि चिल्लर' म्हणजे त्यांच्या आयुष्यात—मुख्यतः शाळेच्या आयुष्यात—आलेली लहान-थोर माणसे आहेत. ही माणसे दाखवणे किंवा समोर ठेवणे एवढाच या पुस्तकाचा हेतू दिसतो. जीएंनी ती अशा थाटात उभी केली आहेत की जीएंच्या अंतरंगात वर्षानुवर्षे दडून बसलेला विनोद अचानक बाहेर आल्यासारखे वाटते. कुणीही कायम संग्रही ठेवावे अशा तोडीचे हे पुस्तक आहे.

हे पुस्तक आत्मनेपदी म्हणजे 'मी' ने कथन केलेले आहे. वरवर पाहिले तर तो आत्मकथनाचा प्रकार वाटतो. मी हे जीएंना बोलून दाखवले, तेव्हा जीए म्हणाले, "छे छे, आत्मलेखन या प्रकाराची मला ॲलर्जी आहे. स्वतःचं खाजगी जीवन उघड करणं हे माझ्या स्वभावात बसत नाही. हे आत्मकथन आहे की ती एक दीर्घ कथा आहे हे तुम्ही आणि मी ठरवायचं नाही. त्याचं काय करायचं ते आपले चतुर समीक्षक करतील. तुम्ही त्या फंदात पडू नका."

मात्र एवढे सगळे बोलणे झाले तरी हे पुस्तक मी त्यांच्याकडे प्रकाशनासाठी मागितले नाही. त्यांचा-माझा परिचय झाल्यानंतर मी त्यांची तीन पुस्तके काढली. पैकी 'मुग्धाची रंगीत गोष्ट' हे छोट्या मुलांसाठी लिहिलेले पुस्तक माझ्याकडे सुभाष अवचट यांच्यातर्फे आले. जीएंचा प्रत्यक्ष परिचय झाल्यानंतर 'बखर बिल्मची' हे आणखी एक लहान मुलांचे पुस्तक जीएंनीच प्रकाशनासाठी माझ्या स्वाधीन केले. तिसरे 'पैलपाखरे' हे मोठ्यांच्या मोठ्या कथांचे पुस्तक भाषांतरित व रूपांतरित आहे. ही पुस्तके लहान मुलांची व भाषांतरित; परंतु 'माणसे : अरभाट आणि चिल्लर' हे पुस्तक तसे जास्त महत्त्वाचे. हे पुस्तक जीए आपल्या पूर्वापार चालत आलेल्या प्रकाशकाकडे देतील, अशी माझी अटकळ होती. धंद्यातील माझी रीत अशी की, जिथे एक प्रकाशक लेखकाची

पुस्तके काढीत आहे तिथे आपण घुसायचे नाही. त्यामुळे 'माणसे : अरभाट आणि चिल्लर'चे हस्तलिखित कितीही आवडले तरी मी त्याच्या प्रकाशनासंबंधी एक शब्दही जीएंजवळ बोललो नाही. हस्तलिखित वाचले आणि परत दिले.

पंधरा दिवसांनी मी पुण्यात परत गेलो. दरम्यानच्या दिवसांत जीएंनी हे हस्तलिखित चंदूला वाचायला दिले होते. चंदूला त्यांनी याची एक झेरॉक्स प्रत काढायलाही सांगितले. चंदूने ते काम करून मूळ हस्तलिखित जीएंकडे दिले आणि त्याची दुसरी प्रत वाचून पाहिली. ती वाचून तो इतका खूष झाला की, त्याने मला मुंबईला फोन केला. म्हणाला, " पुस्तक झकासच आहे. तू बिनधास्त घे. "

मी म्हटले, " जीए तसं म्हणाले तर काहू. पण त्यांनी होऊन दिलं तरच. मी विचारणार नाही. "

पुढच्या खेपेला चंदू जीएंकडे गेला, तेव्हा त्याने न राहवून त्यांना विचारले, " हे पुस्तक कोण काढतंय ? "

जीए त्याला म्हणाले, " कोण म्हणजे ?– अप्पा. यापुढचं प्रत्येक पुस्तक अप्पांकडे. नकाराचा पहिला अधिकार त्यांचा. ते नाही म्हणाले तर हे पुस्तक प्रसिद्ध करायचं की नाही याचा मी विचार करीन."

मी पुण्यात गेल्यावर चंदूने हे बोलणे माझ्या कानांवर घातले. हे ऐकून मला काय बोलावे कळेना. " मी नाही म्हणालो तर हे पुस्तक प्रसिद्ध करायचं की नाही याचा मी विचार करीन ? "– हे म्हणजे भलतेच काही तरी. चंदू म्हणाला, " जीएंच्या या विधानाचा दुसराही एक अर्थ होतो. तुला पटतो का बघ. म्हणजे असं की अप्पा नकार देणंच शक्य नाही इतकं हे पुस्तक चांगलं आहे, असा एक अर्थ त्यातून निघतो."

पण जीए अशा अर्थाने बोलणेच शक्य नाही, हे मला ठाऊक होते. संध्याकाळी मी जीएंना भेटायला गेलो तेव्हा त्यांनीच हा विषय काढला. मला त्यांनी विचारले, " हे पुस्तक तुम्ही काढणार का ? "

या प्रश्नाने मी सुखावलो. जीएंचे इतके सुंदर पुस्तक प्रकाशित करण्याची संधी मिळणे ही माझ्या दृष्टीने फार मोलाची गोष्ट होती. मी म्हटले, " आनंदाने काढीन. मला त्यात अभिमान वाटेल. पण हे तुमचं पुस्तक अत्यंत चांगलं आहे. मी ते काढलं तर तुमच्या पूर्वीच्या प्रकाशकाच्या संबंधांत ढवळाढवळ

केल्यासारखं होईल—"

जीए म्हणाले, "तसं काही नाही. मी स्वतः होऊन तुम्हांला विचारतोय. हे पुस्तक परचुरे प्रकाशन मंदिरानंच काढावं अशी माझी इच्छा आहे. तुमची इच्छा काय आहे ते सांगा. अगदी चोख आणि स्पष्ट शब्दांत काय असेल ते सांगा."

"तुमची अशी इच्छा आहे म्हटल्यावर प्रश्न येतो कुठे ? तुमचं पुस्तक माझ्याकडे दिल्यावर ते काढणार की नाही हा प्रश्नच तुम्ही विचारायचा नाही. कोऱ्या कागदावर तुम्ही नुसत्या रेघोट्या ओढून दिल्यात तरी मी त्या छापीन."

हे ऐकल्यावर जीए थोडे संकोचल्यासारखे होऊन म्हणाले, "हे म्हणजे तुमचं फारच झालं बुवा."

यानंतर जीएंनी 'माणसे : अरभाट आणि चिल्लर'चे हस्तलिखित माझ्या स्वाधीन केले. अर्थात हस्तलिखिताची चंदूने काढून दिलेली प्रत दिली. मूळ हस्तलिखित त्यांनी स्वतःपाशी ठेवले. जीएंनी हस्तलिखिताची प्रत काढून घेण्याची खबरदारी या वेळी मुद्दाम घेतली होती. त्याआधी एका पुस्तकाच्या छपाईच्या वेळी त्या पुस्तकाच्या हस्तलिखितातील काही मजकूर आमच्याकडून गहाळ झाला होता. सुदैवाने कंपोज पुरा झालेला होता. पण प्रुफांच्या वाचनाच्या वेळी मूळ हस्तलिखित नसल्यामुळे थोडा त्रास झाला होता. अर्थात जीए म्हणाले, "प्रत काढण्याचं महत्त्वाचं कारण ते नाही. अजूनही मला त्या हस्तलिखितावरून एकदा नजर टाकायची आहे. शिवाय पुस्तकाचं नावही दुसरं एखादं सुचतं का ते पाहायचं आहे."

"पण मग घाई काय आहे ? ते सर्व झाल्यावरच छापायला घेतो ना ?" मी विचारले.

जीए म्हणाले, "नको. एका बाजूनं तुमचं काम चालू होऊ द्या. शिवाय चित्र काढायला द्यायचं, म्हणजे चित्रकाराला हस्तलिखित वाचायला द्यावं लागेल ना ?"

"ठीक आहे—" म्हणून मी हस्तलिखित ताब्यात घेतले.

"आता एकच गोष्ट राहिली."

"कोणती ?"

"हस्तलिखिताची झेरॉक्स कॉपी काढण्याचा खर्च किती तो सांगा."

"खर्च-बिर्च काही नाही." मी सांगितले. "हा खर्च तुम्ही करायचा नाही.

नाही तरी या वेळी हस्तलिखिताची जादा प्रत मी करणारच होतो. हे पुस्तक तुम्ही प्रकाशनासाठी माझ्याकडे देणार आहात असं चंदूनं मला सांगितलं त्याच वेळी मी चंदूला तसं सांगून ठेवलं होतं. 'बखर बिम्मची' या पुस्तकाच्या हस्त लिखितातील मजकूर आमच्याकडून गहाळ झाला तेव्हापासूनच मी हे ठरवून टाकलं होतं. तेव्हा तो खर्च तुम्ही करण्याचा प्रश्न येतच नाही."

तरीही जीए ऐकायला तयार नव्हते. "ही जादा प्रत मी माझ्या सोयीसाठी करून घेतली आहे—" वगैरे वगैरे ते बरेच बोलत राहिले, पण मी त्यांचे काही ऐकून घेतले नाही. म्हटले, ते सोडून बोला. तेव्हा मग "हे तुमचं फारच बुवा!" म्हणून ते गप्प बसले.

मानधनासंबंधी बोलायचे आम्ही दोघांनी त्याआधीच सोडून दिलेले होते. 'पैलपाखरे'च्या वेळीच हा प्रश्न निकालात निघाला होता. त्या पुस्तकाचे मानधन एकदाच काय ते देऊन सर्व हक्क मी माझ्याकडे घ्यावे, असे जीएंनी मला सांगितले होते. त्याप्रमाणे त्या पुस्तकाचे पंधरा टक्केप्रमाणे होणारे सबंध आवृत्तीचे मानधन मी जीएंना पुस्तक प्रकाशित झाल्यावर दिले. मात्र करार वगैरे काही केला नाही.

त्या वेळी मी एकदाच त्यांना विचारले होते, "करार करायचाय का?" जीएंनीही त्याची गरज नाही, म्हणून तो प्रश्न सोडून दिला. सर्व हक्क मी माझ्याकडे घ्यावे, हा त्यांचा आग्रह होता. फारसा परिचय नसल्यामुळे मी त्यावर जास्त बोललो नाही. पण मी ते माझ्याकडे न घेता "सर्वाधिकार सुरक्षित" असे करून टाकले. यावर जीएंनी मला विचारले, "अहो, स्वाधीन म्हणजे कुणाच्या? ही तुमची भाषा गुळमुळीत आहे. मी तुम्हांला काय सांगितलं होतं?"

"तुम्ही सांगितलंत. पण मला ते पटत नाही. म्हणून मी अशी तोड काढली."

"तुम्हांला पटण्याची काय जरुरी आहे? मी तुम्हांला ते दिलं. संपलं."

"काही संपलेलं नाही. मी योग्य ते केलं आहे." असे म्हणून मी तो विषय संपवला.

खरी गोष्ट अशी होती की, जीएंसारख्या लेखकाच्या पुस्तकाचे सर्व हक्क आपल्याकडे घेणे हे माझ्या मनोवृत्तीत बसणारे नव्हते. उद्या त्यांच्या पुस्तकातील कथेवरून चित्रपट निघाला, नाटक निघाले तर? एका आवृत्तीच्या मानधनात हे सर्व हक्क आपण कोणत्या तोंडाने घ्यायचे? जीए संकोची होते, तसा मीही संकोची

आहे म्हणा हवं तर. पण मी जीएंचे सांगणे मनावर घेतले नाही.

पुढे 'मुग्धाची रंगीत गोष्ट' आणि 'बखर बिम्मची' या दोन छोट्या पुस्तकांच्या वेळी तर त्यांचे सर्व हक्क मी त्यांच्याकडे ठेवले. कराराची भाषा तर आम्ही पुढे केलीच नाही. ओळख दाट झाल्यावर या दोन पुस्तकांचे पैसे सुद्धा ते घ्यायला तयार नव्हते ! प्रत्येक लेखक प्रकाशकाकडून आपल्या पुस्तकाच्या पंचवीस प्रती घेत असतो. (मागाहून सुद्धा दोन-दोन चार-चार अशा प्रती मागून घेणारे लेखक असतात.) पण जीएंनी मला सांगितले, " मला फक्त पाच प्रती द्या. "

मी म्हटले, " पाच कशा पुरतील ? तुम्हांला कुणा-कुणाला द्यायला लागतील ना ? "

जीए म्हणाले, " द्यायला लागतील त्याच मी घेतल्या. बाकी कुणाला मी वाटत नाही. ज्यांना कुणाला हव्या असतील त्यांनी पुस्तक विकत घ्यावं. "

म्हणूनच 'माणसे : अरभाट आणि चिल्लर' या पुस्तकाचे हस्तलिखित माझ्या स्वाधीन करून ते निश्चिंत झाले. " त्याचं चित्र झाल्यावर एकदा दाखवाल ना ? " हे मात्र त्यांनी विचारले. त्या बाबतीत ते फार जागरूक असत. एक म्हणजे ते स्वतःच चांगले चित्रकार होते. शिवाय 'बखर बिम्मची' या पुस्तकाच्या चित्रांसंबंधी त्यांच्या सूचनांची योग्य ती अंमलबजावणी माझ्याकडून झाली नव्हती.

म्हणूनच या वेळी मी त्यांना सांगितले, " पुढच्या खेपेला मी येईन तेव्हा मी चित्र घेऊन येतो. या वेळी मी चित्रकाराला दोन किंवा तीन 'रफ आयडिआ' आधी द्यायला सांगतो. तुम्हांला दाखवतो. त्यांतली तुम्हांला चांगली वाटेल ती आपण नक्की करू. त्यात तुम्हांला काही फेरबदल, सुधारणा हव्या तर त्या सांगा. ती सगळी रफ चित्रं तुम्ही बाद केलीत तरी हरकत नाही. नवीन करायला सांगू. या वेळी मी ठरवलंय— "

" काय "

" तुम्ही ओके केल्याशिवाय चित्र फायनल करायचं नाही. दहा वेळा बदलावं लागलं तरी चालेल. नाही तर शेवटी तुमच्याकडूनच चित्र काढून घेईन ! " असे बोलून मी त्यांचा निरोप घेतला.

पण तो योग आलाच नाही. आमची ही बैठक शेवटची ठरली. तो निरोप शेवटचा ठरला. आणि ती चित्रे मलाच पाहावी लागली !

याच बैठकीत त्यांच्या 'कुसुमगुंजा' या पुस्तकाचे सूतोवाच झाले. 'मराठवाडा' दिवाळी अंकात त्यांच्या चार-पाच छोट्या कथा आल्या होत्या. मला त्या खूप आवडल्या होत्या. म्हणून मी त्यांना म्हटले, "तशा आणखी काही छोट्या कथ लिहिल्यात तर त्यांचं एक छान पुस्तक होईल. तुमच्या काही कथा आमच्या डोक्यावरून जातात. या असल्या कथा लिहा ना आमच्यासारख्या वाचकांसाठी."

जीएंनी ते मान्य केले. आणखी काही कथा आपल्याजवळ आहेत, आणि काही डोक्यातही आहेत, असे ते म्हणाले. "अशा वीस एक कथा मी तुम्हांला देतो–" असे आश्वासन मला त्यांनी दिले. या छोट्या कथांच्या पुस्तकासाठी 'कुसुमगुंजा' हे नावही त्यांनी काढले होते. यावरून अशा कथांचे पुस्तक त्यांच्या आधीपासूनच डोक्तात घोळत असावे. पण या कथाही मला त्यांच्याकडून मिळण्याचा योग आला नाही. त्या मागाहून जमवाव्या लागल्या !

'माणसे : अरभाट आणि चिल्लर' वर ते एकदा हात फिरवून देणार होते. तो हात काळाने अडवला, आणि ते सर्वच राहून गेले. पण मला ते नंतर कळले. सर्व काही संपल्यावर. "कंटाळवाण्या रुक्षपणे" मला ते चंदूच्या तोंडून ऐकून घेण्याची पाळी आली. काळाला ते सामोरे गेल्यावर !

१०

अघटित

एखाद्या स्वप्नासारखे ते माझ्या आयुष्यात आले, आणि स्वप्न तुटावे तसे निघून गेले. 'माणसे : अरभाट आणि चिल्लर'चे हस्तलिखित घेऊन मी मुंबईला निघून गेलो. आठ दिवसांनी परत भेटू या म्हणून. चार दिवसांनी म्हणजे ९ डिसेंबर १९८७ रोजी संध्याकाळी चंदूचा पुण्याहून मला फोन आला : "जीएंची प्रकृती बरी नाही, त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केलं आहे."

"कशासाठी?" मी विचारले.

"ट्रीटमेंटसाठी. तू केव्हा येतोयस इकडे?"

"अकरा तारखेला. परवाच्या दिवशी संध्याकाळी डेक्कननं."

"चालेल. तू आलास की मला जरा धीर येईल." चंदू म्हणाला.

पण पुढच्या घटना इतक्या झपाट्याने घडून येतील असे चंदूलाही वाटले नव्हते. त्याआधी तीन दिवस चंदूला त्यांनी "हार्ट स्पेशॅलिस्ट डॉ. काटदरे यांची ओळख काढता येईल का?" असे विचारले होते. त्यांना त्यांची अपॉइंटमेंट हवी होती. पण चंदूची त्यांच्याशी ओळख नव्हती.

चंदूने त्यांना दुसरे मोठे नाव सुचवले, "डॉ. अरविंद फडके यांची गाठ आपणाला घेता येईल. ग. वा. बेहेरे यांचे ते स्नेही आहेत. चालेल का?"

जीए म्हणाले, "चालेल."

चंदू लगेच जिमखान्यावर जाऊना बेहेऱ्यांना भेटला. जीएंचे नाव ऐकल्यावर बेहेरे म्हणाले, "डॉ. फडके सांगलीला गेलेले आहेत. सोमवारी संध्याकाळी भेटतील. मी अपॉइंटमेंट घेऊन ठेवतो. तू निश्चिंत राहा."

चंदूने त्याप्रमाणे जीएंकडे जाऊन सांगितले. सोमवारी संध्याकाळी चंदू जीएंकडे गेला, आणि जीए आणि त्यांची दुसरी मावस बहीण सौ. नंदा पैठणकर यांना घेऊन बेहेऱ्यांच्या टिळक रोडवरील कार्यालयात गेला. जिना चढण्याचा

त्रास नको म्हणून जीएंना खालीच बसवून तो वरच्या मजल्यावर गेला. तेव्हा बेहेरे म्हणाले, "तू त्यांना घेऊन डॉ. फडक्यांकडे चल. हातातलं काम संपवून मी तुमच्या मागोमाग तिथे येतो."

त्याप्रमाणे जीएंना घेऊन चंदू डॉ. फडक्यांकडे गेला. सांगितल्याप्रमाणे दहा मिनिटांत बेहेरे तिथे आले. जीएंची आणि बेहेऱ्यांची ही पहिलीच भेट होती. त्यामागे जीएंचा बेहेऱ्यांविषयी काही पूर्वग्रह होता. बेहेऱ्यांना तो माहीतही होता. असे असतानाही जीए पुण्यात राहायला आले, त्या वेळी त्यांची राहण्याच्या जागेची अडचण आहे हे आमच्याकडून कळल्यावर बेहेऱ्यांनी पत्रकार नगरातील आपला ब्लॉक त्यांना देऊ केला होता. तो देखील राहायचे असेल तितके दिवस राहण्यासाठी, आणि जीएंना संकोच नको म्हणून "त्यांनी मला फक्त किमान भाडं द्यावं—" अशा बोलीवर.

चंदूने एकदा बेहेऱ्यांजवळ "जीएंना एकदा धारवाडला जायचं आहे—" असे उद्‌गार काढले, तेव्हाही बेहेऱ्यांनी शोफरसकट आपली गाडी देऊ केली होती. त्यानंतर जीएंनी बेहेऱ्यांच्या घरी येण्याचे आमंत्रणही स्वीकारले होते. पण त्याआधीच हा प्रसंग गुदरला. ह्या प्रसंगी तर बेहेरे स्वतः हृद्‌रोगग्रस्त असतानाही जीएंच्या प्रकृतीसाठी धावून आले होते. त्यामुळे जीएंचा पूर्वग्रह तर नाहीसा झालाच, पण ते संकोचूनही गेले. दोघांच्या मनमोकळ्या गप्पा झाल्या, आणि यातूनच बरे वाटल्यावर लवकरात लवकर आपण तुमच्या घरी येणार, असे जीएंनी बेहेऱ्यांना सांगितले.

पण डॉ. फडक्यांच्या तपासणीनंतर सगळीच चक्रे उलटी फिरू लागली. डॉ. फडक्यांच्या तपासणीला बराच वेळ झाला, तेव्हा बेहेरे चंदूला म्हणाले, "हे हृदयविकाराचं दुखणं दिसत नाही." स्वतः बेहेरे तर या विकाराने पुरे पछाडलेले होते. त्यांना तो रोग, त्याची लक्षणे आता जवळजवळ पाठ होती. त्यांची ही शंका दुसऱ्या दिवशी खरी ठरली. सकाळी कसून तपासणी झाली, आणि संध्याकाळी तिचा अहवाल आला त्यात रक्ताच्या कर्करोगाचे स्पष्ट लक्षण होते. त्याची खात्री करून घेण्यासाठी डॉक्टरांनी त्यांचे रक्त मुंबईला टाटा कॅन्सर इन्स्टिटयूटमध्ये पाठवले. पण त्यातूनही तेच लक्षण बाहेर आले.

बेहेऱ्यांनी डॉ. फडक्यांशी सतत संपर्क ठेवला होता. टाटा इन्स्टिटयूटचा अहवाल बेहेऱ्यांना कळताच त्यांनी चंदूला त्याच्या कचेरीत फोन लावून हे निदान

कळवले. मात्र जीएंना किंवा त्यांच्या बहिणींना हे निदान आधी कळू देऊ नको, असे त्यांनी त्याला सांगितले होते. तरीही काळ समीप येऊन ठेपला आहे याची कल्पना कुणालाही आलेली नव्हती.

त्याच दिवशी म्हणजे १० डिसेंबर रोजी डॉ. फडक्यांनी जीएंना ट्रीटमेंटसाठी आठ दिवस हॉस्पिटलमध्ये राहावे लागेल, असे सांगून तिथल्या तिथे दाखल करून घेतले. चंदू जीएंना भेटण्यासाठी संध्याकाळी त्यांच्या घरी गेला, तेव्हा त्याला ही गोष्ट कळली. तो लगेच हॉस्पिटलमध्ये गेला.

तत्पूर्वी तिथे ग. वा. बेहेरे जाऊन बसले होते. हॉस्पिटलमधील तीन संबंधित डॉक्टर बेहेऱ्यांच्या चांगले परिचयाचे होते. त्यांना भेटून बेहेऱ्यांनी जीएंच्या उपचारांत कसलीही कसूर राहू देऊ नका, अशी खास विनंती केली होती. जीएंशी त्यांची जवळ बोलावून ओळखही करून दिली होती. आश्चर्य म्हणजे हे तिन्ही डॉक्टर जीएंना त्यांच्या 'लेखनातून ओळखत' होते. जीएंच्या विषयी त्यांना चांगला आदरही होता. हे सर्व पाहून जीएंना खूप बरे वाटत होते.

चंदू तिथे पोचला तेव्हा जीएंच्या खोलीबाहेर "डोंट डिस्टर्ब द पेशंट" अशी पाटी त्याला दिसली. चंदूने तिकडे दुर्लक्ष केले, आणि दार किलकिले करून पाहिले, तर आत ग. वा. बेहेरे जीएंशी मनमोकळ्या गप्पा मारत होते. चंदूला पाहताच जीएंनी त्याला बोलावून जवळ बसवले. बेहेऱ्यांनी आपल्यासाठी किती कष्ट घेतले त्याबद्दल त्यांची संकोचपूर्वक वाखाणणी केली.

बेहेरे त्यांना म्हणाले, "एवढं ओझं तुम्हांला वाटत असेल तर त्याचा आपण नंतर हिशेब करू. तुम्हांला बरं वाटल्यावर. एवढं कसलं अवघडल्यासारखं वाटतंय तुम्हांला?"

त्यानंतर जुन्या इंग्रजी चित्रपटांपासून मॉमच्या फादंबऱ्यांपर्यंत अनेक विषयांवर ते दोघे बोलत होते. बरे झाल्यावर तुम्हांला मी हवे ते इंग्रजी चित्रपट दाखवण्याची व्यवस्था करतो, असे आश्वासनही बेहेऱ्यांनी त्यांना दिले. हे सर्व ऐकून जीएंच्या बरोबर चंदूही खूष झाला, आणि दुसऱ्या दिवशी कचेरी सुटल्याबरोबर परत येतो, म्हणून तिथून बाहेर पडला. बाहेर आल्यावर बेहेरे चंदूला म्हणाले, "पाहिलेस तुझे जीए? ज्याला दुःख सांगायला मित्र नाही असा हा एक कमालीचा एकाकी मनुष्य आहे. पट्टी जमल्यावर किती बोलतात पाहिलंस? काही नाही, आपलं अंतरंग बाहेर कुणाला दिसू नये म्हणून त्यांनी स्वतःभोवती

शिष्टपणाची भिंत घालून घेतली आहे. काही वर्षे आधी जर यांच्याशी माझी गाठ पडली असती ना, तर फार बरं झालं असतं."

चंदू म्हणाला, "अजून काय झालंय?"

बेहेरे म्हणाले, "छे रे. आता फार उशीर झालाय. यावरून तुझ्या एक गोष्ट लक्षात आली का? यापूर्वी त्यांच्या ज्या काही तपासण्या झाल्या आणि निदानं काढण्यात आली तीं सगळी चुकीची होतीं. आता एकच करायचं, त्यांना हा कॅन्सर आहे हे कळू द्यायचं नाही. एकदा हे कळलं की संपलं. हे न कळता काही दिवस जातील ते जातील."

हे बोलणे झाल्यावरच चंदूने मला मुंबईला फोन केला, जीए माझी चौकशी करीत असल्याचे सांगितले आणि मी पुण्याला अकरा तारखेला निश्चित येतोय याची खात्री करून घेतली.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी चंदू हॉस्पिटलमध्ये गेला, तेव्हा जीए स्वस्थ पडलेले होते आणि त्यांच्या भगिनी नंदाताई त्यांच्या छातीला मलम चोळीत होत्या. चंदू त्यांच्या जवळ जाऊन बसला, तेव्हा जीए नेहमीइतक्या मोकळेपणाने हसले नाहीत. हळूहळू त्याच्या असेही लक्षात आले की, बोलताना त्यांची जीभ जड झाली आहे. बोलताना त्यांना थोडा त्रास होतोय. त्यांना अधिक त्रास होऊ नये म्हणून चंदूने बोलणे आवरते घेतले, आणि तो जायला उठला. तेव्हा जीए त्याला म्हणाले, "काय आज लवकर निघालाय? कंटाळलात काय आम्हांला?"

चंदू म्हणाला, "छे छे. आज जरा अर्जंट काम आहे म्हणून लवकर घरी जायचंय. उद्या येतोय ना परत सावकाशीनं?"

"नक्की?"

"नक्की म्हणजे काय— नक्कीच." म्हणून चंदू तिथून बाहेर पडला.

पण चंदूला आपला हा शब्द पाळण्याची पाळीच आली नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजताच ग. वा. बेहेऱ्यांचा मला मुंबईत फोन आला. "अप्पा, तुझे जीए गेले."

पुढे त्यांनी काय सांगितले त्याला काही अर्थ उरला नाही. मी फोन ठेवला आणि सुन्न होऊन गेलो. इतक्या लवकर, इतक्या अघटितपणे असे काही होईल याची कल्पनाच नव्हती. जीए मला पुन्हा भेटणार नव्हते, बोलणार नव्हते.

तावडतोब मी पुण्याची टॅक्सी पकडली. पुण्यात आल्यावर तीच टॅक्सी घेऊन मी जीएंच्या घरी गेलो. पण तिथे काहीच नव्हते. फक्त प्रभाताई होत्या. त्यांचे सांत्वन मी काय करणार? चार शब्द कसेबसे बोललो. त्या म्हणाल्या, "देह तुमच्या अत्रे सभागृहात ठेवलाय." तसाच परत फिरून रिक्शेने आचार्य अत्रे सभागृहात आलो, आणि चंदूला गाठले. त्याला घेऊन वरच्या मजल्यावर आलो, आणि जीएंच्या पायांना स्पर्श केला.

त्या क्षणी मला पहिल्या भेटीची आठवण झाली. त्यांच्या घरून निघताना मी त्यांना वाकून नमस्कार करायला गेलो, तेव्हा त्यांनी पाय झटकन मागे घेतले होते. आज मला त्या पायांना सहज स्पर्श करता आला!

देहावरचे तेजोवलय मृत्यूने केव्हाच नष्ट केले होते. तिथे फक्त शांती होती. चिरशांती. बाकी चेहऱ्यावर काही नव्हते. जीएंच्या डोळ्यांवर आता गॉगल उरला नव्हता. पण डोळे मिटलेले होते. त्यांना मोकळ्या, स्वच्छ डोळ्यांनी पाहताना मला एकदा पाहायचे होते. पण ते सुद्धा स्वप्नच ठरले.

मागे शिल्लक राहिली होती ती फक्त त्यांची शब्दकळा:

"लिखाणामुळे शब्द आणि विचार बंदिस्त होतात. त्यांचे पंख होण्याऐवजी साखळदंड होतात. जोपर्यंत बोलणाऱ्याचा प्राण त्यांच्या मागे असतो तोपर्यंतच शब्दांना पंख राहतात, पण त्याच्या मृत्यूनंतर ते केवळ शिलालेख बनतात. आणि काही काळाने तर ते लेख पुसून जाऊन शिळांचे अवजड ओझे मात्र अनुयायांच्या गळ्यात कायमचे अडकते."

हे ओझे घेऊन मी तिथे मुखस्तंभासारखा उभा होतो. चंदूला मी विचारले, "देह इथे कसा आला? घरी नाही नेला?"

चंदू म्हणाला, "अंत्य दर्शनासाठी सर्वांना कोथरूडला जावं लागलं असतं. कित्येकांना जीएंचं घर सुद्धा ठाऊक नसणार. तेव्हा प्रभाताईंना, नंदाताईंना विचारून इकडे आणायचं ठरवलं. कॉंटिनेंटलचे अनंतराव कुलकर्णी म्हणत होते, देह साहित्य परिषदेत न्यावा. पण मी विचार केला, जिवंतपणी साहित्य परिषदेत ते कधी फिरकलेही नाहीत. मृत्यूनंतर त्यांना तिथे कशाला न्यायचं? त्यांचा जवळचा संबंध कुणाशी? साहित्य परिषदेशी की अत्रे सभागृहाशी?"

"असं बोललास तू?"

"त्यांना कशाला बोलू? त्यांना हे पटलं नसतं. त्याची जास्त वाच्यता नको

म्हणून मी त्यांना थाप ठोकली. "

"काय?"

"पहाटे जीए गेल्याचं कळल्यावर सुनीताबाई देशपांडे हॉस्पिटलमध्ये येऊन गेल्या होत्या. त्यांचं नाव पुढे केलं. म्हटलं सुनीताबाईंनी सुद्धा देह अत्रे सभागृहावर न्यावा असं सुचवलं आहे! बेहेऱ्यांनीही तेच योग्य ठरवलं. तेव्हा मग प्रश्नच उरला नाही. इथे आणल्यावर सुद्धा अंत्यविधीच्या सामानासाठी अनंतरावांनी पैसे काढले, पण मी त्यांना ते देऊ दिले नाहीत. "

माझ्या गैरहजेरीत चंदूने ही जी समयसूचकता दाखवली ती मलाही जमली असती की नाही याची शंका आहे. चंदू माझ्यापेक्षाही जीएंच्या जास्त जवळ गेला होता. तरीही जीए गेल्याचे दुःख त्याने तिथेच गिळून टाकले होते. तो हतबुद्ध होऊन बसला नाही. त्याही परिस्थितीत तो जीएंच्या तितकाच जवळ राहिला! चंदू ही काय चीज आहे हे जीएंनी त्याच्या संगतीत नक्कीच ओळखले असणार. म्हणूनच मोठमोठ्या वृक्षांचे जिथे काही चालले नाही तिथे ही छोटीशी वेल अलगद चढून बसली होती!

देह आमच्या अत्रे सभागृहात आल्यावर त्याने प्रथम तो तळमजल्यातील छोट्या स्वागत-कक्षात ठेवला. सभागृह प्रदर्शनाला दिलेले होते, आणि वरच्या मजल्यावरील हॉल फर्निचर, सामानसुमान यांनी भरलेला होता. अर्थात स्वागत-कक्ष छोटा आहे, आणि त्याच्या बाजूला वर जाणारा जिना आहे. जीएंच्यासारखे अनेक साहित्यिक याच कक्षात बसून गप्पा मारीत आलेले आहेत. नंतर वरचा हॉल मोकळा झाल्यावर देह तिथे ठेवण्यात आला. (तरीही जीएंना ॲलर्जी असलेल्या एका पुणेरी नजरेला हा देह जिन्याखाली ठेवल्याचा साक्षात्कार झालाच! त्याच्या काकदृष्टीला जिना बाजूला आहे हेही दिसले नाही.)

चंदूने प्राप्त परिस्थितीत जे जे करता येईल ते वेळ न दवडता केले होते. मला करण्यासारखे त्याने काही शिल्लक ठेवले नव्हते. मी तिथे पोचलो तेव्हा दुपारचे साडेबारा वाजत आले होते. अंत्य दर्शनासाठी येणाऱ्या लोकांची आवक कमी झाली होती. उरली होती ती फक्त अंत्ययात्रेसाठी येणारी मोजकी माणसे. ज्याच्या कथांनी महाराष्ट्रात आपला एक खासा वर्ग निर्माण केला, कथावाङ्मयात स्वतःचे एक झगझगीत दालन उभे केले, जीए म्हणजे 'ग्रेट ऑथर' हा अर्थ ज्याने सार्थ केला त्याला निरोप देण्यासाठी पुरी वीस माणसेही तिथे थांबली नव्हती.

पण हेही योग्यच होते. त्यांना संगतीला जास्त माणसे नकोच होती. ज्यांच्याशी बोलायला त्यांना जड वाटले नसते, ज्यांच्या पंगतीत त्यांना आणि त्यांच्या पंगतीत ज्यांना बसण्यात आनंद वाटला असता किंवा अवघडल्यासारखे वाटले नसते अशीच ही माणसे होती. अनंतराव कुलकर्णी, श्री. पु. भागवत, जयवंत दळवी, ग. वा. बेहेरे, रामदास भटकळ आदी मोजकी माणसे तिथे होती. ना. ग. गोरे, विश्राम बेडेकर यांच्यासारखे वयोवृद्ध साहित्यिकही त्यांचे अंत्यदर्शन घेऊन गेले होते.

ताटी बांधण्याच्या कठीण कामासाठी आमच्या मदतीला आले ते तीन-चार रिक्षावाले. त्यांना जीएंच्या साहित्याचा गंध नव्हता. पण या असल्या काही माणसांनीच जीएंच्या कथेत अनेकदा आपला गंध पसरवला होता. त्यांना फक्त एवढेच माहीत होते, की हा कुणी तरी मोठा माणूस होता, आणि आपल्या रिक्षेतून तो एकदा-दोनदा फिरला होता. त्यांना कुठे कुठे पोचवणे एवढेच त्यांचे काम होते, आणि तेच ते करीत होते !

अखेरच्या यात्रेसाठी देह सज्ज झाला आणि तो आमच्या खांद्यावर चढला तेव्हा मागे काहीच उरले नाही. भोवतीचे वृक्ष हे सारे वरून पाहत होते. त्यांना काय, आपल्यातले एखादे पान गळून पडल्यासारखेच ते तटस्थ होते. माझ्यासारख्या यःकश्चित माणसाला मात्र हे अघटित वाटले.

माझ्याकडील एक पान गेल्याने
मला काही हरवल्यासारखे वाटले नाही
माझ्याकडील एक फूल गेल्याने
सुगंधात कधी उणेपणा आला नाही
माझ्याकडील फळ गेल्याने
माझ्या आयुष्यात नैराश्य आले नाही
पण माझ्याजवळील जीए गेल्याने
माझ्या अंगणातील पाने, फुले आणि फळे देणारा
कल्पवृक्षच उन्मळून पडला आहे.

—यापलीकडे बोलण्यासारखे आता काहीच शिल्लक राहिले नव्हते.

